
# माणूस

मराठीतील
सर्वाधिक
खपाचे
नव्या
पिढीचे
नवे
पाक्षिक



१५
सप्टेंबर
१९६४
किंमत
५२
पैसे



जनता अंकाच्या
यशस्वी प्रयोगातून

## ‘ माणूस ’


आता नवे स्वरूप
घेत आहे.

- **किंमत ५२ पैसे**
- **महिन्यातून दोन वेळा प्रकाशन**

नवे विचार
रसरशीत साहित्य
आकर्षक मांडणी
या त्रिगुणांनी युक्त असलेले
मराठीतील

**प हि ले लो क प्रि य लो क पा क्षि क**

# मा णू स



# कुलवंती

**ब. मो. पुरंदरे**

अस्मानाचा थांग लागत नव्हता. अथांग निळं निळं शार अस्मान ! उंच उंच, अगदी खूप खूप उंच अंतराळांत पांढऱ्या ढगांचा एखादाच झुबका तरळत होता. अन् एकच पक्षी उभ्या आडव्या भराऱ्या मारीत होता. करडा बहिरी ससाणा. एकदम तो खाली सूर मारीत होता. झपाटयानं वर उसळी घेत होता. लगेच कोणत्याही दिशेला झेप घेत होता. क्षणात अधांतरी अचल राहून खाली धरती टेहळीत होता. त्याची अचलता इतकी की, त्या गहिऱ्या अस्मानगिरीला बहिरी ससाण्याचं चित्रच चिकटवल्याचा भास व्हावा. पुन्हा तो बाणासारखा सर्रर्रकन् भरारी घेई. सूर मारी. स्थिर होई. त्याच्या स्थिरतेतही विलक्षण चांचल्य होतं. तो आपल्या तीक्ष्ण नजरेनं त्या भयंकर खोल आणि अस्ताव्यस्त पसरलेल्या कडेकपाऱ्यांची आणि सोंडाशिखरांची हेरासारखी निरखणी करीत होता.

त्या कावेबाज पाखराची नजर विशेषतः भिरभिरत होती खालच्या प्रचंड पुरंदर गडावर. काळ्या बावरात ओलसर मातीच्या ढिगाऱ्यावर लहानग्या जीवांनी बनवलेल्या वारुळासारखा गड दिसत होता. भवती अफाट पहाडांच्या रांगा, दऱ्या, खोरी, सुळके, उतरंडी आणि किर्रर झाडी. त्यांत घडवलेला हा अवघड गड. चक्रव्यूहासारखी वळसे घेत घेत गेलेली ती वाळसेदार तटबंदी. ते डौलदार, बुरुजबंद दरवाजे. त्या चिरेबंदी माच्या, पुरंदरेश्वर आणि केदारेश्वराची ती बाजूबंदी मंदिरं, दगडी वाडे, ताठ कडे, हिरव्या गर्द झाडीतून एकदम उठलेला तो बालेकिल्ला, ती दारूची कोठारं, तोफांचे मोर्चे, वळणं घेत घेत दरवाजाशी पोहोचलेल्या घडीदार पायऱ्या; ती भयाण भैरव खिंड. ती अजिंक्य वज्रमाळ, तो कमानदार दिल्ली दरवाजा आणि त्यावर फडकत असलेला भगवा झेंडा. हे होतं पुरंदरचं रूपदर्शन. तो बहिरी ससाणा ह्या रूपावर घिरटया घालीत होता.

गडावरच्या तटावर पहारा करणाऱ्या मावळी वहाणांची किर्र किर्र चालू होती. उगवत्या सूर्यकिरणांत लांबसडक सावल्या येरझारा घालीत होत्या. कोवळ्या उन्हात ते सावळे मावळी चेहरे तकाकत होते. त्यांच्या ढाली, समशेरी, भाले आणि बंदुका त्यांच्या आणि सावल्यांचाही दिमाख अन् दरारा दाखवीत होत्या. तटाच्या पायऱ्यांवरून हशम ढालाइतांची झपझप चढउतार चालू होती. मधूनच एखाददुसरा घोडेस्वार खडाड् खडाड् टापा वाजवीत दौडत होता. पुरंदरेश्वराच्या देवळात सनई चौघडा गोड साद घालीत होता.

अस्मानातल्या बहिरी ससाण्याचं लक्ष इकडे कुठंच नव्हतं. त्याची भिरभिरती नजर हेरीत होती शिकार. गडाच्या कानाकोपऱ्यात कुठं गिर्रेबाज कबुतर गवसलं तर त्याची शिकार. बुरुजाबुरुजावरून त्याची तीक्ष्ण नजर झेप घेत घेत धावत होती किती तरी वेळ. शुक्राची चांदणी लोपली नव्हती तेव्हापासून.

गवसली ! ससाण्याच्या नजरेत शिकार गवसली. सूर झोकून देता देता त्याला शिकार दिसली. त्याचं लक्ष गडाच्या गंगमोहरावरच्या शेंदऱ्या बुरुजावर गेलं. खिळलंच ! शेंदऱ्या बुरुजावर बहिरी ससाणा घिरटया घालू लागला.

शेंदऱ्या बुरुजावर उमा उभी होती. कसल्या तरी स्तोत्राच्या ओळी ती पुटपुटत होती. तिचे ते कोमल ओठ अलगद हलत होते. वाऱ्यानं उडणारा पदर सावरीत ती नमस्कार करीत होती. तिच्या नथेतले हिरेमोती चमकत होते. मोठ्या आदराच्या अन् श्रद्धेच्या नजरेनं ती त्या शेंदरी बुरुजालाच नमस्कार करीत होती. पुरंदरेश्वराला सहस्र बिल्वपत्रं वाहून ती शेंदऱ्या बुरुजावर आली होती. रोजचाच सूर्योदयीचा हा नेम तिचा. त्यातून आज शिवरात्र. भरजरी शालू चोळी नेसून वाकीतोडयांसह सारे अलंकार तिने अंगी ल्याले होते. झुपकेदार मोतियाची मोकरं कानांत डुलत होती. केसांच्या डौलदार खोप्यात सोन्याच्या मुदी आणि अग्रफुलं खुलत होती. मोत्यांचे वेल कानांवरून केसांवर लटकले होते. भाळी चंद्रकोर रेखलेली होती. गळा सोन्यामोत्यांनी दाटला होता. पायबोटांतल्या जोडव्यांपासून केसांतल्या अग्रफुलापर्यंत ते तिचं विशीतलं शिवशिवतं लावण्य पदर सावरीत म्हणत होतं, '**मी कुलवंताची सून !**'

केसांची निखळलेली बट मागे सारीत उमेनं अलगद मागे पाहिलं. चार पावलांवर

उभा असलेला मार्गवराम चटकन् पुढं झाला; त्यानं हातातल पूजासाहित्याचं चांदीचं तबक पुढं केल. तिनं पळीपचपात्री उचलली. बुरुजाच्या मध्यावर पळीन तिनं पाणी टाकलं. बोटानं गंधाचं सिंचन केलं. कोयरीतल हळद-कुंकू वाहिलं. स्वत. भाळी लावलं. ओंजळीत फुलं घेऊन वाहिली आणि खाली वाकून तिन नमस्कार केला. तिच्या डोळयात श्रद्धा आणि कृतज्ञता तरळत होती. ती भानावर आली यसनाईकाच्या शब्दानी.

" वयनीसरकारचा लई माव हाये शेंदऱ्या बुरुजावर ! "

शेंदऱ्या बुरुजाच्या कोटाशी उभा असलेला येसनाइक प्रसन्न हसून म्हणाला. उमेन त्याच्या म्हाताऱ्या मुद्रेकडे पाहात म्हटल,

" होय नाईक ! पण आमच्यापेक्षा तुम्हाला ह्या बुरुजाबद्दल केवढी भक्ती वाटत असेल ? केवढी जवळीक वाटत असेल ? नाही ? "

" जी व्हय."

" पुरंदर गडाच्या कल्याणासाठी तुमच्या रक्ताची, तुमच्या घरातली दोन बाळं जिवत झोपी गेली आहेत ह्या बुरजात ! देवकाई आणि नाथनाक ! "

" जी व्हय ! आमचं रक्ताचं नात हाये ह्या बुरुजाशी ! आमच्या कुळीचा ' येसवंत-राव ' हाये ह्यो बुरूज वयनीसरकार ! गडा-साठी कुर्बानी केली ! "

मार्गवराम हे बोलणं ऐकत होता. त्याला ह्या बुरुजाची कथा ऐकून माहीत होती. ह्या अवघड कडयावर बुरूज बांधणं जरूर होतं. पण केलेल बांधकाम वारवार कोसळत होतं. अखेर ह्या बुरुजात नवरावायकोंना जिवंत पुरण्याचा सल्ला कोणा मांत्रिकान दिला ! सल्ला शाही किल्लेदारान अमलात आणला ! देवकाई आणि नाथनाक ह्या विवाहित बाल-जोडप्याला ह्या बुरुजात पुरण्यात आल ! जिवंत ! बुरूज बांधून पक्का झाला !

" नाईक, येते मी ! "

पदर डोक्यावरून घेत उमा म्हणाली अन् निघण्याकरता वळली.

" जी वयनीसरकार ! "

येसनाक जोहार करीत झुकला. तेवढयात एकदम फडफड फडफड आवाज झाला अन् कोण्या पाखराचा करुण आक्रोश उठला. तिघाच्याही नजरा तिकडे एकदम वळल्या. उमा बुरुजाच्या तटाकडे धावली. येसनाकानं झुकून पाहिलं. त्या बहिरी ससाण्यान वळ-चणीच्या एका कबुतरावर झडप घातली होती. कबूतर किंचाळत होतं. येसनाक एक-दम ' हात् हात् हिर रं रं ! ' करीत मोठयानं ओरडला. उमाही कळवळली.

" झडपलन् पाखरू मेल्यान ! "

कबूतर रक्ताळून खाली दरीत पडलं ! त्याची पिसं वाऱ्यावर उडाली. ससाणा आकाशात उडाला.

" भैरी ससाना हाये ह्यो ! ह्यो तसंच करायचा ! त्येची जातच तसली ! "

आभाळात झेपावलेल्या ससाण्यानं आपल्या शिकारीवर दुसरी झडप घेण्यासाठी सूर मारला. ते पाहून उमेन तटाशी उभी अस-लेली येसनाकाची बदूक उचलली. पदर खोवला. बंदुकीत बार भरलेला होता.

" फूल लावलेल हाये ! बार टाका सरकार ! "

उमेनं ससाण्यावर नेम धरला अन् खाड-कन् गोळी उडाली. पंखाच्या चिंधडया उडून ससाणा खाली कोसळला. आवाजान गडा-वरचा सारा चौकीपहारा नजर रोखून बघू लागला. येसनाकाच्या म्हाताऱ्या दाढीमिशां-तून कौतुक बाहेर ओसडू लागल. मार्गवराम उमेकडे बघतच राहिला. आश्चर्यानं, कौतु-कानं, गोंधळलेल्या नजरेनं.

बुरुजावर उरला एकटा येसनाक. बंदुकीत पुन्हा बार भरीत. खडया पहाऱ्याकरिता.

उमा वाडयावर आली. मागोमाग मार्गव-रामही. उमेनं अंगावरचे दागिने उतरविण्या-साठी चौरगावरचा नक्षीदार अष्टकोनी डबा उघडला. तिनं अलगद नथ काढली. दंडातल्या वाकी उतरवल्या. तेवढयात घागरी वाज-ल्याचा आवाज आला. ती तशीच उठली, मागील दारी गेली. दोन्ही हातात घागरी घेऊन मार्गवराम पाणी भरण्यासाठी निघाला होता. जवळच एक मोठ थोरल गंगाळ पाण्यानं भरलेलं होत. ती दोन पायऱ्या उतरून हसून म्हणाली,

" मार्गवराम, आज फार नका पाणी भरू ! पिण्यापुरती एक घागर आणा म्हणजे पुरे ! आज शिवरात्रीचा उपास आहेच; अन् कालचाही शनवारचा तुम्हांला उपास होता. आज राहू द्या ! "

एवढं बोलत असतानाच तिचं लक्ष पर-सातल्या डाळिंबाच्या झाडाकडे गेलं. शेंडया-वर एक भरलेलं धवधवीत डाळिंब तिला दिसल.

" अगबाई ! डाळिंब अगदी झालय बघा की ! मार्गवराम, काढता का तेवढं ? अं ? "

मार्गवराम एकदम दचकून भानावर आला. त्याच लक्ष गंगाळातल्या पाण्यावरून उमेच्या बोलण्याकडे गेल. तो आतापर्यंत बघत राहिला होता गंगाळात पडलेलं उमेचं गोरं-पान सालंकृत प्रतिबिंब !

" म्हटलं ते तेवढ डाळिंब देता का काढून?

मार्गवराम हसला. ओशाळलाही. लगेच गंभीरही झाला. त्यान चटकन् झाडावरच रसरसलेलं डाळिंब काढून दिलं. ते घेऊन ती घरात गेली. तिनं नको म्हटलं होत तरीही त्यान पधरा वीस घागरी पाणी भरलच. नंतर तो देवघरात गेला. तिथ पाट मांडून पुढं लोटीभर दूध ठेवलेलं होत. ते त्याच्याच-साठी उमेनं ठेवलं होतं. तो दुधाकडे बघत पाटावर बसला. त्यानं लोटी ओठाला लावली. त्याच्या अंगावर गोड रोमांच फुलून आले. प्रत्येक घोटाला त्याला सुखद स्पर्शसंवेदनाच जणू होत होत्या. लोटी रिकामी झाली अन् तो भानावर आला. त्याचं लक्ष देवापुढच्या चौरंगावरच्या दासबोधाकडे गेलं. त्याला स्वतःचा राग आला. तो झटकन् उठला अन् एकदम देवापुढ गेला. त्याच्या मुद्रेवर खेदाच्या छटा उमटल्या होत्या. त्यानं दास-बोधाला स्पर्श केला. डोळे मिटले. किती तरी वेळ तो तसाच बसला होता. मनात म्हणत होता, ' अचपळ मन माझे नावरे आवरीता ! तुजविण शिण होतो धाव रे धाव आता ! '

तो भानावर आला घोडयाच्या टापा ऐकून.

वाडयाचा मोठा दरवाजा देवडी-वाल्यानं घाईघाईनं पुरा उघडला. बाहेरचा स्वार घोडयावर बसूनच वाडयात प्रवेशला. नोकर चाकरांची धावपळ सुरू झाली. भिमी कुणबीण उमेला वर्दी द्यायला बिगीबिगी उठली. तिनं स्वयपाकघरात येऊन दबत्या आवाजात वर्दी दिली,

" वयनीबाय, धनी आलं ! "

उमा लगेच हातचं काम टाकून हसत निघाली. ओसरीवर आली. तिचा उमदा धनी पायऱ्या चढून वर येत होता. ती समोर दिसताच त्यानं मोठयानं हसून तिला मुजरा

केला ! ती एकदम थांबली. लाजली.

"इश्श ! हे काय ! "

"तुमचा पराक्रम समजला आम्हांला ! गडावर कौतुक चाललय तुमच्या निशाणबाजीच. किल्लेदार बाजीकाका तर म्हणाले मला, 'पोरा, तुला लाख गुणाची लक्ष्मी लाभलीय बघ ! ' केवढं कौतुक आज सबनिशीणबाईचं ! "

" हं ? मग आता भूक नसेलच ! "

" खरच पोट भरल ! "

झोपाळ्यावर बसत बसत शिवदेवराव म्हणाला. झोपाळ्याच्या कडीवर हात ठेवीत उमेन म्हटलं,

" पोट भरलं ? म्हटलं शिवरात्र आहे आज ! "

" आमची 'शिवरात्र' रोजच असते ! ! "

मिश्किल डोळे मिचकावीत शिवदेवराव म्हणाला.

" इश्श ! "

उमा, चटकन् आत निघून गेली. मागोमाग शिवदेवरावहि हसत, थट्टा करीत गेला.

हे सार दिसत होत भार्गवरामाला. तो शेजारच्या खोलीच्या नक्षीदार जाळीशी उभा होता. उमेच ते गोड हसणं, अन् नाजूक लाजणं तो अगदी नकळत स्वत:ला विसरून बघत होता. शिवदेवरावाचं ते वाक्य त्यान ऐकलं, '—आमची शिवरात्र रोजच असते—' अन् भार्गवराम बेचैन झाला. एकदम एक विचार त्याच्या मनाला चाटून गेला, ' मीच ह्या शिवदेवरावाच्या ऐवजी असतो तर—! ' जणू अचानक काबुली गुलाबपाण्याची पखाल अंगावर बरसल्यासारख त्याच मन ह्या कल्पनेन सुखावल —पण निमिषात निखारे अंगावर साडल्यासारख त्याचं मन भिजून निघालं. नकारार्थी गदगदा मान हलवीत तो मागच्या अंगणाकडे झपझप निघाला. स्वयपाकघराच्या शेजारून जाता जाता त्याच्या कानावर शिवदेवरावाचे शब्द आले. तो थबकलाच.

" कबुतरावर झडप घालणाऱ्या बहिरी ससाण्याला तू अचूक उडवलंस ! असले ससाणे उडवण्याकरताच छत्रपती महाराजानी हे स्वराज्य माडल ! किती तरी ससाणे मारले त्यानी ! "

भार्गवरामाला आसुडासारखे वाटले ते शब्द. तो झपाट्यानं निघून गेला, परसात झाडाची दाटी होती. एका औदुबराला पार बाधलेला होता. तो त्या पारावर औदुंबराला टेकून बसला. डोळे मिटले आणि त्यान रामस्मरण सुरू केल. मनातल्या मनात. श्रीराम जय राम जय जय राम !

वाड्यातून शिवदेवरावाचं सहज बागेत दूरवर लक्ष गेलं.

झुलत्या वेलीच्या अन् डहाळ्याच्या जाळीतून त्याला औदुबराखाली ध्यानस्थ बसलेला भार्गवराम दिसला. तो त्याच्याकडे पाहात राहिला. उमेला कुतूहल वाटलं.

" टक लावून पाहण्याइतकं काय आहे बाई एवढं ? "

" तुमचे भगीरथ ! "

दूरवर दिसणाऱ्या भार्गवरामाकडे बोट करीत त्यानं म्हटलं. उमेन पाहिल्यावर ती म्हणालीच,

" इश्श, थट्टा काय करायची त्याची अशी ! "

" थट्टा ? पाणक्याला भगीरथ म्हणणं ही थट्टा ? अग त्याच्यामुळं तर गंगा टाक्याचं पाणी पितोय आपण ! "

शिवदेवराव मोठ्यानं हसला. ती मात्र त्या हसण्यात सामील झाली नाही. ती म्हणाली,

" व्रतस्थ आहेत ते. त्याचा जन्म पाणी भरण्याकरता नाही. थोर आहेत. याहून थोर होणार आहेत. पुण्यपुरुष ! त्यांचं मौन नसतं तर मी त्याना पुरंदरेश्वरापुढं एखाद्या प्रसंगावर प्रवचन करायला सांगितलं असतं. "

" हं ? कोणत्या प्रसंगावर ? शकर भिल्लिणीवर कसे भाळले, त्या प्रसंगावर ? "

" सदान् कदा बाई थट्टा ! त्यांना मी प्रवचन करायला सांगितलं असतं शिवतांडवावर ! "

" मदनसहारावरही ! "

" हो ! "

" बरं, आम्ही जातो ! "

गांभीर्याचा खटघाळ आव आणून तो सदरेवर निघून गेला. त्याचा तो आव पाहून ती अस्फुट हसली.

भार्गवराव औदुंबराखाली ध्यानस्थ बसला होता. पण त्याचं मन अत्यंत अस्वस्थ होतं. ते रामनामात स्थिर होत होतं. पण मधूनच उसळी मारीत होतं त्या बहिरी ससाण्यासारखं !

भार्गवराम पुरंदरावर आल्या क्षणापासून असाच अस्वस्थ होता. वास्तविक तो राहणारा कोकणातला. अगदी गरीब कुटुंबातला. लहानपणापासून छद रामभक्तीचा. विरक्त राहून सर्व आयुष्य रामसेवेत आणि सूर्योपासनेत घालवावं हाच ध्यास त्यानं घेतला. लग्न केलं नाही. केवळ देवभक्ती करून जेवणारा हा धाकटा भाऊ थोरल्या भावाला झेपेना. मधुकरी मागून परभृत देवभक्ती करणं भार्गवला आवडेना, पटेना. त्यानं ठरवल 'ब्राह्मणायोग्य' चाकरी करून आपलं व्रत चालू ठेवायच. पैसा मिळवण्यासाठी नोकरी त्याला करायचीच नव्हती. केवळ ती अन्नवस्त्रासाठी. मग ती वाढप्याची, पाणक्याची, शागिर्दाची, कसलीही नोकरी करायची त्याची तयारी होती. तीन वर्षं त्यान अशीच कोंकणात काढली. बारा वर्षं मौन धरून, रामनामाचा व गायत्रीचा जप करायचा, दासबोधाची व रामायणाची पारायणं करायची, ध्यान–धारणा करायची आणि एकूण पंचवीस लक्ष सूर्यनमस्कार घालावयाचे असा त्यानं राजापूरच्या गगेत स्नान करून एका रामनवमीला संकल्प सोडला होता. तीन वर्षं मोठ्या कष्टानं पण नेटानं त्यानं पार पाडली होती. अन् त्यान वयाचीही पचविशी गाठली होती. बारा वर्षांच्या ह्या संकल्पपूर्तीनंतर सर्व क्षेत्राच्या यात्रा करून अखेर काशीस गंगेच्या सान्निध्यात आयुष्य संपवावयाचं त्यानं ठरवलं होतं. हा खडतर आराखडा त्यानं अगदी लहानपणीच आखला होता !

एक दिवस योग आला पुरंदरगडावर येण्याचा. पुरदरचे सबनीस शिवदेवराव यांना शागिर्दाच्या कामासाठी आणि पाणी भरण्यासाठी माणूस हवा होता. पाणी दुरून आणावं लागत होत. त्यांनी कोकणात विजयदुर्गच्या किल्लेदाराला पत्रही लिहिलं होतं.

एके दिवशी सकाळी गोरा गोरा पान, कणखर शरिराचा अन् वयानं पंचविशीतला पाणीदार तरुण शिवदेवरावापुढ दाखल झाला. भार्गवराम ! विजयदुर्गच्या किल्लेदाराचं आणलेलं पत्र त्यानं पुढ ठेवल. भार्गवच्या नोकरीमागील हेतूसह सारा परिचय किल्लेदारानं पत्रात लिहिला होता. असा ब्राह्मण कामासाठी मिळालेला पाहून रावाला बर वाटलं. त्यान त्याला वाड्यावर आणलं. त्याला काम समजावून सागितली. कामं फक्त दोनच. पूजेची तयारी करण. पाणी भरणं.

आणि त्याच वेळी ओसरीवर आलेल्या उमेला भार्गवानं प्रथमच पाहिलं अन् पाहताक्षणीच त्याच मन कधी नव्हे ते एकदम डहुळलं ! तो बेचैन झाला. मांबावला. आपल्या मनाची ही स्थिती पाहून तो घाबरलाही. त्याला वाटलं आपण कडयावरून कोसळतो आहोत. आपला ध्येयसंकल्प काय अन् ही विपरीत उलघाल काय ! मनाला अंकुश मारीत मारीत तो त्याला ठिकाणावर ठाणबंद करीत होता.

भार्गवची नोकरी सुरू झाली. आजवर अगदी शांत असलेल्या त्याच्या मनाच्या सर्व सरहद्दी पेटल्या. भयंकर महायुद्ध सुरू झालं.

खूप मोठ्या पहाटे उठून गार पाण्यान तो स्नान करी. पुरदरेश्वराच्या देवळात सूर्योदय होईपर्यंत रोज पाचशे सूर्यनमस्कार घाली. नतर जप करी. पूजेची तयारी करून दीड दीड मणाच्या घागरीनी लपलप करीत वाड्यात पाणी भरी. मग दासबोध व रामायणाचं वाचन करी. शक्य तोवर उमेचं दर्शन तो टाळीत असे. पण त्यामुळेच त्याला नकळत तिच्याबद्दल ओढ लागत असे. उमा स्वत: येऊन त्याची एकदा तरी विचारपूस करी. तो खुणेनं 'सर्व उत्तम आहे !' अस म्हणे अन् लगेच झटकन् निघून तरी जाई किंवा पोथीत डोकं घाली.

आठ दहा दिवसानंतर उमेनं त्याच्यासाठी देवघरात धारोष्ण दुधाचा गडवा भरून ठेवावयास सुरुवात केली. उमा दिसली की, त्याच्या मनात धुमश्चक्री सुरू होत असे. न दिसली तर ओढ लागत असे.

भार्गव जेवायला बसला की, उमा स्वत: उभी राहून त्याला वाढीत असे. अगदी विनबोलक्या आग्रहानं. त्या क्षणी भार्गवचं मन सुखावून जाई. त्याचं अंतर्मन गोजारलं जाई. लगेच त्याला जाणीव होई. दासबोधाची पानं डोळ्यापुढं वटारलेल्या अक्षरांत फडफडू लागत. तो स्वत:वरच संतापे. स्वत:च्या मनाला कठोर शब्दांच्या चाबकाखाली रक्ताळून काढी. गडाच्या एखाद्या कड्यावर जाऊन तो आभाळाकडे पाहत चित्त शांत करण्याचा प्रयत्न करी. कळवळून रामाचा धावा करी ओठ न उघडता. दोन दोन तास असा बसे. मन शात करी अन् विजयाच्या आनंदात परत फिरे.

परंतु पुन्हा चार दोन तासांत बंड उमे, उमा दिसली की ! न दिसली तरीही !

काही महिने उलटले. हे असंच चालू होतं. कधी कधी वैतागून त्याला वाटे नकोच इथं राहणं ! चालत व्हाव ! अन् खरोखर एके दिवशी त्यानं पहाटे तयारीही केली पळून जाण्याची! तो वाट बघत राहिला सूर्योदयाची. त्यापूर्वी गडाचे दरवाजे उघडले जात नसत ना ! आपली कामं आटपून तो बसला. हा गडावरचा आता शेवटचा दिवस ! त्यान पोथी वाचून संपवली. काखेत आपली वस्त्रं अन् पोथी घेऊन तो निघाला. अन् त्याला वाटल शेवटच एकदाच, दुरून उमेचं दर्शन घ्याव ! काय हरकत आहे ? अखेरचंच दर्शन. तो निघाला. उमा आपल्या दालनात शिवदेवाशी बोलत होती. तिचा गोड शब्दरव भार्गवच्या कानी पडला. तो भिंतीशी थबकला.

"भार्गवरामानी आपलं सारं घर जिंकून टाकलंय. गाईवासरांना अन् फुलझाडानासुद्धां त्यांचा लळा लागला आहे. ते नोकर आहेत असं वाटतच नाही ! अगदी घरातलेच !...

भार्गवरामानं मुकाट्यान पोथी जागच्या जागी नेऊन ठेवली ! घागरी घेऊन तो पाणी भरायला गेला !

आणि त्याला वाटल, आपण अगदी मूर्ख आहोत ! वावळट आहोत ! उमा आपल्यावर एवढं प्रेम करते अन् आपण हे कुलूप ठोकून बसलो आहोत ओठाला ! आपल्या मौनाचा त्याला राग आला.

आता त्याला वाटू लागलं की, आपण उमेपासून मुद्दाम दूर दूर राहण्याचा यत्न करूच नये. जे व्हायच असेल, घडायचं असेल ते घडेल ! न ठरलेली कामही तो करू लागला. गाईच्या धारा उमा काढीत असे. एके दिवशी त्यानं स्वत: उमेच्या हातातील चरवी घेतली. ती नको नको म्हणत असताही त्यानं धारा काढल्या. अन् मग रोजच.

त्याचे मनोविकार पान्हवले जाऊ लागले. कधी नव्हतं ते मादक हास्य त्याच्या ओठावर येऊ लागलं. भिंतीवर टांगलेल्या मोठ्या थोरल्या आरशापुढं त्याची आवर्जून नजर थबकू लागली. आपण काही तरी आपल्या व्रतावेगळं करीत आहोत हा विचार अगदी नकळत—सायंकाळी सूर्यप्रकाश मावळत जावा तसा, मावळत चालला. जपजाप्य अन् पोथीवाचन केवळ औपचारिक बनलं ! मौन उरलं ते केवळ भिडेपायी ! सोडलं तर, लोक काय म्हणतील ह्या भीतीपायी !

तो देवघरात घावळीवर झोपे. अगदी अशात, अस्वस्थ. हजारदा त्याच्या मनात विचार येई की, असच उठावं अन्—उमा तिच्या दालनात एकटी आहे ! पण ह्या विचारान तो गोंधळून जाई. तोंडावरून पाघरूण घेऊन पडे. स्वप्नात अनेकदा उमेबरोबर तो मनसोक्त बोलत बसे. हसे. खेळे. जागा झाला की वस्तुस्थितीची जाणीव होऊन तो उदास होई. कधी कधी खडबडून जागा होई ! क्षणभर अपार दु:खी होई. पश्चात्तप्त होई. त्याच्या ओठातून अस्फुट आरोळी उठे, 'हे राम ! '

पण हेही क्षणभरच. पुन्हा तो त्याच्या मनात दह्याचा डेरा घुसळणाऱ्या उमेसह मनोराज्यात मग्न होई.

एके दिवशी रात्री तो असाच देवघरात निद्रेची आणि उमेची आराधना करीत पडला होता. नोकर चाकर आपआपल्या स्थळी विसावले होते. बाहेर गोठ्यात कडवा चुरचुरत होता. घुंगरं किणकिणत होती. रातकिडे किरकिरत होते. बाकी सामसूम होती. देवडीवरचा पहारेकरी चिलीम फुकत मधेच ठसकत होता, तेवढीच काय ती माणसाची चाहूल. शिवदेवराव बालेकिल्ल्यावर किल्लेदाराच्या वाड्यावर खलबतासाठी गेल्याच भार्गवला माहीत होतं. काळोख दाट होता. उमा आपल्या दालनात जागी होती. समईच्या उजेडात ती हाताला मेंदी लावीत बसली होती. उमा एकटी आहे हे भार्गवला माहीत होतं. त्याचं मन स्वैर सुटलं. धावत सुटलं वादळाच्या वेगानं. त्यानं पाघरूण सारून टाकलं. उठला. त्याची नजर देवघरात भिरभिरू लागली. नदादीपाच्या उजेडात देव्हाऱ्यातील देव फुलाच्या गर्दीत शांत उभे होते. कडेला चौरंगावर ठेवलेल्या रामायणाच्या व दासबोधाच्या पोथीवर देव्हाऱ्याच्या खावाचा अंधार पडला होता. भार्गवन इकडे तिकडे पाहिलं. देवापुढचा पाण्यान भरलेला तांब्या आणि फुलपात्र त्यानं उचलल आणि तो उमेच्या दालनाकडे निघाला. छाती धडधडत होती

तो दाराशी आला. समई तेवत होती. एका सुदर कमलाकृती पेल्यात मेंदी कालवलेली होती. घागऱ्याचा घोस लावलेल्या नक्षीदार

शलाकेनं उमा आपल्या उजव्या हातानं डाव्या तळहातावर मेंदीनं काही तरी नक्षी रेखीत होती. तिचा खोपा, केसाच्या वटा, भिवया, रेखीव हनुवटी, जिवण्या अन् सारा बांधाच अतिशय रेखीव दिसत होता. ती पालथी माडी घालून बसली होती. तिची डौलदार सावली भिंतीवर पडली होती. ती आपल्या कलाकृतीत तल्लीन झाली होती. शलाकेला लावलेला धाग्यांचा घोस डुलत होता. तिच्या बोटातील मोहरेची अंगठी हळूच लकाकत होती, क्षणभर तिच्याकडे भार्गव पाहातच राहिला. ती मधून मधून, तळहातावर रेखलेल्या रंगावलीकडे माना वळवून बघत होती. ती हालचाल विलक्षण मोहक होती. आपलीच कला पाहून तिला किंचित् हसू फुटे. गालावर गोड खळी पडे. तिची कला पाहून समईची ज्योत माना डोलवीत होती.

भार्गवनं आवंढा गिळला अन् आत पाऊल टाकलं. उमेनं चमकून वर मान केली. तिची उजवी भिवई जरा वर सरकली. हात थबकले. भार्गव पुढं गेला. तिनं विचारलं,

"काय हवय ?"

त्याला सबंध उमाच हवी होती. पण तिच्या प्रश्नाला काय उत्तर द्याव–खुणेनं !–ते त्याला समजेना. तो गोंधळलाच. त्यानं ताम्याफुलपात्र पुढं करीत खुणेनं म्हटल, 'हे आणलय !'

"पण मी आणलं होत पाणी ! तुम्ही कशाला आणलत ? उगीचच हेलपाटा पडला. साऱ्या दिवसभर किती कष्टं करता ! आणलंच आहेत तर ठेवा. अन् अगदी शांत झोपा. फार पहाटे उठता तुम्ही".

सारा बेत धडावला ! भार्गव ताम्या ठेवून मुकाट्यानं परतला. आपण हे काय केलं याचा त्याला अन्वयार्थच समजेना. तो देवघरात आला. भिंतीवरच्या आरशाकडे त्याचं लक्ष गेल. नंदादीप आणि आरसा यांच्यामध्ये तो उभा होता. आरशात त्याचा चेहरा काळा दिसत होता. त्यानं एकदम मान फिरवली. दासबोधावर अंधार पडला होता. पण त्यावर वाहिलेल्या मोगऱ्याच्या फुलाचा सुगंध दरवळत होता. नंदादीपाची ज्योत माना वेळावीत त्याला वेडावून दाखवीत म्हणत होती, 'अहा रे वेडपट !' ती सुगंध उधळणारी मोगऱ्याची फुलं अंधारातूनच पुटपुटत होती, 'विवेके क्रिया आपुली पालटावी ! अती आदरे शुद्ध क्रीया धरावी ।।'

भार्गवनं एकदम अंथरुणात घुसून पांघरूण डोक्यावरून घेतल.

उमेला आश्चर्य वाटत होतं भार्गवचं. कधी नव्हे तो अशा वेळी भार्गव आपल्या दालनात पाणी घेऊन कसा आला ! तिचं मन तिला म्हणालं, 'अग, भार्गवची फार फार माया आहे तुझ्यावरं !

रंगवलेला हात माडीवर उताणा ठेवून उमा पलंगाला टेकली. ती जमिनीवर बसलेली होती. तिन उजवा दंड पलंगावर ठेवला


भरपूर कॅल्शियमयुक्त

**बिटको**

**ग्राइप**

नेहमी दिल्याने

लहान मुले सशक्त बांधेसूद

व गुटगुटीत होतात.

अत्यंत लोकप्रिय

**बिटको**

**काळी टूथ पावडर**

नेहमी वापरल्याने

दात मोत्यासारखे स्वच्छ

व चकचकीत होतात.

**बिटको केमिकल इंडस्ट्रीज, नाशिक रोड**

अन् त्यावरच डोकं ठेवून ती पडली. न कळत तिला झोप लागली.

मध्यरात्री शिवदेवराव बालेकिल्ल्यावरून परतला. उमेला बसल्या बसल्या गाढ झोप लागली होती. पलगावर ठेवलेल्या उजव्या दंडाचं तिनं उसं केलं होतं. मेंदीचे ठिपके दिलेला डावा हात तसाच उताणा होता. शिवदेव तिच्याकडे पाहात उभा राहिला; तो अगदी हळूच जवळ आला. त्यानं तिच्या केसावरून हळूवारपणे हात फिरवला. अन् ती दचकून जागी झाली. त्यानं पटकन् दिवा मालविला !

सकाळ झाली अन् चार घोडेस्वार दौडत आले. गडावरून सारेजण टवकारून पाहू लागले. स्वार गडावर आले. त्यानी भयकर बातमी आणली होती. बालेकिल्ल्याच्या सदरेवर किल्लेदार आणि शिवदेवराव यांच्या सदरेवर स्वारानी तडक धाव घेतली. मुजरे केले अन् खबर सागितली की, पुण्यावर मोगलांची प्रचंड फौज आली असून एक दोन दिवसात पुरंदरगडालाही त्याचा गराडा पडणार आहे ! फौज अफाट आहे ! साज सरजाम जगी आहे ! तोफखाना मातबर आहे !

तावडतोब गडावर ही खबर पसरली. एकच धावपळ सुरू झाली. तोफाचे मोर्चे जय्यत तयार होऊं लागले. मेटकऱ्याना इशारे गेले. धान्य आणि दारूगोळ्याची तातडीनं जादा तरतूद सुरू झाली. चोवीस तास सर्वांगाला टेहळणी आणि गस्त सुरू झाली. प्रचंड तोफाचे गाडे जमीन दववीत हलू लागले. हुकुमांच्या आरोळ्या करड्या आवाजात उठू लागल्या. स्वारांची दौड सतत सुरू झाली. दरवाजे बद झाले. शिंगांच्या आवाजावर इशारे आणि खुणा सुरू झाल्या. किल्लेदाराला आणि सवनीस शिवदेवरावाला क्षणाचीही उसत मिळेनाशी झाली.

उमेला ही मोगली चढाईची खबर शिवदेवरावानं सागितली. तो घाईगर्दीत इतकच म्हणाला,

"घर तू साभाळ !"

"गड तुम्ही सामाळा ! घराची काळजी करूच नका ! मी आणि मार्गव आहोत घराचा व्याप सांभाळायला !

शिवदेवला फार बर वाटलं हे ऐकून.

मार्गवला फार आनद झाला हे ऐकून. आता ह्या धामधुमीत गडाला वेढा पडणार याचं त्याला काहीच वाटलं नाही. उमेभोवती आपला वेढा कसा घालावा याच विचारात तो गुंग झाला. उमेच्या रोखानं त्याचे मोर्चे बोटाबोटानं पुढं सरकत होते !

त्याच दिवशी भर दुपारी कऱ्हेपठारावर धुळीचे प्रचड लोट उठले. शुत्तरस्वारांच्या हातातील मोंगली झेंडे फडफडत पुरंदरच्या रोखान दौडत येताना गडावरून दिसू लागले. गडावर एकच आरोळी उठली 'गनीम आला ! गनीम आला ! !' ऐन वेगात येत असलेला पहिला हल्ला मारून काढण्यासाठी गडावर एकदम धामधूम सुरू झाली. तोफा ठासून तयार होऊ लागल्या. बंदुकीच्या नळ्या टवकारल्या गेल्या. प्रत्येक मोर्च्याची पाहणी करीत शिवदेवराव घोड्यावरून गडाच्या सर्व कडेकोटावर दौडू लागला. नगारे दणाणू लागले. गड दड ठोकून झुजीसाठी सज्ज झाला. गर्जू लागला, 'येळकोट जय मल्हाऽऽर !'

उमा शेंदऱ्या बुरुजावरून मोंगलांची प्रचंड टोळधाड बघत होती. चार पावलं दूर होता मार्गव. धुळीचे लोट पुढ पुढं सरकत होते. एकदम उमेच्या मनात काही कल्पना आली. ती लगेच मार्गवला म्हणाली,

"मार्गवराव, चला वाड्यात जरा !"

वाड्यात आल्यावर तिन तिजोरीचं कुलूप काढलं. दागिन्याचा डबा काढला. इतर चादीसोन्याच्या व जडावाच्या वस्तू काढल्या. एका चौपदरीत तो सारा ऐवज बाघला अन् अगदी चोरट्या आवाजात मार्गवला म्हणाली,

"ह्या धामधुमीत ही सारी चीजवस्त व रोकड गुप्त जागी नेऊन ठेवणंच चागलं नाही का ? कारण केव्हा अचानक वाडा सोडून बालेकिल्ल्यात आपल्याला जाण्याची वेळ येईल याचा नेम नाही".

मार्गव मान हलवून अनुमोदन देत होता.

"म्हणून म्हणते, हा आत्ताच तळघरात नेऊन ठेवावा; आपल्या देवघराच्या खाली गुप्त तळघर आहे ! तुम्ही मशाल घेऊन चला, मी हे सामान घेते. चला !"

मार्गवच्या डोक्यात चक्रं जोरजोरात फिरू लागली. गडाच्या रोखानं येणाऱ्या मोगली तोफांच्या चाकापेक्षांही ! त्यान देवडीवरची मशाल आणली. उमेनं तीवर पळीभर तेल घातलं, मार्गवची मशाल पेटली. उमेनं, चीजवस्त घेतली. ती आणि मागव देवघरात आली. तिनं देवघराचं दार आतून बंद केलं. कडी घातली. मार्गवच्या अंगावर रोमांच उठले. उमेनं भिंतीवरच्या खुटीवर निऱ्या करून ठेवलेला पीतांबर खाली काढला. ते जरीचं वस्त्र सळ्ळकन् निसटलं, सगळ्या निऱ्या विस्कटून ते खाली पडलं. तिनं ती खुंटी खूप जोरात दावली. कर् कर् कर् असा आवाज करीत तळघराच दार उघडलं गेलं. आत अंधार, अगदी दाट दाट होता. दार अगदी खुजं होतं.

"तुम्ही मशाल घेऊन पुढं व्हा. मी मागोमाग येते ! खाली उतरायला पायऱ्या आहेत."

मार्गवनं मशाल घेऊन आत पाऊल टाकलं. तळघराची बांधणी चिरेबदी होती खुट् वाजलं तरी तो आवाज घुमत होता. मशालीचा तेलकट जळका वास नाकात भरत होता. तिच्या तांबूस पिवळ्या उजेडात ती तळघराची उतरती वाट जास्तच गूढ वाटत होती. वीस पंचवीस पायऱ्या उतरून गेल्यावर खाली विस्तृत दालन होत. तिथं तलवारी, भाले, बुधले, मोठमोठी ताब्यापितळेची मांडी ठेवलेली होती. मार्गव बाजूला झाला. उमा पुढं झाली. तिनं आपल्या हातातील जडजोखीम एका कोनाड्यात ठेवली. अन् ती मागं वळली. मशालीच्या उजेडात उमा फारच सुदर दिसत होती. फारच सुंदर ! मार्गव कमालीच्या भुकेल्या नजरेनं तिच्याकडे टक लावून बघत होता. त्याच्या मस्तकात प्रचंड वादळ फुंफाटत होतं. तिथं इतका थंडावा होता, तरीही मार्गवच्या अंगावर दंव फुटल होतं. ती दोघंही इतक्या चिरेबंदी एकातात आली होती की, तिथं बदूक उडाली तरी तिचा आवाज बाहेर पोहोचणं अशक्य होतं. मार्गवच्या छातीत धडधड होत होती. उमेनं म्हटल, 'चला !' अन् ती पायऱ्या चढू लागली. दोन तीन पायऱ्या चढली अन्—अन् मार्गवनं तिचा एकदम उजवा हात धरला ! तिनं विजेसारखं वळून मागं पाहिलं. मार्गव ? मार्गव ? होय मार्गव ! त्याच्या डाव्या हातातल्या मशालीच्या उजेडात त्याची विशाल छाती खालीवर होताना दिसत होती. त्याचे डोळे तावारले होते. ओठ हसायचा प्रयत्न करीत थरथरत होते. आपला हात सोडवून घेण्याचा यत्किंचितही प्रयत्न तिनं केला नाही! ती त्याच्याकडे टक लावून चित्रासारखी बघतच राहिली. तिचा हात आपल्या छातीकडे

घेत भार्गव म्हणाला,—होय, भार्गव बोलला!—

" उमा, मला तू फार फार आवडतेस! माझा तुझ्यावर अतिशय जीव आहे!"

" माझाही!"

" उमा!"

भार्गव हसला. विलक्षण आनंदला.

" पण असा नाही! मी उमा आहे ह्यांची!—

उमेनं आपला डावा तळहात एकदम भार्गवसमोर केला. त्यावर मेंदीनं लिहिलं होतं, ' शिवदेव '! भार्गवनं ती अक्षरं वाचली. त्याचे डोळे त्या अक्षरावर नाचतच राहिले. शि–व–दे–व! शि–व–दे–व! उमा भार्गवकडे डोळे रोखून बघत होती. तिनं डावा पजा तसाच समोर धरलेला होता. भार्गवला ती तिची नजर बघवेचना. जणू तिच्या डोळ्यात दोन मशालीच भडकल्या होत्या. ती आग त्याला सहन होत नव्हती. तो घामानं डबडबला होता. त्याची बोटं सैल पडत होती. आपोआप त्याच्या हातातून उमेचा हात सुटला. ती झटकन् वळली. न बोलता झपझप् पायऱ्या चढून निघून गेली. दिसेनाशी झाली. मशाल जळतच होती. भार्गवही जळत होता. पश्चात्तापानं! त्यानं ती धगधगलेल्या मशालीची आग आपल्या उजव्या हातानं दाबली. जसा त्यानं उमेचा हात दाबला होता ना, तशी. मशाल विझली. तो वर आला त्यानं तळघराचा चोर दरवाजा बद केला अन् चौरगावरच्या दासबोधाच्या पोथीला दोन्ही बाहूत कवळून तो आपलं मस्तक दासबोधावर घुसळू लागला. त्याची खात्री झाली होती की, शिवदेवराव घरी आल्यावर आपला घात होणार, कदाचित् कडेलोट! कदाचित् तोफेच्या तोंडी–! किती तरी वेळ तो तसाच बसला होता.

गडाच्या पायथ्याशी मोगली फौजा यऊन थडकल्या होत्या. तोफा-बंदुकाच्या फैरी दणाणत होत्या. रणवाद्याचा कडाडा चालू होता. लोक ओरडत होते.

भार्गव खिन्न मनानं उठला. सर्वस्व गमावलेल्या धनिकासारखा उदास झाला होता तो. माचीच्या तटावर तो आला. खालून गडावर अन गडावरून खाली मारा चालू होता. प्रत्येकात आवेश सचारला होता. एका मोर्च्यावर खुद्द शिवदेवराव बदूक घेऊन मारगिरी करीत होता. भार्गव शरमेन करचळून गेला होता. त्याची नजर शेंदऱ्या बुरुजाकडे गेली. उमा होती तिथं! बंदुकीनं तीही मोगलावर आग उधळीत होती. सारा गड गरगरा अंगामवती फिरतोय असा त्याला भास होत होता. तो शिवदेवराव, ती शूर माणसं, ती शूर उमा, तो शूर येसनाक, तो शूर शेंदऱ्या बुरुज, गडाच्या कल्याणासाठी शेंदऱ्या बुरुजात जिवत गाडली गेलेली ती कोवळी पोरं त्याला दिसत होती. प्रत्येकाशी स्वत:ची तो तुलना करीत होता. स्वत.चाच जबाब त्याला मिळत होता, ' नामर्द! नालायक! बेवकूब! नादान! हरामखोर! तुझी तुलना होईल फक्त त्या बहिरी ससाण्याशी! गडासाठी झुजणारी ही माणसं बघ! आणि तू–?'

अशीच रात्र झाली. उमान भार्गवच पान वाढलं. पण भार्गव देवघरातच बसून राहिला. रोज उमा त्याला बोलावीत असे. आज कुळंबिणीन बोलावलं. तो आला नाही. न जेवताच झोपला.

" न जेवता झोपू नये माणसान! वाढलंय मी!"

उमेचे शब्द ऐकून तो उठून बसला. त्याला वर बघवत नव्हत. मघा सतापलेली ही उमा इतक्या आर्जवानं बोलते आहे हे त्याला खरंच वाटेना.

" जर तुम्ही जेवला नाही, तर मीही जेवणार नाही! चलणार ना? चला! मी थाबलेय्!"

एवढं बोलून उमा स्वयपाकघराकडे निघाली. भार्गव तिच्या चालत्या पावलांकडे बघतच राहिला. त्याच्या डोळ्यातून पाणी ओघळलं. तो उठला. खालच्या मानेनं पानावर बसल:. जेवला. तो फार फार उदासला होता. त्यानं कसबस तिच्याकडे पाहिल. ती म्हणाली,

" मी ना? स्वारी घरी आली की, त्याच्यानतर जेवेन!"

भार्गवला तिच ते प्रेमच असह्य होत होतं. त्यापेक्षा गोळी घालून तिनं मारावं आपल्याला, म्हणजे प्रायश्चित्ताच तरी समाधान लाभेल, अस त्याला वाटत होतं.

भार्गवला रात्रभर झोप लागली नाही. मध्यरात्रीनतर शिवदेवराव घरी आला. अतिशय अस्वस्थ होता तो. उमेन आग्रह केला तरीही तो जेवला नाही. तासाभरानं पुन्हा तो मोर्च्यावर निघून गेला.

सकाळ झाली. भार्गव गंध उगाळीत होता. चदन झिजत होतं. सुवास सुटला होता. त्याच्या कानावर गगालहरीचे श्लोक पडत होते. उमा म्हणत होती. श्लोकांचा आशय होता, ' हे गगे, तू सर्व पापनाशिनी आहेस.' भार्गवनं द्रेव्हाऱ्यातील गंगापात्र उचललं. ताकद लावून ते उघडलं अन् भाजलेल्या उजव्या हातानं त्यानं गंगेचं आचमन घेतलं. जाळीतून उमेनं ते पाहिलं!

शिवदेव घरी आला. रात्रीहूनही तो जास्तच बेचैन होता. अतिशय अस्वस्थ. तिनं त्याला विचारलं,

" सांगाव ना मला, काय झालंय ते! का इतके अस्वस्थ? मी नाही का काही करू शकणार?"

" हु:? मोठी मोठी खदी माणसंही असा प्रसंग आला तर हतबुद्ध होतात! काय करायचं ते मीच स्वत: केलं पाहिजे!"

" पण असं झालय तरी काय? सांगावं ना!"

" सागू? काल मला रात्री पक्की बातमी कळलीय—"

" अगबाई! कसली?"

" गडाखाली मोगलान वीस खडी दारूगोळा आणून रिमटिंगीच्या वडाजवळ ठेवला आहे. जर तो दारूगोळाच आपण पेटवून दिला तर मोगलाची निम्मी तरी ताकद खच्ची होईल!"

" इश्श! मग त्यात एवढ कठीण काय आहे?"

" आं? कठीण नाही? दारूगोळा उडवायचाय दारूगोळा! जो कुणी जाईल तो दारूगोळ्यापर्यंत पोहोचणच मुळात कठीण! जर पोहोचलाच तर तो उडवणं कठीण! अन् उडवलाच तर उडवणारा वाचण कठीण! चिंधड्या उडतील!"

" मग असा बहादूर गडावर एकही नाही?"

" अजून तरी नाही! तो पटाईत हवा, जिवावर उदार हवा! कुणीही बहादूर हवा, मिळत नाही! मी चिंताक्रांत आहे!"

" पुरंदरची पुण्याई सपली? एक असा जोहाराचा वीर मिळू नये? मग मी देते एक असा वीर!'

" तू? कोठून देणार? कोण?"

" शूर! धाडसी! कल्पनाही करता

येणार नाही असं धाडस करणारा ! "

"हं ? कोण ? कोण ? नाव सांग ! "

"सांगू ? आपल्याकडे पाणी भरणारे भार्गवराम ! "

"काय ? तो पाणक्या ? हाः हाः हाः हाः ! "

"हसू नये काही ! बघावीच परीक्षा स्वारीनं ! "

"अग, जन्मांत ज्याला शिपाईगिरीचा वारा लागलेला नाही तो हा मरणाशी खेळ खेळेल कसा ? तो एक पाणक्या ! "

"आपण परीक्षाच पाहावी. खात्री आहे माझी ! "

"इतकी खात्री ? कशावरून ? "

"हं, तेवढं मात्र पुसू नये !"

"ठीक आहे ! बोलवा त्याला ! "

क्षणभरात भार्गव मान खाली घालून आला. उमेनं त्याला म्हटलं,

" भार्गवराम, एक कामगिरी कराल ? "

तिचे हे शब्द ऐकून त्यानं उत्सुकतेनं वर बघत होकारार्थी मान हलवली.

"गडाखाली शत्रूचा वीस खंडी दारूगोळा त्यांच्या छावणीत दाखल झाला आहे. तो दारूगोळा हरकरामतीनं पेटवून द्यायचा ! जमेल ? मृत्यूशी खेळ आहे ! जमेल ? "

भार्गवनं एकदम छाती काढून आपली मूठ छातीवर आपटली व त्याची मुद्रा न्यायाच्याच तेजानं फुलली !

" शाब्बास ! "

शिवदेवराव आश्चर्यानं हे सारं बघतच राहिला.

मध्यरात्र झाली. हेरांनी त्याला साऱ्या जागा आणि खाणाखुणा आधीच समजावून दिल्या होत्या. भार्गव निघाला. देवघरात त्यानं दासबोधावर मस्तक ठेवलं. उठला. वळला. उमा ताम्हनात निरांजन घेऊन उभी होती. तो फार फार सुखावला. गहिवरला. तिनं त्याला ओवाळलं अन् म्हणाली,

" भार्गवराम, यश घेऊन या ! मी अशीच वाट बघत्येय तुमची ! "

तो गडावरून उतरला. उमा शेंद्र्या बुरुजावर उभी होती. अवघ्या गडाच्या नजरा शत्रूच्या छावणीवर खिळल्या होत्या. दारूगोळा उडताच गडावरून उतरून हल्ला करण्याकरता सारे सज्ज झाले होते. शिवदेव स्वतः जातीनं चाल करणार होता.

क्षणाक्षणाला आतुरता वाढत होती. सर्वत्र भयाण काळोख होता. छात्या धडधडत होत्या. जास्तच धडधडू लागल्या अन् एकदम अस्मान फाटलं ! धडाड् धडाडाडाडाऽऽ आवाज फुटला ! लख्खकन् सारं कऱ्हेपठार उजळलं ! भयंकर भडका उडाला ! एवढा भयानक कल्लोळ उडाला की दरीखोरी कोंदून गेली. तावडतोब गडावरून शिवदेव आणि त्याची फौज मोंगलावर तुटून निघाली. रणकल्लोळ ! मोंगलांची दाणादाण उडाली. सारी छावणी उधळली गेली. साऱ्या रात्रभर हाच धिंगाणा.

उजाडलं. शिवदेव फौजांसह गडावर ओरडत गर्जत आला. उमा शेंद्र्या बुरुजावर उभी होती. ती सामोरी गेली. अन् मागोमाग गडावर आली एक डोली ! उमा झरकन् जवळ गेली. सर्व अंगी भाजून निघालेला भार्गव डोलीत होता ! अवस्था कठीण होती. मोठ्या कष्टानं उमानं हुंदका आवरला. ती पळतच वाड्यात गेली. तिनं देव्हाऱ्यातील गंगा आणली, भार्गवचे ओठ विलग करून तिनं त्याच्या मुखी गंगोदक घातलं. क्षणभरानं भार्गवनं डोळे किलकिले केले. उमेच्या डोळ्यांतून पाणी निसरत होतं. तिनं त्याला पुन्हा गंगोदक घातलं. अगदी अलगद त्याचे ओठ हलले. हसण्याचा तो शिकस्तीचा प्रयत्न होता. घायाळ झालेले हात थरथरत उचलून त्यानं उमेला कसाबसा नमस्कार केला अन् एकदम त्याची मान आणि हात निर्जीव होऊन कलंडले !

शिवदेवरावानं भार्गवला मुजरा केला आणि आपल्या कमरेचा शेला त्याच्या अंगावर पांघरला.

सायंकाळी उमा शेंद्र्या बुरुजावर उभी होती. शिवदेव तिच्या शेजारी केव्हा येऊन उभा राहिला हे तिला समजलच नाही. गंभीरपणे तो म्हणाला,

" मला मोठं गूढ आहे. भार्गवसारख्या पाणक्यानं एवढं बिलक्षण धाडस करावं ? तू कोणत्या गोष्टीमुळं भार्गवची अशी अचूक पारख केलीस ?"

" तेवढं विचारू नये ना स्वारीनं ! "

"नाही ! सांगच तू ! काय हरकत आहे? सांग, सांग !"

" नको ! आपण भार्गवरामावर रागवाल ! गैरसमज करून घ्याल !"

" कसं शक्य आहे? उदंड पुण्याईचा धनी होऊन गेला होता तो ! त्याच्या कुर्बानीला तोड नाही. मोल नाही. मीच काय, पण छत्रपतीही मुजरा करतील त्याला ! पण हे धाडस त्यानं केलं कसं ? सांग–! "

शिवदेवनं आग्रह धरला. हट्टच धरला. तेव्हा ती म्हणाली,

" माझ्यावर विश्वास आहे ना स्वारीचा?"

"कधी नव्हता ? तुझा मात्र माझ्यावर नाही !"

"नका ना असं बोलू ! सांगत्ये मी–"

आणि उमानं तळघरातली सारी हकीकत त्याला सांगितली. त्याला आश्चर्य वाटलं.

" त्यानं असं केलं ? तुझा हात धरला ?"

"हो ! म्हणूनच मला वाटलं की, स्वारींच्या ह्या उमेला स्पर्श करण्याचं धारिष्ट ज्याला झालं, तो दारूच्या कोठारावर ठिणगी टाकायचं क्षुल्लक धारिष्ट तर सहजच करू शकेल !"

• • •





## माघवारा

दि. बा. मोकाशी

माघातला वारा सुटला आहे.
संध्याकाळचा.
रात्रीचं पाणी चढून पहाटे ती धार घेईल.
पण तुला ती कळणार नाहीं
तू थंड झाला आहेस.
मी कुडकुडत तुझा हेवा करतो.
कारण तुला अग्नीचा शेक मिळणार आहे.
तुझा थंडपणा जाईल
मी कुडकुडत चाललो आहे.
कापणारी पहाट दिसते आहे.
हेवा करीत मी पुढे जातो
आपली तोंडं एकाच दिशेला आहेत.
मी पुलाशी थांबेन
तू पलीकडे जाशील.
पुलाच्या कमानीखाली मी राहतो.
अग्नीचा चटका तुला सुखाचा वाटेल
माझ्या मनात येतं.
पण पुढे तुझं काही उरणार नाही.
फक्त राख.
दाही दिशा राख पसरली जाईल
काही पाण्यात-काही वाऱ्यावर
काही पायतळी.
हे मनात येतं मला बरं वाटतं
राखेच्या कणाकणानं तुला भोगावं लागेल
थंडी पाऊस ऊन.
मी पुलाच्या कमानीखाली जाईन.
वारा अडवून तीन दगडांची चूल पेटवीन
अल्यूमिनियम भांड्यात चहा ठेवीन.
तरट सोडून भिंत करीन–झोपेन
मला ते व्हायला नकोय
जे तुला झालं.
मी राख होऊन देणार नाही.
मी त्याच्याशी लढेन
मला लढलंच पाहिजे त्याच्याशी
जो कोण आहे त्याच्याशी

## कलहान्तरिता

ऐसे रागावून जाणे
सखि, कधीही सोपे नसते
प्रीतीने मंतरलेले
ते वेड जिवाला असते.

कधि पहाटवेळी फिरता
वळणावर पाउल अडते
अन् पौर्णिमेत बुडताना
चांदणे नकोसे होते.

जाईच्या वेलीखाली
श्वासांना भोवळ येते.
त्या पहिल्या भेटीमधले
गंधातुन गुपित उकलते.

पावसात भिजल्या वेळी
ओलेपण व्याकुळ होते
अन् हसलेले...रुसलेले
पापण्यांत साचुन येते.

ते दूर दूर तव जाणे
सखि, जवळपणाला भिडते !
या विरक्त रागामधुनी
अनुरागफूल दरवळते !!

—दत्ता हलसगीकर

# मानसोपचारतज्ञ

# डॉ. बी. एम्. डेब सिकदार

**एका धाडसी जीवनाचा आलेख**

**लेखक : एम्. ए. कुलकर्णी**

सांगली–मिरज रस्त्यावर डॉक्टर सिकदार यांनी उभारलेले 'कृपामयी नर्सिंग होम' हे लवकरच एक यात्रेचे ठिकाण व्हावे! कारण एका वर्षाच्या आतच या नर्सिंग होममधून एक हजार मानसिक रोग्यांवर यशस्वीपणे उपचार करण्यात आलेले आहेत. मनोविकारांचे सूक्ष्म पृथक्करण करून येथे उपचार करण्यात येत असल्याने या मानसोपचार केंद्राची अगदी थोड्याशा अवधीतच भरपूर प्रसिद्धी झालेली आहे. महाराष्ट्र, म्हैसूर, उत्तर प्रदेश, गुजराथ, मध्य प्रदेश, आंध्र, गोवा वगैरे लांबलांबच्या भागांतून येथे रोगी येत असतात. डॉक्टरांच्या हाताला फार मोठे यश लाभलेले आहे यात शंका नाही.

या यशामागच्या परिश्रमांची आणि निदिध्यासाची ही रोमांचकारी कथा.

दिनाक १४ ऑगस्ट १९४६ चा दिवस. बगाल असेब्लीतील विरोधी पक्षाचे नेते श्री. फजलुल हक्क याच्या अध्यक्षतेखाली कलकत्यामध्ये विरोधी पक्षाची बैठक भरलेली होती. बैठकीपुढे काही राजकीय महत्त्वपूर्ण विषय होते. सर्व सभासद बैठकीत नुकतेच स्थानापन्न झाले होते. विचारविनिमयाला सुरुवात होणार तोच दारावरील पहारेकरी (दरवान) आणि त्याच्यापाठोपाठ एक सोळा सतरा वर्षांचा मुलगा–दोघेही एकमेकाना ढकलीत आत येऊन कोसळले. सर्व सदस्याच्या नजरा या अकल्पित प्रकाराने दाराकडे वळल्या. फजलुल हक्कनी दरवानाला दरडावून विचारले, "काय रे, हा काय मामला ?"

"साव, ये छोकरा जबरदस्तीसे अंदर आ गया !" दरवानाने सागितले.

तोवर तो मुलगा हक्कसाहेबांच्या पुढे येऊन उभा राहिला. त्याने सर्वांना नम्रतापूर्वक नमस्कार केला नि सागितले, "साहेब, क्षमा असावी. मी आपली भेट घेण्यासाठी कालपासून सारखा चकरा मारतोय. हा दरवान दाद लागू देत नाही आणि आपली भेट काही होत नाही तेव्हा आता मी जबरदस्तीनंच आत आलो हे खरं. माफी असावी. माझं आपल्याकडे महत्त्वाच काम आहे."

फजलुल हक्कसह सर्व सदस्य त्या मुलाच्या धिटाईबद्दल चकित होऊन गेले. त्याचा चुणचुणीतपणा, त्याचे लडिवाळ बोलणे, रुबाबदार व्यक्तिमत्त्व पाहून हक्कसाहेबही चाट पडले होते. ते किंचित हसून म्हणाले, "पोरा, पण ही भेटायची वेळ नव्हे. आत्ता सध्या इथ मीटिंग चालू आहे. तू उद्या ये वरं !"

सर्वांना वाटले मुलगा आता परत जाईल. परंतु तो तिथून हलायला तयार नव्हता. आता तर तो अधिकच धिटाईने सफाईदार इंग्रजी भाषेत आपली हकीकत सागू लागला—

"साहेब, मी फार लांबून आलोय. मला इथल्या मेडिकल स्कूलमध्ये प्रवेश मिळवायचा आहे मी मॅट्रिक परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झालो आहे. हे माझं सर्टिफिकेट पाहा. हे मार्क बघा. या शहरात माझ्या ओळखीचं, मला मदत करणार दुसरं कुणी नाही. प्रवेश अर्ज भरण्याची उद्याची शेवटची तारीख आहे. मुलाखत घेणाऱ्या कमिटीचे १२ सभासद आहेत. त्याना आपण पत्र दिलीत तर फार मेहेरबानी होईल."

एखाद्या पोक्त माणसाप्रमाणे मुलगा व्यवस्थितपणे आपले मुद्दे माडीत होता. हक्कसाहेबानी मुलाचे मार्क पाहिले, प्रशस्तिपत्रे पाहिली–मुलगा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाला होता एवढेच नव्हे तर त्याला बहुतेक विषयात शेकडा ७० च्या पुढे मार्क होते. मुलाच्या हुषारीचे आणि धडाडीचे सर्वांनाच कौतुक वाटले. हक्कसाहेब पुन: एकवार हसून म्हणाले, "बाळ, ठीक आहे सारं. मी तुला पत्र देईन. पण उद्या ये. आता इथं सभा आहे. शिवाय माझा स्टेनोग्राफरही नाही इथं–उद्या ये तू वरं ! काय ?"

पण हे बाळ तिथून हलायला तयार नव्हते. अगदी खरखर मुंड्याप्रमाणे उभे होते. मुलगा अदबीने व आर्जवपूर्वक म्हणाला, "साहेब, उद्या पत्र मिळून काय उपयोग ? इटरव्ह्यू परवाच आहे. त्या समितीसदस्यांना मला भेटणं तरी शक्य होईल का ? त्याचे पत्ते मला माहीत नाहीत. आजच पत्रं द्या मला !"

अखेर हक्कसाहेबांना या छोकऱ्याच्या गोड हट्टापुढे माघार घ्यावी लागली. बैठकीतल्या सर्व सदस्याचाही तसाच आग्रह झाला. स्टेनोग्राफरला बोलावण्यात आले आणि हक्कसाहेबानी भराभर पत्रे लिहून दिली. मुलाखत घेणारे काही सदस्य असेब्ली समासद असल्याने त्यांना असेंब्लीतच गाठायचा सल्ला त्यानी छोकऱ्याला दिला. मुलगा हर्षभरित अत:करणाने सर्वांचे आभार मानीत बाहेर पडला. असेब्लीत गेला आणि तिथे त्याला काही सदस्य भेटलेही. हक्कसाहेबाची पत्रे त्याने त्याना दिली. काही सदस्य त्याला भेटू शकले नाहीत, कारण ते परगावचे होते. त्यांची पत्रे

मुलाने आपल्या खिशात ठेवली. त्याने रीतसर अर्ज भरला. मलाखतीच्या वेळी त्याचे नाव सर्वात प्रथम पुकारण्यात आले. मुलाखत उत्तम झाली आणि मुलाला कॅम्ब्रेल मेडिकल स्कूल मध्ये प्रवेश मिळाला.

हा धाडसी छोकरा म्हणजेच मिरजेत "कृपामयी नर्सिंग होम" चालवीत असलेले सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ. सिकदार होत. फजलुल हक्कसाहेबांची जी पत्रे न भेटलेल्या सदस्यांना डॉ. सिकदार तेव्हा देऊ शकले नाहीत ती पत्रे आजही त्यांच्या संग्रही आहेत.

डॉ. बी. एम्. डेब सिकदारांचे सबंध जीवनच मोठे चित्तथरारक आणि उद्बोधक आहे. त्यांचे नाव आज सबंध देशभर प्रसिद्ध आहे—अरबस्थानमधूनही काही रोगी त्यांच्याकडे उपचारासाठी येतात. इंडियन सायकॅट्रिक सोसायटीचे ते फेलो म्हणून निवडले गेले आहेत. अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय सायकॅट्रिक सोसायटीचेही ते सन्माननीय सभासद आहेत. कीर्तीच्या अत्युच्च शिखरावर असूनही त्यांचा स्वभाव निगर्वी, मोकळा, दयाळू असाच राहिला आहे. त्यांची धाडसी वृत्ती आहे तशी कायम आहे. पाणीदार मोठाले डोळे, रुबाबदार व्यक्तिमत्त्व, गोड बोलणे, मिस्किल हसणे यांच्या जोरावर रोग्यांचा निम्मा आजार ते पहिल्या दृष्टिक्षेपात कमी करून सोडतात अशी त्यांची ख्याती आहे.

डॉ. सिकदार यांनी बालपणी जे धाडस केले ते केले नसतेच तर ते कुठल्यातरी रेल्वे वर्कशॉपमध्ये यंत्राच्या खडखडाटात वावरत राहिले असते. त्यांचा परमेश्वरावर विश्वास आहे—रामकृष्ण मिशनचे ते निस्सीम भक्त आहेत. त्यामुळे ते आजपर्यंत मानीत आले आहेत, की प्रसंग आला की कुठून तरी अदृश्य शक्ती आपल्या सहकार्याचा हात पुढे करते. त्यांचा जीवनपटही अशाच घटनांनी भरलेला आहे—

## फाळणीनंतरची वाताहत

डॉ. सिकदार मूळ पूर्व बंगालचे रहिवासी. दोनशेहून अधिक माणसे असलेल्या एका बडया जमीनदाराच्या एकत्र कुटुंबात त्यांचा जन्म झाला. घरची दोन हजार एकर जमीन, मोठ्या बागा, मोठा वाडा, शेकडो जनावरे आणि भरपूर संपत्ती. कशालाही कमतरता नव्हती. पण डॉ. सिकदार तसे जन्मतःच थोडेफार दुर्दैवी. ते केवळ एक वर्षाचे असताना त्यांची मातोश्री वारली. वडिलांनी दुसरा विवाह केला आणि डॉ. सिकदार आपल्या आजीकडे राहावयास गेले. आजीचे नाव 'कृपामयी'—त्यांनीच या आईविना मुलाला लहानाचे मोठे केले. कृपामयी नुकत्याच म्हणजे वयाच्या ८५ व्या वर्षी वारल्या. डॉ. सिकदारांनी आपल्या दवाखान्याला आपल्या आजीचे 'कृपामयी' हे नाव दिले आहे. या सिकदार कुटुंबाची देशाच्या फाळणीनंतर भयंकर वाताहत झाली. पूर्व बंगालचा भाग पाकिस्तानात गेल्याने जमीनजुमला, सर्व संपत्ती तिथल्या तिथे टाकून सिकदार कुटुंबातील दोनशे माणसे सबंध देशभर कुठेना कुठे विखरून गेली. डॉक्टरांच्या वडिलांना या परिस्थितीत भयंकर हलाखीत दिवस काढावे लागले. मात्र खुद्द डॉक्टर या आपत्तीत कुठेच सहभागी झाले नाहीत. वयाच्या १६ व्या वर्षी ते जे घरातून पळून बाहेर पडले ते सारखे बाहेरच राहिले. पिता-पुत्रांची भेटही फार उशीरा झाली.

घरातून पळून बाहेर पडण्याचे कारण आणि पद्धत दोन्ही थरारकच! डॉ. सिकदार आपल्या आजीजवळ राहून प्राथमिक—माध्यमिक शिक्षण घेत होते. डॉ. सिकदारांनी बालपणी जे जे डॉक्टर्स पाहिले होते त्यांच्या जीवनाबद्दल त्यांना एक प्रकारचे कुतूहल वाटत होते. आजारी लोकांना बरे करणे, त्यांची सेवा करणे, ती इंजेक्शन्स, तो स्टेथास्कोप हे सारे पाहून — हा डॉक्टरलोकांचा जीवनक्रम त्यांना फार फार आवडला होता नि वाटत होते, की आपणही डॉक्टर व्हावे. पण दैव त्यांना दुसरीकडे ओढीत होते. मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर एका नातेवाईकाने डॉ. सिकदारांना गया येथे रेल्वे अप्रेंटिसशिप मिळवून दिली व कामावर हजर होण्यास सांगितले. आता हे लोक आपणाला नोकरीत घालणार नि डॉक्टर होण्याचे आपले स्वप्न पुसून जाणार या विचाराने त्यांच्या मनात काहूर उठले. बराच विचार करून त्यांनी निर्णय घेतला, की कोणालाही न सांगता कलकत्त्याला पळून जायचे आणि वैद्यकशास्त्राचा अभ्यास करावयाचा. परंतु कलकत्त्याला जाणे म्हणजे काही सोपी बाब नव्हती. प्रथम बोटीतून फरिदाबादला जायचे, तिथून रेल्वेने कलकत्त्याला जायचे असा तो प्रवास होता. तेव्हा सिकदारांनी एका गड्याला हळूहळू विश्वासात घेतले. त्याच्या मदतीने त्यांनी एक बोट पकडली. बरोबर मामुली सामान होते; आणि पैसे होते फक्त १२८ रु. १२ आणे. पळून जाताना आपल्या एका प्रिय शिक्षकाचे पत्रही घेतले होते—कलकत्त्यातील त्यांच्या एका मित्राला देण्यासाठी. आपला एक हुषार विद्यार्थी पुढील शिक्षण घेण्यासाठी स्वतःच्या धाडसी पायावर धडपडतो आहे याबद्दल त्या गुरुजींना धन्यता



. सिकदार

वाटत होती आणि म्हणूनच सिकदाराच्या पलायनाची वाच्यता त्यानी कुठेही केली नाही. कलकत्त्यामध्ये सिकदार कसेबसे येऊन दाखल झाले मात्र—तिथली गर्दी, त्या बसेस, त्या टोलेजंग इमारती पाहून ते भावावून गेले असल्यास नवल नाही. तिथे राहायचे कुठे, मेडिकल स्कूलची इमारत शोधून काढायची कशी, तिथे .ओळख काढायची कुणाची अन कशी, असे एकाहून एक कठीण प्रश्न त्यांच्या-पुढे उभे राहिले. पण कुठल्याही परिस्थितीत डगमगायचे नाही हा तर डॉक्टराच्या जीवनातील स्थायीभाव रस्त्यावरून चालता चालता घर, दुकान, सस्था याचे बोर्ड वाचीत जाण्याचा क्रम त्यानी आरभिला. सुदैवाने त्याना एका हॉटेलमध्ये शिरून फराळ कर-ण्याची लहर आली. तिथे त्याच्याच वयाचे पाच सहा विद्यार्थी चहा पीत बसले होते. त्याच्यात समाषण चालले होते ते कॅम्पबेल मेडिकल स्कूलसबधीच. श्री. सिकदारानी त्याचे बोलणे काळजीपूर्वक ऐकले आणि मध्येच तोंड घालून स्कूलच्या प्रवेशासबंधीचे प्रश्न विचारले, तो त्याना कळाले की प्रवेश अर्ज भरण्याची शेवटची तारीख उद्याचीच होती. मेडिकल स्कूलचा अचूक पत्ताही त्यानी विचारून घेतला.

## विद्येसाठी दाही दिशा

श्री. सिकदार स्कूलमध्ये दाखल झाले आणि त्यानी प्रवेश अर्जाचा फॉर्म मागून घेतला. परतु तिथल्या कारकून मंडळींनी त्याना स्पष्ट सुनावले, की ही शाळा प्रेसि-डेन्सी डिव्हिजनमधील रहिवाशांसाठी आहे; येथे डाक्का डिव्हिजनच्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार नाही. झाले—डॉक्टराच्या सर्व आशाआकाक्षांवर विरजणच पडले. आता कसचा आपल्याला प्रवेश मिळतो या विचा-राने त्याना हवालदिल करून सोडले. पण तिथल्याच एका गृहस्थाने सहज गमत म्हणून सागितले, की श्री. फझलुल हक्काना भेटल्यास काम होईल आणि अशा पार्श्वभूमीवर लेखा-रंभी नमूद केलेली घटना घडून आली. दर-म्यान त्याच दिवशी सिकदारानी आपल्या शिक्षकाच्या मित्राला गाठून पत्र दिले, परंतु त्या मित्रांनी त्याची विशेष विचारपूस केली नाही. ते कामाच्या गडबडीत होते. फक्त सामान ठेवण्यापुरता त्यानी आश्रय दिला. डॉक्टरानी एक हॉटेलमध्ये खाना घेतला. हॉटेलसमोर एक मुलीची शाळा होती. तिथल्या एक शिक्षिका सिकदाराना अचानकच भेटल्या. नतर कळून आले, की त्या हेड् मिस्ट्रेसच होत्या. सिकदारानी त्याना फजलुल हक्क कुठे भेटतील म्हणून विचारले. त्या बाईना या पोरसवद्या चुणचुणीत मुलाबद्दल, का कोण जाणे, आश्चर्य वाटले व सहानुभूती वाटली. त्यांनी त्यांची सपूर्ण हकीकत ऐकून घेतली व फजलुल हक्कना कसे व कुठे भेटा-यचे यावद्दल योग्य सल्ला दिला. " मेडिकल स्कूलमध्ये प्रवेश मिळण्याची शक्यता फार कमी आहे, तेव्हा तू सायन्स कॉलेजमध्ये जा, इटर-सायन्स हो आणि मग मेडिकल लाईन घे " असाही आपुलकीचा सल्ला त्या शिक्षि-केने दिला त्यानुसार सिकदारनी त्याच वेळी सिटी कॉलेजच्या रात्रीच्या शाखेत प्रवेश मिळण्याबाबत अर्ज केला. त्याच्या शिक्षकाच्या मित्राने एका लाँड्रीवाल्याकडे त्यांची राह-ण्याची व्यवस्था केली. लाँड्रीवाल्याला थोडी मदत करावी, कुठे शिकवण्या कराव्या आणि मेडिकल स्कूलच्या अभ्यासक्रमास हजर रहावे असा त्याचा कार्यक्रम सुरू झाला. रात्री सिटी कॉलेजमध्ये सायन्सच्या अभ्यासक्रमालाही ते हजर राहात तिथे त्याना नादारी मिळाली.

एके दिवशी अचानक रस्त्यात सिकदाराचे एक जुने शिक्षक भेटले. त्यांनी विचारपूस केली आणि सागितले, " अरे मेडिकल स्कूलचा डिप्लोमा घेऊन काय फायदा ? तुला डॉक्टरच व्हायचे तर इंटर-सायन्स आधी हो नि मग चागला एम्. बी. बी. एस्. हो तर काही तुझ्या धडपडीला अर्थ आहे. " या विचारसरणीचा सिकदारांच्यावर चागला परिणाम झाला नि मग त्यानी मेडिकल स्कूलला जायचे सोडून दिले. तेवढयात कल-कत्त्यामध्ये जातीय दंगली सुरू झाल्या. रक्ताचे पाट वाहू लागले. भोसकाभोसकीला ऊत आला. शाळा-कॉलेजे ओस पडू लागली आणि सिकदाराचे धाबे दणाणले. हा छोकरा दंगलीमध्ये मारला गेला अशाही अफवा उठल्या आणि त्याच्या नातेवाईकाचाही तसाच समज होऊन बसला. अशा भयंकर परिस्थितीत व विमनस्क अवस्थेत ते कृष्ण-गडला गेले. तिथे त्याचे एक दूरचे चुलते प्राचार्यपदावर होते. (हे चुलते कै. शरत्चंद्र बोस याचे गुरु होते) त्यानी आपल्या कॉलेज-मध्ये सिकदारना ठेवून घेण्याचे मान्य केले. पण अडचण अशी आली की, तिथे बायॉ-लॉजी हा विषय शिकविला जात नव्हता. सिकदारना तर डॉक्टर व्हायचे होते. तेव्हा चुलत्यांनी कुला जिल्ह्यातील एका प्राचार्य मित्राकडे सिकदारना पाठविले आणि दौलत-पूर हिंदू अॅकॅडमीच्या वसतिगृहात त्याना प्रवेश मिळाला. शिक्षणक्रमाला एक प्रकारे नियमित वळण लागले. एक वर्ष त्यांचे शिक्षण व्यवस्थित पार पडले. परीक्षेत पहिला नंबर मिळाला व गणितात शभर पैकी शंभर मार्क मिळाले. मुले धकाधकीच्या जीवनातच चागली शिकतात हेच खरे !

देशाच्या फाळणीचे पडसाद अद्याप घुमतच होते आणि सिकदाराच्या दुर्दैवाने कुला जिल्हा पाकिस्तानकडे गेला. आता तिथे राह-ण्यात सिकदारना बरे वाटले नाही. त्यांचे प्राचार्य चुलतेही याचवेळी निवर्तल्याने त्याचा मोठा आधार नाहीसा झाला. ते पुन: कल-कत्त्याला आले. कुला कॉलेजचे लोक त्याना ट्रॅन्स्फरन्स सर्टिफिकेट द्यायला तयार नव्हते. बऱ्याच विनवण्या केल्यानतर ते त्यांना मिळाले. परतु कलकत्त्यात दुसऱ्या वर्षाच्या वर्गात प्रवेश कसा मिळणार हा प्रश्न उभा राहिला. पूर्वीच्या त्या लाँड्रीवाल्याचे एव्हाना लग्न झाले होते. तेव्हा तिथे राहायलाही जागा नव्हती. सकटे येतात ती कशी एकत्र—असेच वाटले असावे सिकदारना. परतु त्या लाँड्री-वाल्याने दुसरी एक लाँड्री गाठून दिली व तिथे व्हराड्यात निव्वळ झोपण्याएवढीच जागा मिळाली.

## सेंट पॉलमधील नाट्यमय प्रवेश

सिकदारांनी सेट पॉल कॉलेजमध्ये प्रवेश मिळविला तोही नाट्यमय पद्धतीनेच. ते मोठे प्रसिद्ध महाविद्यालय—तिथेच आपले पुढचे शिक्षण व्हावे अशी त्याना तळमळ लागून होती. ते प्रवेश-अर्जाचा फॉर्म मिळविण्यासाठी हेड्क्लार्ककडे गेले. परंतु अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षी मध्येच प्रवेश देता येत नाही म्हणून त्यांनी सिकदाराना अक्षरश: धुडकावून दिले. तेव्हा प्राचार्यांना भेटण्याची इच्छा त्यानी व्यक्त केली. ' तेही शक्य नाही ' असेच कठोर उत्तर त्याना मिळाले. परंतु एव-ढ्यावर थावतील तर मग ते डॉ. सिकदार कसले ? त्यानी प्राचार्य होते त्या दिवाण-खान्यात दाबून शिरकाव केला. त्या वेळी महाविद्यालयाच्या नियामक मडळाची बैठक

चालू होती. सिकदार या वैचित्र्यपूर्ण मुलाखतीची हकीकत आज अगदी हसत हसत सांगतात.

सिकदारानी सागितले– 'मला प्राचार्यांना भेटायचं आहे.' नियामक मडळाचे सदस्य या आगतुकी प्रकाराने विस्मित झाले होते. त्यापैकी एक जण हसत म्हणाला, "बघ! कोण प्राचार्य आहेत शोधून काढ!" दमयतीने वेषपरिवर्तन करून आलेल्या देवादिकाच्यामधून खऱ्या नळाला शोधून काढायचे– यातलाच प्रकार होता तो. सिकदारांनी नम्रपणे आपली हकीकत सर्वांना सागितली; गणितातले शभर मार्क, इंग्रजीतले ऐंशी मार्क व पहिल्या क्रमाकाने पास झाल्याचा पुरावा सादर केला. नियामक मडळामध्ये गणिताचे प्राध्यापक होते. त्यांना साहजिकच या मुलाबद्दल आकर्षण वाटले. प्रवेश देण्याबद्दल त्यानीच आग्रह धरला. परंतु अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षी मध्येच प्रवेश द्यायचा कसा हा प्रश्न उभा राहिला. सिकदारानी चोख सागितले, "अपवाद म्हणून मला घ्या. मला याच महाविद्यालयात शिकायचे आहे. देशाची फाळणी झाली हा काय माझा दोष आहे?" त्याचे हे धाडसी वक्तव्य प्राचार्यांना चागलेच झोंबले असावे. अखेर 'नियमाला अपवाद' म्हणूनच त्यांना सेंट पॉलमध्ये प्रवेश मिळाला.


प्रवेश मिळाला, फ्रीशिप मिळाली; पण सिकदाराचे हाल कुत्रा खाईनासा झाला. चहूकडे रेशनिंगचा जोर असल्याने कलकत्याच्या कुठल्याही खानावळीत तेव्हा जेवण मिळण्याची सोय नसे; फराळ मिळायचा– पण जेवण नाही. सिकदारानी हाताने स्वयंपाक करण्याचे व्रत अगिकारले. कुठून तरी ओळखी काढून एका बड्या जमीनदाराकडे वशिला लावला आणि त्याच्या लहान मुलीला शिकविण्याचे काम मिळविले व त्याच्याकडेच वस्ती केली. त्यांच्या कुठल्याही नातेवाईकाने त्याची विचारपूस केली नाही. (उलट आज मात्र डॉक्टराच्या चलत्या काळात बहुतेकजण त्यांच्यापासून मदतीची अपेक्षा करतात व डॉक्टर तशी मदत करतातही!)

डॉक्टरनी कसे बसे वर्ष काढले. परीक्षा फक्त १८ दिवसावर होती आणि त्याना देवी आल्या. झाले! या साथीच्या रोगाचा इसम घरात नको म्हणून जमीनदाराने सिकदारना घराबाहेर पडण्याचा हुकूम केला. परीक्षा तोंडावर आलेली. सिकदाराना बह्माड आठवले. जमीनदाराच्या पायाशी लोळण घेऊन त्यानी विनवण्या केल्या. पण जमीनदार काहीही ऐकून घेण्यास तयार नव्हते. आपले सारे कष्ट, साऱ्या आकाक्षा धुळीला मिळणार अशीच परिस्थिती समोर उभी राहिली. पण योगायोग पहा–सिकदाराच्या श्रद्धास्थानातील कुठल्यातरी अदृश्य शक्तीने त्याना सहकार्याचा हात दिला. जमीनदारांच्या ज्या मुलीला ते शिकवीत होते ती आपल्या आजोळी गेली होती आणि तिलाही देवी आल्याची तार अचानक आली. जमीनदाराचे मन या घटनेने विरघळले–मुलीला आणायला जाण्यापूर्वी त्यांनी आपल्या घरी सिकदाराच्या औषधोपचाराची व्यवस्था केली.

## एक साधू आणि एक देशभक्त

सिकदार आजारातून बरे झाले. तथापि अशक्तपणा कमालीचा आला होता. तशाच अवस्थेत 'आजारी उमेदवार' या सदराखाली स्वतंत्र व्यवस्थेत त्यानी पडल्या पडल्या पेपर्स लिहिले आणि आश्चर्य हे की ते परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. दरम्यान बऱ्याच भानगडी निर्माण झाल्या. ते ज्या जमीनदाराकडे राहात असत त्यांचे एक गुरू साधू पर्वतीकुमार राज चक्रवर्ती एकदा सहज त्याचे घरी आले. या साधुमहाराजांना सिकदाराचा चुणचुणीतपणा, परीक्षेतील घवघवीत यश पाहून आणि त्याची परिस्थिती ऐकून अत्यंत आपुलकी वाटली. मेडिकल कॉलेजमध्ये नाव घाल; माझ्या प्रशस्त वाड्यातील एक दिवाणखाना तुला राहायला देतो, तुझा खर्च चालवितो. तू खुशाल येऊन राहा" असे त्यांनी अगत्याने सागितले. इकडे जमीनदारानांही विशेष आपुलकी वाटू लागल्याने तेही त्याना सोडावयास तयार नव्हते. असा हा प्रेमाचा 'टग ऑफ वॉर' सुरू झाला. डॉ. सिकदारना आर्जिकार मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. परतु दरम्यान एका दिवशी सिकदारना आश्रय देणारे जमीनदार आपल्या बिछान्यात मरून पडल्याचे आढळले. त्यांच्या घरी सवतीमत्सराचे वाद होते आणि त्यामुळे आत्महत्या की खून, अशी चौकशी झाली. एका बाजूने सिकदारना आठ हजार रुपये द्यायचे व त्यानी खोटी साक्ष द्यायची अशी मागणी केली. सिकदारांची साक्ष फार महत्वाची होती. ते स्वतः खूप आर्थिक अडचणीत होते. तथापि पैशाच्या मोहाला बळी न पडता खरीखुरी त्यानी साक्ष दिली. अर्थात् त्याना जमीनदाराचे घर वास्तव्यासाठी वर्ज्य झाले. पण ते मुळीच डगमगले नाहीत. त्यानी पर्वतीकुमारसाधूचा आश्रय घेतला. त्याचा मठ कॉलेजपासून १२ मैलाच्या अंतरावर होता. तरी पण सिकदार रोजची पायपीट करीत असत. आश्चर्य हे की साधुमहाराजानी पूर्वी जी आश्वासने दिली होती त्यातली बरीच पाळली नाहीत. फक्त राहायला जागा दिली एवढेच. सिकदारानी चार पाच शिकवण्या धरल्या व चरितार्थाचा मार्ग अगिकारला. पण यामुळे अभ्यासाकडे लक्ष द्यायला त्याना पुरेसा वेळ मिळेनासा झाला. त्याना आपल्या जीवनाचा उबग आला. मात्र त्यानी धीर सोडला नाही. त्यावेळचे एक थोर देशभक्त श्री. पूर्णचंद्र दास याना ते भेटले आणि त्यानी आपली सर्व कर्मकहाणी सागितली. श्री. दासनी शक्य ती मदत देण्याचे आश्वासन दिले आणि एका दिवशी अकल्पितपणे सिकदारना पत्र आले. त्यात सरकारतर्फे एक हजार रुपयाचे कर्ज मंजूर झाल्याची वार्ता होती. निर्वासित व प्रथमश्रेणीचा विद्यार्थी या सदराखाली हे कर्ज त्याना मिळाले. परमेश्वर सदैव जागा आहे याचा प्रत्यक्ष अनुभव सिकदारांना आला. ते एम्. बी. बी. एस् ची परीक्षा प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झाले.

सिकदाराची आगेकूच आता कुठे त्याच्या नातेवाईकांच्या लक्षात येऊ लागली. दूरचे एक मामा मला मोठा हुंडा देऊन जावई करून घेण्यास पुढे सरसावले. सिकदारांना स्वार्थी जगाची पुरेपूर कल्पना आली होती. त्यांनी या सर्व आमिषांना दाद दिली नाही. दुसऱ्या वर्षी निर्वासित व प्रथम श्रेणीचा विद्यार्थी म्हणून दरमहा ६० रु. ची सरकारी शिष्यवृत्ती त्याना मिळाली. याही खेपेस श्री. पूर्णचद्र दासच त्याच्या मदतीस धावले होते. त्याना मेडिकल कॉलेजच्या वसतिगृहातही प्रवेश मिळाला आणि ते अखेर एम्. बी. बी. एस्. परिक्षेत निर्विघ्नपणे उत्तीर्ण झाले. त्यांचा चलता काळ साधून आला. परीक्षेचा निकाल लागल्याक्षणी त्याना एशियन मेडिकल कॉलेजमध्ये हाऊस फिजिशिअनची जागा मिळाली. मात्र त्यांना पन्नास रुपयांचा मासिक भत्ता



कृपामयी नर्सिंग होममधील कर्मचारी
डावीकडून (३) सौ. सिकदार (४) डॉ. सिकदार

मंजूर झाला. ही रक्कम शिष्यवृत्तीपेक्षा कमी होती. परंतु त्यांनी नोकरी पत्करली. डॉ. एस्. एन्. बानर्जी यांचे त्यांच्यावर अपत्यवत् प्रेम होते. त्यांनी आपल्या मानसोपचार शाखेतील (सायकॅट्री) सर्व खाचाखोचा शिकवल्या. डॉ. सिकदारांनाही हा विभाग विशेष आवडला आणि डॉ. बानर्जींच्या नेतृत्वाखाली या शाखेचे भरपूर ज्ञान कमावले; प्रात्यक्षिकांचा भरपूर अनुभव मिळविला. बाहेर रोग्यांना इंजेक्शने द्यावीत, त्यांतून काही जादा पैसे मिळवावेत असा क्रम त्यांनी आरंभिला आणि त्याच्या जोडीलाच ते रात्रीच्या सायन्स कॉलेजमध्ये जाऊन बी. एस्सी. ची तयारी करीत होते.

**अनंत हस्ते कमलावराने**

सिकदार बी. एस्सी. (वुइथ डिस्टिंक्शन) पास झाले व डबल ग्रॅज्युएट बनले. डॉ. बानर्जींच्या मदतीने व सल्ल्याने ते बेंगलोरच्या अखिल भारतीय मानसोपचार केंद्राची डी. पी. एम्. ही पदवी मिळविण्यासाठी दाखल झाले. त्याकरिता मध्यवर्ती सरकारची त्यांना २ वर्षे खास शिष्यवृत्ती मिळाली. या शिक्षणासाठी त्यांनी एका युरोपियन मेंटल हॉस्पिटलमधील दरमहा ५५० रु. पगाराच्या असिस्टंट सर्जनच्या जागेचाही त्याग केला. अभ्यासाचा निदिध्यास असा असतो. डी. पी. एम्. ची पदवी मिळविल्यावर रांची येथे त्यांनी मेजर आर. बी. डेव्हिस यांच्या किशोर नर्सिंग होममध्ये नोकरी पत्करली. तेथे १९५९ पर्यंत त्यांनी काम केले.

'अनंत हस्ते कमलावराने, देता किती घेशिल दो कराने' या उक्तीप्रमाणे सिकदारांना एका दिवशी तीन नेमणुकांचे हुकूम मिळाले. दिल्ली येथे स्टाफ सर्जन, मिशन हॉस्पिटल,मिरजमध्ये सायकॅट्रिस्ट आणि रांची येथेच इंडियन मेंटल हॉस्पिटलचे सुपरिंटेंडेंट अशा त्या तीन जागा होत्या. परंतु मिरज मिशन हॉस्पिटलची दिगंत कीर्ती ऐकून ते मिरजेलाच दाखल झाले. मिरजेच्या डॉ. गुहिन मानसोपचार केंद्रात त्यांनी दोन वर्षे काम केले. परंतु या छोट्या केंद्राचे कार्यक्षेत्र त्यांना अपुरे वाटू लागले. नवीन नवीन यंत्रसामग्री आणवून केंद्र वाढविण्याची त्यांची प्रबळ इच्छा होती. मिशन हॉस्पिटलची मात्र खर्चात भरमसाट वाढ करण्याची तयारी नव्हती. त्यामुळे ते बाहेर पडले आणि मिरजेतच त्यांनी 'कृपामयी नर्सिंग होम' ची स्थापना दिनांक १६ मार्च १९६३ रोजी केली. त्यानंतर त्यांना मोठ्या पगाराच्या व हुद्याच्या (परदेशांतल्या देखील) कितीतरी नोकऱ्या आल्या. पण त्यांनी सर्वांचा त्याग करून 'हे कृपामयी नर्सिंग होम' जास्तीत जास्त वाढविण्याच्या दृष्टीने मिरजेत कायमचे वास्तव्य केले आहे.

**कृपामयी नर्सिंग होम**

आज त्यांची अक्षरशः दणदणीत (रोअरिंग) प्रॅक्टिस आहे. परंतु पैशाच्या निव्वळ मागे लागून त्यांनी आपल्या अभ्यासात खंड पाडलेला नाही. त्यांनी सायकॅट्रीवर एम्. डी. साठी प्रबंध लिहिला असून तो मान्यही झाला आहे. त्यांच्या पत्नी नर्स असून त्या आपल्या पतीला कामात मदत करतात. डॉक्टरनी एका पैचाही हुंडा आपल्या लग्नात घेतला नाही हे त्यांच्या ध्येयनिष्ठ वृत्तीला अनुसरूनच आहे. मिरज मेडिकल कॉलेजमध्ये डॉक्टर पार्ट टाईम लेक्चरर म्हणून काम करीत आहेत. कोल्हापूरमध्ये त्यांनी आपल्या केंद्राची शाखा उघडली आहे. दर रविवारी ते कोल्हापूरला सल्ला देण्यासाठी जातात व प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी ते कऱ्हाडला जातात व प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी इस्लामपूरलाही जातात. मिरज-सांगली रस्त्यावर त्यांनी अडीच एकर रान विकत घेतले असून तेथे ते मोठ्या प्रमाणावर केंद्राची उभारणी करण्याच्या कार्यात गुंतलेले आहेत.

'कृपामयी नर्सिंग होम' हे देशातले या स्वरूपाचे दुसरेच उपयुक्त केंद्र बनलेले आहे. मोठ्या वेड्यांच्या दवाखान्यात जेथे दोन दोन हजार रोगी असतात तेथे वैयक्तिक लक्ष पुरविले जात नाही आणि साहजिकच रोगी




डॉ. सिकदार रोग्याला इलेक्ट्रिक शॉक देत असताना

जास्त बिघडतात आणि ते आयुष्यातून कायमचे उठून जातात.

अशा छोटया केंद्रात वैयक्तिक लक्ष दिले जाते, त्यामुळे केंद्राच्या पहिल्या वर्षाच्या अस्तित्वात जवळ जवळ ९० टक्के रोगी बरे होऊन आपल्या कुटुंबीयांत सामील झाले आहेत. डॉ. सिकदार रोग्यास केंद्रातच ठेवून न घेता त्याच्या घरी जाऊन उपचार करतात. ही पद्धत कुठल्याही इतर दवाखान्यात अस्तित्वात नाही. रोग्याला कुटुंबापासून वेगळे ठेवले, त्याला केवळ दवाखान्यात कोंडून ठेवले तर तो जास्त एकलकोंडा बनतो; दवाखान्यातून बाहेर पडल्यावर समाजाची त्याच्याकडे पाहण्याची दृष्टी बदललेली असते ('हा ना ? वेडयाच्या दवाखान्यात होता ' असे बोलले जाते). त्यामुळे तो पुनः बिघडतो. म्हणूनच डॉक्टरांनी ही अभिनव पद्धत अवलंबिली आहे. त्यांच्या मताप्रमाणे शेकडा ८ टक्के लोक मानसिक विकाराने पछाडले असतात; शेकडा ७५ रोगी मानसिक विकृतीचे असतात. संपूर्ण वेडयाचे प्रमाण २०.२५ टक्के असते. आनुवंशिक वेडेही चांगले बरे होऊ शकतात असा त्यांचा विश्वास आहे.

कृपामयी नर्सिंग होममध्ये १९६३ एप्रिल ते १९६४ मार्च या वर्षांत १०५७ रोग्यांवर उपचार करण्यात आले. त्यांत पुरुष ५५९, स्त्रिया २६६ व मुले ८५ होती; विवाहितांची संख्या ५२१, अविवाहित २९६ घटस्फोटित ८ जण होते. याशिवाय कोल्हापूर शाखेत १६२, इस्लामपूर ४० व कराड ६० इतक्या रोग्यांवर उपचार करण्यात आले. डॉक्टरांच्या मताप्रमाणे काळजी, मनक्षोभ, लैंगिक असमाधान, शारीरिक आजारातून उद्भवलेला कमकुवतपणा आदि प्रकार रोग्यांमध्ये जास्त प्रमाणात आढळतात. केंद्रामध्ये अतिशय आधुनिक पद्धतीने इलेक्ट्रिक शॉक ट्रीटमेंट, इन्शुलिन पद्धती, कार्बन डाय-ऑक्साइडचा वापर, औषधोपचार, व्यावसायिक व करमणुकीचे उपचार आदींचा अवलंब केला जातो. मानसिक परीक्षापद्धती, व्यक्तिमत्त्वाचे व बुद्धीचे मूल्यमापन, व्यावसायिक व वैवाहिक संबंधातील सल्ला देऊन जीवनातील भावी त्रासापासून लोकांना बचावण्याचेही कार्य या केंद्रात पार पाडले जात आहे. मनोविकारांचे पृथःकरण करून अतृप्त इच्छा–आकांक्षा (नार्को अॅनॅलिसिस) यांचे सूक्ष्म संशोधन करून उपचार करण्यात येत असल्यामुळे या केंद्राची अगदी थोडयाशा अवधीतच भरपूर प्रसिद्धी झालेली आहे. म्हणूनच या केंद्रात महाराष्ट्र, म्हैसूर, उत्तर प्रदेश, गुजराथ, मध्य प्रदेश, आंध्र, गोवा वगैरे लांबलांबच्या प्रदेशांतून आलेले रोगी आढळतात. डॉक्टरांच्या हाताला फार मोठे यश लाभलेले आहे यात संदेह नाही. त्यांची लोकप्रियता एवढी पसरली आहे की १६ मार्च १९६३ रोजी केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी दूरदूरचे ४०० हून अधिक डॉक्टर्स समारंभास उपस्थित झाले होते.

'कृपामयी नर्सिंग होम'ची स्वतःची इमारत चालू वर्षी पूर्ण होईल आणि मिरज-सांगली रस्त्यावर ते एक देशातले मानसोपचाराचे फार मोठे केंद्र बनेल यात बिलकूल शंका नाही. या भरघोस यशाचे सर्वस्वी श्रेय डॉक्टर सिकदारांच्या परिश्रमाला, धाडसाला व ध्येयनिष्ठ सेवावृत्तीलाच आहे. परमेश्वर त्यांना उदंड आयुष्य देवो ! त्यांचे हे अल्पसे चरित्र बिकट परिस्थितीतून मार्ग काढणाऱ्या कित्येक होतकरू विद्यार्थ्यांना आदर्शमय वाटेल अशी आशा.

●

**[पुढील अंकात डॉक्टर सिकदार यांनी मानसिक विकृती, मानसोपचारपद्धती यासंबंधी व्यक्त केलेल्या विचारांची सारांशरूपाने ओळख.]**

# हीं हीं सारीं माणसंच!

**वसुधा पाटील**

रात्री अकराच्या सुमारास कसलंतरी अवजड बोचकं धप्पदिशी पडल्याचा आवाज बाहेरून आला. मागाहून हलकीशी कुजबुज. मी दिवा लावून वाचीत होते. सगळीकडे निजानीज होऊन केव्हाच चिडीचिप्प झालं होतं. पंख्याच्या वाऱ्यानं अर्धवट उजेडात खिडक्या-दरवाजांचे पडदे मारखे अधांतरी फडफडत होते. पडद्यांचं ते फडफडणं, धप्प-दिशी आवाज आणि रात्रीच्या निवांत वातावरणातली, हलक्या आवाजातील कुजबुज. मी घाबरून पटदिशी पुस्तक मिटलं. नको तितक्या मोठ्या आवाजात ओरडून गेले, "कोण रे? कोण आहे बाहेर?"

छातीत खरं म्हणजे धस्स् झालं होतं. पण उसनं अवसान आणण्यात तर यशस्वी झाले होत्ये. जेमतेम खिडकीपर्यंत जाऊन बाहेर डोकावून पाहिलं. काळाकुट्ट अंधार होता. काहीही दिसत नव्हतं.

"अरे कोण आहे तिथं! काय चाललंय?" पुन: मी धीर करून विचारलं. तीन चार आकृत्या अंधारातच हालल्यासारख्या वाटल्या. झाडाखालच्या पाचोळ्यात सळसळ उडली. मी तिरीमिरीनं बाहेरचा दिवा लावला.

मालकांच्या गॅरेजसमोर मातीतच बिस्तरा टाकून एक बाई झोपलेली दिसली. उशाशी तीनचार चौकोनी पत्र्याचे डबे उभे होते. जरा पलिकडे एक मोडकं तोडकं लाकडी कपाट आणि अलिकडे अंथरलेल्या चिरगुटांवर दोन-तीन नागडी उघडी पोरं तोंडं वासून, डारा-डूर झोपली होती. दिवा लावल्याबरोबर झाडापलिकडील सळसळ जास्तच वाढली— एक गाढव जोरात ओरडलं—त्यासरशी डुकरांनी किंचाळायला सुरवात केली. आणि रांगड्या आवाजात चार शेलक्या शिव्या हाणलेल्या कानावर आल्या—अंधारातून एक माणूस पाचोळा तुडवीत पुढं आला—ओट्याशी येऊन उभा राहिला.

"कोण रे तू? काय गडबड आहे?" मी खिडकीतूनच विचारलं—

"मी अन्नाप्पा—गिड्डाचा जावय—मालकांना इचारून हितं राहचला आलोय." खाली मान घालून तो म्हणाला.

"असं असं! मग पलिकडे कोणाची वळवळ चाललीय ती?" मी निश्वास टाकून सुटकेच्या स्वरात विचारलं.

"डुकरं नि गाडवं घेऊन आलोय मार्जी—रातभर इथंच राहानार; उद्याचं बगू"...मान वर न करताच तो म्हणाला.

"बरं बरं. पण लक्ष ठेव हो त्यांच्यावर! नाहीतर माझ्या अंगणात येऊन नासधूस करतील. आणि पोरांना इथं ओट्यावर आणून निजीव. कुठं किडंकाटं येईल झाडाखाली. बरं नाही ते"— एवढं बोलून, दिवा मालवून मी आत वळले नि निजायची तयारी केली.

सकाळी उठून मशेरी घेऊन मागीलदारच्या पायरीवर दात घाशीत उभी राहिले तर झाडाखाली दहाबारा गाढवं बांधलेली. डुकरं तर वाऱ्यासारखी मोकाटच सुटलेली. होती जिकडे तिकडे अधाशी तोंडं खुपशीत होती. नि त्यांच्या मागं अण्णाप्पाची पोरं—शिपट्या हातात घेऊन.

मी परत ओट्यावर येऊन उभी राहिले. अण्णाप्पाचं बिऱ्हाड निरखून पाहू लागले. मोठं गमतीशीर दृश्य होतं ते. गॅरेजमध्ये मालकाची काळीशार गाडी सकाळच्या उन्हात लखलखतेय नि तिच्यासमोरच अण्णाप्पाचा दळिद्री संसार अस्ताव्यस्त विखरून पडलाय—फाटकीतुटकी अंथरुणं—गंजके पत्र्याचे डबे—कपड्यांची जुनी तीनचार बोचकी—आणि एकुलतं एक लाकडी, मोडकं कपाट—त्यालाच टेकून, बिडी फुंकीत अण्णाप्पा पाय मोडून बसला होता. बावीशी तेवीशी संपत आलेला, गिड्डा वडाऱ्याचा हा लाडका जावई, त्याच्या शेजारीच फतकल मारून तान्ह्याला पाजीत पाठमोरी बसलेली त्याची बायको— गिड्डाची एकुलती एक पोरगी— तीसुद्धा कोवळीच— पोरगेलशीच—आणि झाडाला टेकून हातात किटली घेऊन उभा असलेला समोरच्या हॉटेलातला पोऱ्या.

"चार चाय झाले—चालीस नवे पैसे चायचे—नि बटर बिस्कुटांचे साठ पैसे— रुपाया द्ये"—पोऱ्या म्हणत होता.

"अरं थांब रं—मी काय कुठं पळून जातो का काय? रोज तर चाय पितो की तुझ्या हाटेलात—सांग तुझ्या मालकाला हिसाब मांडून ठेव— ही गाडवं माती घातली की रातचं सगळं पैसं देऊन टाकीन. काय? जा आता—" कपाळाला आठ्या घालून पोरगा निघून गेला.

मग त्यांच्या वडारी भाषेत पुन: कचकच सुरू झाली. तान्हं पोर पिऊन पिऊन सुस्तावलं तसं अण्णाप्पाच्या बायकोनं मातीतच एक लहानसं पटकूर अंथरलं नि त्यावरच कुंचीसकट त्या पोराला घालून दिलं—नि कपातल्या चहात बटर बुडवून ती आस्ते आस्ते खाऊ लागली.

जराशानं बिडीचं थोटूक वहाणेखाली चिरडून अण्णाप्पा उठला. आळोखेपिळोखे देऊन एक लांबलचक जांभई देऊन तसाच जरा वेळ उभा राहिला. चहा पिता पिता बायको काहीतरी तणतणली वाटतं—बशीवर जोरात कप आदळून, गुडघे पोटाशी घेऊन, फुरंगटून तशीच मुकाट बसून राहिली दिम्म. काही बोलेना. अण्णाप्पानं लाडीगोडी लावून

" गिड्डा चहा घे ... नातवाला चकली दे "

गिड्डा हसला. रुमालाने नातवाचे नाक ओरबाडून हातात चकली दाबून त्याने नातवाला बाहेर लावून दिला. आपण स्वस्थच बसला.

" अरे चहा घे ... रोज घेत नाहीस का ?" कप पुढे करीत मालक पुनः म्हणाले.



" नको नको मालक ! " शेमल्याने डोळे पुशीत गिड्डा रडायला लागला. पुरुषासारखा पुरुष हुंदके देऊन रडू लागला.

पाहिलं–समजावण्याचा प्रयत्न करून पाहिला. पण छे ! फक्त नाकातली चमकी फुलणाऱ्या नाकपुडीबरोबर चमकत राहिली तेवढी. शेवटी अण्णाप्पा वसकण मारून लहान पोरासारखा रडू लागला. जमिनीवर थापटचा मारीत त्यांच्या मापेत काहीबाही बोलू लागला–तरी वडारीण गप्पच– हूं नाही की चूं नाही. गुडघ्यावरची हातांची मिठी जास्तच घट्ट झाली– अण्णाप्पाचा गोंगाट जास्तच वाढला. त्याची पोरंही भोवती जमून केकाटायला लागली–बांधून ठेवलेली गाढवंही कान टवकारून जागच्याजागी चुळबुळ करू लागली. इतक्यात हातात झाडणी घेऊन सोमा आणि सोमाची बायको वाडी झाडायला आली.

आल्याबरोबर गॅरेजसमोरची जागा झाडून पालापाचोळा जाळून मग वाडीतली सारी गटारं, मागची, पुढची अंगणं साफ करण्याचं रोजचं त्याचं काम. पण आज गॅरेजसमोर अण्णाप्पाचं सारं बिन्हाडवाजलं मांडलेलं– आल्याबरोबर दोघांनीही झाडण्या बाजूच्या दगडावर आडव्या मांडून ठेवल्या आणि विडचा शिलगावीत, शिळोप्याच्या गप्पांना बसावं तसं झाडाखालच्या पारावर मांड्या ठोकून चौकशांना सुरवात केली.

" का रे अन्नाप्पा ! आज काय हे असं ? हे सगळं रोंबाट घालून ठेवलंयस आता आम्ही झाडायचं कसं ? मालक ओरडतील नाय ?" सोमा छद्मीपणाने हमूख म्हणाला– बोलताबोलता डावा डोळा बारीक करून बायकोला त्यानं नुसतं सुचवलं. पण वडारणीच्या चाणाक्ष नजरेतून ते सुटलं नाही– झटदिशी हाताची गुडघ्याभोवतालची मिठी सोडून फणकाऱ्यानं ती म्हणाली, " तू गुमान तुज्या कामाला लाग– आमी नि मालक काय ते बगून घेऊ– तुला रे कशाला नसत्या चौकशा– ? घे इथून तिथून झाडायला..." आणि तिने चिरगुटं उगीचच जराशी आवरल्यासारखी केली.

सोमा खजिल झाला. पण त्याची बायको साधी ! तिनंच स्पष्टच विचारलं, " अग पन रुमडे, झालं काय तुला ? सकाळीच गाडवं हाकायची सोडून इथं गराजसमोर फतकल मारून बसली आहेस ती– आनि हे सगळं घरचं उचलून आनलस की झोपडपट्टीसून इथं तुज्या गाडवांसकट ! काय इथंच ऱ्हानार हाइस का ? का मालक वाडा बांदून देनार हाएत तुला नि तुज्या गाडवा डुकरांला ?"

सोमा फिदी फिदी हसायला लागला. कारण झोपडपट्टीतून उठून म्युनिसिपालिटीच्या शानदार, पाच मजली इमारतीत नुकताच तो राहायला गेला होता. डबल रूम, स्वतंत्र संडास नि एक गॅलरी एवढी जागा त्याला नुसत्या अर्जाबरोबर मिळाली होती– भंगीकाम करतो म्हणून. त्याचं फिदीफिदी हसणं त्याच्या बायकोलासुद्धा आवडलं नाही. तिनं झटकन् डबा आणि झाडू त्याच्या हातांत देऊन म्हटलं, " तुम्ही चला मागल्या वाडीत– गटारं साफ कराया घ्या– मी येते मागून "–

आणि ती वडारणीच्या समोरच परकराचा काचा मारून मातीत गोष्टी ऐकायला बसली. मुसमुसत, हुंदके देत, शिव्यागाळी करीत रुमडीनं तिला सर्व काय ते सांगितलं. आणि तीहि मधूनमधून विडीचे झुरके मारीत, डोळे किलकिले करून, मान हलवीत, हुंकार देत सारं काही शांतपणे ऐकून घेत होती. अण्णाप्पा मातीत रेघोटचा मारीत होता. एऱ्हांना त्याचं रडं पार मावळलं होतं. गालावर पाण्याचे सुकलेले ओघळ मातीच्या डागामुळे स्पष्ट दिसत होते.

त्याच्या भाबड्या चेहेऱ्याकडे गालातल्या गालात हसून पाहात सोमाची बायको म्हणाली, 'अरे ए अन्ना, कसारे तू असा रडवा ? ही रुमडी बरी की तुझ्यां परीस ? बस्स कर आता मातीत खेलनं– गाडव घेऊन जा की आता कामाला ! चायपानी झाल ना ? काही कामधदा करनार की न्हाई ? की दिसभर या गाडवासारकच बसून र्‍हानार ? भाडन तटा करून वायली चूल तर माडून बसालाहेस नि पोरांला खायला काय घालशील ? ऊठ की आता–"

रुमडी पण कपाळाला आठी घालून ओठातल्या ओठात काही तरी पुटपुटली. अण्णाप्पा तिरीमिरीनं उठला. कपाट तलं घड्याळ मनगटावर बाधलं– डोक्याला मुंडासं सरसरून चढवलं. फादीवर टाकलेला रेघाचा निळा सदरा अंगात घातला– आणि घमेली, कुदळी घेऊन गाढवं बांधलेली सोडवायला झटक्यासरशी निघून गेला.

रुमडी गालाच्या कोपऱ्यात, डोळ्यांच्या कोपऱ्यात लवाडस हसली. सोमाची बायकोही हातातली विडी विझवून पटकन् उठली. दगडावरची झाडणी हातात घेऊन ती झाडायला सुरवात करणार इतक्यात छगन बूट ·. रकर वाजवीत आला. मोठ्या विहिरीवरचा ५प सुरू करून आठला वाडीत यायच आणि मोटार स्वच्छ पुसून गॅरेज साफ करून, उरलेल्या वेळात मालक सागतील ती कामं चट्दिशी उरकून टाकायची हे त्याचं काम हातात फडकं घेऊन तो मोटार साफ करायला म्हणून आला तर गॅरेजसमोर हा गोंधळ– गॅरेजमध्ये शिरताना त्याला कसरत करावी लागली. मोटार पुसायच्या निमित्तानं बराच वेळ तो मोटारीच्या आड उभा राहिला नि तिथूनच रुमडीच्या त्या उघड्यावागड्या ससाराचं निरीक्षण करू लागला– रुमडीन एव्हाना बारीक लाकडी फणी काढून, पुढोरं समोर ठेवून, केसाचा गुता काढायला घेतला होता. गुता काढून झाल्यावर फण्या मारून मारून उवा काढायला सुरवात केली होती– अंगठ्याच्या नखावर एकेक ऊ टिपून धरून टचकन् मारताना तिचा आविर्भाव मात्र पाहाण्यासारखाच होता. मोटरच्या काचा पुसतापुसता छगनच्या अगावर प्रत्येक ऊ मारतागणिक शहारे उठत होते– तरीही तिच्या काळ्याशार नाजूक, कमतीव देहाकडे आणि बालिश तुकतुकीत चेहेऱ्याकड पाहिल्याशिवाय त्याला राहवत नव्हत. रुमडीचं केस विंचरण आणि छगनच मोटार पुसणं काही केल्या सपेना– सोमाच्या बायकोच मात्र आवार झाडून पालापाचोळा जाळण्याच काम केव्हाच सपलं– तिन बारीक नजरेनं गॅरेजमधल रेंगाळणारं काम पाहून घेतल आणि पुन: ती रुमडीसमोर फतकल मारून विडीचे झुरके मारीत बसली– "अरे छगनभाय–" तिनं मोठ्यांदा हाका मारून छगनला बाहेर बोलावल– बूट करकर वाजवीत छगन गॅरेजबाहेर आला.

"आता तूच साग बाबा, ही काल रात्रीची बापाबरोबर भांडून बाहेर पडली पोराना घेऊन– आता झोपडं कुटं बाधील ही ? राहील कुठं ? खाईल काय ? वडील मानसाशी अस भाडाव काय ? असा डोक्शीत राग धरून बसाव काय ?"

छगन नुसता हसला. तो काय सागणार ! त्याचीच बायको भाडभांड भाडून कुठं नाहीशी झालीय लग्नानतर लगेच, त्याला झाली आठ वर्षं ! अजून ती परत येईल परत येईल या दुबळ्या आशेवर बिचारा ससार नीट माडून बसलाय. पण ती काही परत येत नाही नि बाईवाटलीत अडकलेला छगनचा जीव क ही केल्या सुटत नाही–छगन या ससारातल्या अडचणीविषयी काय सल्ला देणार ? तो नुसता हसला. आणि हातातल्या फडक्याची नुसती चाळवाचाळव करीत राहिला–पण तरीहि रुमडीच्या घटमूट देहावर त्याची नजर मधूनमधून फिरतच राहिली. सरळपणानं नाही तरी मधूनमधून, तिरकस अशी–खालमुंडी पाताळधुडी तशी.

रुमडीच्या लक्षात ते येताच ती वस्सकन सोमाच्या बायकोच्याच अगावर येऊन ओरडली "तुमा लोकाला काय कामधदा करायचा नाय ? हितंच गोष्टी करीत बसलेत ती ! जावा लागा कामाला. शेठ ओरडत्याल–" सोमाची बायको उठली–पण छगन मात्र तसाच उभा राहिला–कपाळाला आठी घालून म्हणाला, "मला गॅरेज साफ करायचय–मोटार बाहेर काढायचीय– तूच हे आवर सगळ ! फतकल मारून उवा काढीत बसली आहेस ती ! ऊठ आधी ! नाहीतर शेठ तुलाच ओरडतील– तियं आव्याखाली घेऊन बस हे तुझं सामान."

आपल्या भाषेत इरसाल शिव्या घालीत, हातवारे करीत रुमडी तशीच बसली–आधीच संतापानं डोकं पिसाटल होतं तिचं–त्यात जो येत होता त्याचा उपदेश आणि दम, दोन्ही एकदमच सुरू होत होते–चिडून चिडून शेवटी ती कचाकचा केस ओढून आपल्याशीच भाडत बसली–रडत ओरडत राहिली.

एव्हाना आठ साडेआठ झाले होते. मालकाकडे कुणीतरी बडे पाहुणे दोन प्रशस्त गाड्यांतून आले. फटाफट दारे उघडून ते चौघे पाचजण मोटारीतून उतरले नि दारं बद करायच्या ऐवजी रुमडी आणि तिच्या ससाराकडे चकित होऊन बघतच राहिले– गालातल्या गालात मिस्किल हसतच राहिले. छगन लगबगीने पुढे आला–

"या या साहेब– शेठ वाट पाहाताहेत आपली– चला. असे इकडून या " रुमडीकडे डोळे वटारून बघता बघतानाच त्या सर्वांना त्या पसाऱ्यातून वाट काढून देऊन तो आत गेला–

रुमडीनं मुकाट्यान सारा पसारा आवरून जरा दूर आव्याखाली नेऊन लावून ठेवला. धाकट उठलं होतं त्याला तिन पुन. पाजवल. कालचे भाकरीचे शिळे तुकडे होते ते मोठ्याना खाऊ घालून त्याना डुकरापाठी, गाढवापाठी लावून दिल–आणि ती स्वस्थ बुंध्याला टेकून विचार करीत बसून राहिली.

काम झाल्यावर मालकाकडील पाहुणे परत निघाले– मोटारीत बसले. मोटार सुरू करता करता, पोहोचवायला आलेल्या मालकाना हसून म्हणाले,

"हे नवीन विन्हाड कुठून पैदा केलत तुम्ही ?" रुमडी ते ऐकून नाकपुड्या फुलवीत, तोड फिरवून पाठमोरी झाली–मोटारी भुर्रदिशी निघून गेल्या.

"रुमडे, आण्णाप्पा कुठाय ?" घरात वळतांना मालकानी विचारल–

"गाडवं घेऊन गेल्याती "– चुळबुळत उठून रुमडी म्हणाली.

"हे बघ, मी फक्त दोन दिवस इथं राह्यला देईन. तोवर गिड्डाशी भाडण मिटवा. तुझा बाप तो. तुला नि आण्णाप्पाला एवढं एवढसं त्यानं वाढवलंय त्याच्याशी भाडायला काही वाटत नाही तुम्हा दोघांना ? "

"मग त्यान माझ्या नवऱ्याला दम का द्यावा ? चार झाली की पोरं त्याला– काय नहान हाई का ? दम दिलान्, चालतं व्हा

म्हनला, लवकर निघालो न्हाई तर्‍ही दोन रट्ट हानलेन– शोबलं का ते माज्या वाला ? बाप असला म्हनून काय झालं ? मीबी त्याचीच ल्येक हाये– तश्शी निघाले झोपडं सोडून–" रुमडीचा राग नाकावर नुसता फुलून आला होता.

"हे बघ– तुझी साससुद्धा गिड्डाकडेच राहतीय– त्याचीच बहीण ती– नवरा मेल्यापासून तिळा नि आण्णाप्पाला त्यान समाळलय– तेव्हा चार थपडा कावल्या नि दोन गोष्टी सुनावल्या म्हणून तुम्हा लोकांना एवढा राग नाकावर धरायला नकोय–काय ते ठरवा– उद्या सच्याकाळपर्यंत. नाहीतर दुसरीकडे जागा बघा–" मालकाचा शांतपणा रुमडीला झोंबला–

"काल येवडं अन्नाप्पानं सांगितलं तरी पटत न्हाई तुमाला– नवी जागा मिळस्तोवर हित राह्यला द्या मालक– लई उपकार व्हतील वगा–काईबी करून समद भाड भरू– येक झोपड लावायला द्या या आव्याखाली–" गयावया करून ती म्हणाली.

"कशाला ? दारू पिऊन धिंगामस्ती घालायला ? रोज उठून भाडण कोण सोडवणार तुमची ? चागल मावाच्या मुलीच लग्न ठरवत होता गिड्डा तर आण्णाप्पान दारूच्या धुदीत, गाढवासारखं वरळून ते मोडलं– काल गिड्डा म्हणाला मला– ते काही नाही– उद्यापर्यंत काय ते ठरवा– नि इथ घाण करून ठेवू नका ह ! "– एवढं बोलून मालक निघून गेले–अर्धा जोम ओसरून रुमडी परत फतकल मारून बसली.

मग अकरा वाजेपर्यंत तिचे शेजारी पाजारी, नातेवाईक कितीतरी जण येत राहिले नि तिची चौकशी करून, तिची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत निघून गेले–त्याच्या वडार भाषेत कलाकला करून काहीतरी ती सारीजण बोलत. मग मोठ्यानं ओक्साबोक्शी रडणं होई, आदळ आपट होई–येणारे गप्प होऊन निघून जात– बाराच्या सुमारास तिची सासू आली–आल्यासरशी तिने दगड माडले– काटक्या पेटवल्या, तवा टाकला– नि पितळी घेऊन पऱ्याच्या डब्यातलं पीठ ती कालवीत बसली–भोवती पोराच कोडाळ झाल– आणाप्पाही कुठूनतरी घामेजून आला– घामट शर्ट फादीवर टाकून तोही आईशेजारी मातीतच बसकण मारून बसला– पुन: कलाकला सुरू !

रुमडीचा रुसवा अजून गेला नव्हता– सासून एवढा आग्रह करूनही तिनं भाकरीचा एक तुकडाही उष्टावला नाही– म्हातारी तान्ह्या बाळाकडे बोट दाखवून पुन: पुन: तिला भाकर खाण्याविषयी सुचवत होती. पण नाही– ती तश्शी बसून राहिली. पोरानी नि अण्णाप्पान मात्र ताव मारला– म्हातारीनं अॅल्यूमिनियमच्या कळकट पातेल्यातून घरूनच कसलं तरी कालवण आणलं होत– ते कालवण नि पाच सहा भाकऱ्या– केव्हाच फडशा उडाला त्याचा– नि पोर नि अण्णाप्पा शेवटी मुकेलेच राहिले–म्हातारीच्या डोळ्यांत पाणी उमं राहिल– नाक सुरसुरवीत, मनगटानीच नाक पुशीत काहीतरी ती बोलू लागली. थोडं समजुतीचं काही–थोडंस दमदाटीच–काही अजिजीचं– हातपाय थरथर कापत होते म्हातारीचे बोलताना, भावना न आवरून– पण रुमडी बाळाला पाजीत तशीच पायावर पाय टाकून बसून राहिली– ओठावर ओठ गच्च मिटून– उपाशी पोटी–

शेवटी कलकल करून म्हातारी थकली –नि अखेरचा उपाय म्हणून शिव्यागाळी करू लागली – रुमडी मधूनच एकादा हुंकार देई. कुत्सित स्वरात एकादा शब्द बोले. त्यामुळे म्हातारीचा जीव सतापून नुसता गळ्यात येऊन अडकून पडला. सगळ्या वाडीतले लोक त्या कर्कश आरड्याओरड्याने गोळा झाले. तर्कटी अण्णाप्पा शेवटी फावडं घेऊन म्हातारीच्या मागं धावला. तशी किंचाळत आरडाओरडा करीत ती पळत सुटली. पालीसारखी कर्कशपणे चीत्कारत निघाली. हाडाची मोटली कशीबशी सावरत जीव घेऊन पळाली.

लोक चेष्टामस्करी करीत परत निघून गेले. आंब्याच्या सावलीतच अण्णाप्पान मग अंग लोटून दिलं. दुपार भणभणली. पोर इकडं तिकडं करू लागली. घोटभर पाणी पिऊन रुमडीही जमिनीबाहेर आलेल्या एका मुळावर डोकं ठेवून, बाळाला पुढ्यात घेऊन लवडली नि त्याला पाजता पाजतां, आव्याची पान मोजता मोजता अलगद झोपेच्या स्वाधीन झाली.

साडेतीनच्या सुमारास, तांबडा रेशमी साफा बांधून, चादीचं कड दंडात सरकवीत, मिशीला पीळ भरीत, पायांतल्या वाहणा कर्रकर्र वाजवीत गिड्डा वडारी वाडीत शिरला.

## सोस

सोसासोसानेच
घातला हा घाट
आता पायवाट
सोसवेना –

सोसवेना वाट
तरी आज मन
जाणी तुझे, अन्
पुढे चाले –

सोसली ही वाट
तुझ्या प्रीतीपायी
माझ्या हट्टापायी
वाढली ही –

कधी तुझ्या पायी
प्याले हलाहला
अमृत प्रीतीला
मानूनिया –

कधी भयंकर
वळणाचा घाट
काळोख हा दाट
चहूकडे –

तुझीच सोबत
मानूनिया आले
नाही बघितले
मागे पुढे

आज मात्र मला
उरली ही वाट
काटे वाटोवाट
तुडवाया –

तुला त्याचे काही
सुख-दु:ख नाही
मला मात्र कधी
दाटते रे –

आता माझी मीच
होऊनिया वाट
तुझी पायवाट
धुंडते रे –

*कु. सुधा जोशी*

★

मालकाकडे तो रोजच या सुमारास हिशेबा-साठी, कामासाठी यायचा. शेदीडशे वडार वस्तीचा हा म्होरक्या—मुकादम—गावात कुठलंही, कसलंही काम असो, बाहेरून मजूर आणण्याची जरूरच लागायची नाही—गिड्डा मुकादमाला नुसती खबर द्यायची—की बस्स-वीसपंचवीस बायका, दहाबारा पोरं, नि वीस बावीस बाप्ये; हातात टिकाव, घमेली, नि गाढवांवर पोती घालून सकाळीच हजर व्हायची, नि कामाला सुरवात; मालकानंच दिलेल्या एका अरुंद, चिंचोळक्या जमीनिच्या पट्टीवर त्यांनी वडारवस्ती उभारलेली होती—तिथला हा मुकादम—अण्णाप्पाचा सासरा—रुमडीचा बाप—रुबाबदार गिड्डा—वहाणा करकरावीत आला. तेव्हा रुमडी कुशीवर निजलेली होती, तान्हं जागं होऊन हातपाय हलवीत होतं. अण्णाप्पा उताणा पडून घोरत होता. नि पोरं फांदीवर बसून झुलत होती. त्यांनी आजोबाला पाहिल्याबरोबर पटापट पटापट खाली उड्या टाकल्या. नि एकच गिल्ला करून आजोबाला चारी बाजूनी वेढलं—रंगीबेरंगी रुमालात बांधलेल्या भाजक्या भुइमुगाच्या शेंगा पसापसा त्यांच्या हातावर टाकून गिड्डा घाकटयाला खांद्यावर टाकून पुढं निघाला—तरीही चष्म्याआडून, डोळ्यांच्या कोपऱ्यांतून त्यानं लेकीचा उघडयावरचा संसार निरखून पाहिलाच.

ओटीवर खुर्चीवर बैठक मारून मालकाबरोबर त्यानं कामाच्या गोष्टी केल्या—कागदपत्रांवर अंगठे दिले—दुसऱ्या दिवसाच्या नव्या कामाची माहिती घेतली—नि अर्ध्या-एक तासानं तो उठला—तोवर दुपारच्या चहाची वेळ झाली होती—स्वयंपाकघरातून चहाचे दोन कप नि चकल्या बाहेर आल्या.

"गिड्डा, चहा घे—नातवाला चकली दे तुझ्या—" मालकांनी कप तोंडाला लावीत नि चकली पुढं करीत म्हटलं.

गिड्डा हसला—रुमालानं नातवाच्या नाकातून गळणारा शेंबूड पुसून, चकली हातात देऊन त्यानं त्याला बाहेर लावून दिला नि आपण स्वस्थच बसला.

"अरे चहा घे—रोज घेत नाहीस का? आजच काय धाड भरलीय तुला?" कप पुढं सारीत मालक म्हणाले.

"नको नको शेठ." जेमतेम एकाएकी आलेलं रडं आवरीत, शेमल्यानं चष्म्याआडून डोळे पुशीत गिड्डा म्हणाला, "कालपासून रुमडी उपाशी आहे. अंगावरचं पितं पोर—त्याला एकसारखी पाजतेय नि कायीच खात नाय बगा. आन राग तर अस्सा ... माजी भईन सांगून गेली तरी यायला बगत नाय बघा—आता काय करनार? एवड्या पोरांना मी काय बोलवायचं?" आणि पुरुषासारखा तो पुरुष, हुंदके देऊन देऊन रडायला लागला—मोठ्या मोठ्यानं—लहान मुलासारखा.

मालक तिरीमिरीनं उठले—ताडताड गॅरेजकडे गेले—मोठ्यांदा ओरडले, "अण्णाप्पा, अरे ऊठ गाढवा! घोरतो आहेस काय डुकरासारखा? ऊठ आधी." अण्णाप्पा दचकून उठला—लगोलग रुमडीही—पोरंही धावरून त्यांच्याभोवती बिलगून उभी राहिली.

"तुला काय सांगितलं होतं? इथं वाडीत घाण करायची नाही म्हणून? काय हे! हे बघ तुझ्या पोरांनी इथं हगूनमुतून सगळी घाण करून ठेवलीय—आणि तुझी डुकरं बघ—अरे ठोंब्या, सगळ्या आमच्या बागेची त्यांनी विल्हेवाट लावून टाकली ना? ऊठ आधी पहिला—उचल तुझा बाडबिस्तारा—चल ग ए रुमडे—चल—उचल ते डबेबिबे काय असतील ते नि चालायला लागा कसे!" मालकांचा आवाज एकदम चढला.

रुमडीला काही सुचेना—अण्णाप्पा गयावया करायला लागला—मालकांच्या पाया पडायला लागला—पण मालक ऐकेनातच. तिथूनच ते मोठ्यांदा ओरडले, "ए गिड्डा—अगोदर इकडे ये—येतोस की नाही?" गिड्डा बावचळून, तसाच डोळे पुसत पुसत धावत बाहेर आला—त्याला काही बोलायला अवसरही न देता ते गुरकावून पुन: म्हणाले—


"तुला लाज वाटत नाही, अण्णाप्पाला काल मारलंस ते! तुझा एवढा मोठा जावई तो. सगळ्यांच्या देखत त्याला घालवून दिलंस? आणि माझ्या मागे नसती कटकट लावून दिलीस! चल—हो नाही नि नाही नाही—उचल त्या पोरांना—नि जा घेऊन पहिला आपल्या घरी—जा म्हणतो ना? आमच्या मागं नसती ब्याद नकोय—चलो—हटो—" काहीच न सुचल्यानं गिड्डानं दोन पोरांना काखोटीला मारलं नि तो पुढं निघाला—मागून तान्ह्याला घेऊन रडत आरडत रुमडी आणि दोन्ही हातांनी जेवढं सामान नेता येईल तेवढं घेऊन, बावऱ्या बावळट मुद्रेनं सर्वांच्या मागून अण्णाप्पा—आरडाओरडा करीत, सावळा गोंधळ घालीत ते वऱ्हाड रस्त्यातून निघालं—उरलंसुरलं सामान दुसऱ्या एका वडाऱ्याच्या डोक्यावर घालून मालकांनी लागलीच पाठवून दिलं.

रात्री गिड्डा परत माघारी आला—चार वडारी घेऊन नवीन बांधकामावर रातोरात सिमेंटची पोती पोचवायची होती म्हणून—"काय रे गिड्डा! विऱ्हाड नीट वसलं की नाही रुमडीचं?" मालकांनी हसून विचारलं.


गिड्डानं नुसती मान हलवली—तो बोलला काहीच नाही—कारण मालक कधी दुपारसारखे चार लोकांसमोर टाकून बोलले नव्हते त्याला.—त्याचा अजून मनात थोडा राग होता.

"बरं कारे गिड्डा, दुपारी उगीचच खोटंखोटं रागावलो होतो मी बरं का? तू काही तसं मनात आणू नकोस हो! अरे ती हटवादी पोरं निघाली असती का इथून त्याशिवाय? कालपासून चारदा समजावून सांगितलं होतं. पण डोकी वथ्थड ना"—मालक म्हणाले—गिड्डाचा जीव भांड्यात पडला आणि रुमडीच्या हातचं डुकराचं मटण भरपेट खाऊन आलेल्या गिड्ड्यानं समाधानानं ढेकर दिला.

● ● ●



# सवलतीच्या दोन आकर्षक योजना



## राजा शिवछत्रपती

भाग एक ते दहा

लेखक : ब. मो. पुरंदरे

तिसऱ्या सचित्र आणि डी लक्स
आवृत्तीच्या छपाईस प्रारंभ.

प्रसिद्धी : डिसेंबर १९६४

दीड हजार पृष्ठांच्या ज्या साधार पण ललितरम्य शिवचरित्राने मराठी वाचकाला आजवर एक अपूर्व मोहिनी घातली,

जो ग्रंथ प्रत्येक मराठी भाषिकाच्या घरी असावा यासाठी आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे यांच्यासारखी अव्वल आणि मातब्बर मंडळी लेखद्वारा, पत्रद्वारा, संभाषणातून वा भाषणातून आपला अमोल शब्द वेचीत आहेत,

तो हा ग्रंथ सर्वसामान्य परिस्थितीतील मराठी माणसाला विकत घेऊन संग्रही ठेवता यावा म्हणून **–राजहंस प्रकाशन संस्था** सवलतीच्या पुढील दोन योजना जाहीर करीत आहे.

**१ : राजहंस प्रकाशन संस्थेकडे पांच वर्षांसाठी शंभर रुपयांची ठेव ठेवणारास हे संपूर्ण शिवचरित्र व्याजाच्य मोबदल्यांत विनामूल्य घरपोच दिले जाईल. पांच वर्षानंतर ठेव परत करण्यात येईल. यासंबंधी अधिक तपशील हवा असल्यास पत्रकाची मागणी संस्थेकडे करावी.**

**२ : या तृतीय आवृत्तीच्या संपूर्ण शिवचरित्र संचाची किंमत प्रसिद्धीनंतर रुपये पसतीस राहील. १ ऑक्टोबर १९६४ पर्यंत रुपये पंचवीस फक्त पाठवून प्रसिद्धिपूर्व ग्राहक होता येईल.**

**[ संच पोस्टाने हवा असेल तर रजि. पोस्टखर्चासाठी अडीच रुपये अधिक पाठविणे. ]**

ठेवीची वा प्रसिद्धिपूर्व ग्राहकाची रक्कम ' राजहंस प्रकाशन ' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.

चेक असल्यास शक्यतो पुणे-मुंबई येथील बँकेवरचा पाठवावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास वटणावळ ७५ न. पै. अधिक पाठवावेत.

चित्रकार दीनानाथ दलालांची शंभरहून अधिक रेखाचित्रे व आकर्षक मुखपृष्ठे, ऐतिहासिक स्थळांची व व्यक्तींची छायाचित्रे, पांढरा शुभ्र कागद, मोहरेदार छपाई, टिकाऊ बांधणी–या व इतर वैशिष्टयांनी युक्त असल्याने, एका सुबक पेटीतून वाचकांच्या भेटीस येणारा हा संच म्हणजे प्रत्येक कुटुंबाचे, प्रत्येक ग्रंथालयाचे एक भूषणच ठरणार आहे.

## राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

THE RISE AND FALL OF THE THIRD REICH
या WILLIAM L. SHIRER
यांच्या पुस्तकावर आधारित लेखमाला

## लेखांक पाचवा




**ऱ्हाईनलँड हा मूळ जर्मनीचाच भूभाग. पण पहिल्या महायुद्धानंतर फ्रान्सला जर्मन आक्रमणापासून सततचे संरक्षण मिळावे म्हणून व्हर्सायच्या तहान्वये हा भूभाग निर्लष्करी ठेवण्यात आला होता. सत्तेवर येताच हिटलरने ऱ्हाईनलँडच्या या निर्लष्करी भूभागात सैन्य घुसवले आणि व्हर्सायचा तह ठोकरून हा भूभाग जर्मनीला जोडून टाकला....**

**: १ :**

ऱ्हाइनलँडमधील या यशस्वी हालचालीने हिटलर व नाझी पक्ष यांचा फार मोठाच फायदा झाला. एकतर हिटलरची व पक्षाची लोकप्रियता शिगेला पोचली व आतापर्यंत लष्करी हालचालींच्या बाबतीत सेनाधिकाऱ्यांच्या मताला जी किंमत देण्यात येत असे, त्याला हिटलरने धक्का दिला. सर्व सेनाधिकाऱ्यांच्या सल्ल्याविरुद्ध हिटलरने ही लष्करी कारवाई केली व यशस्वी रीत्या उरकली. अर्थातच सैन्यदलांवर हिटलरचा चांगलाच वचक निर्माण झाला. तिसरा मोठा परिणाम म्हणजे यशासारखे दुसरे यश नाही, या नियमानुसार युरोपात आपण हवे ते हिसकावू शकू हा हिटलरचा आत्मविश्वास दृढ झाला.

मार्च १९३६ मध्ये दोस्तांना......विशेषत: फ्रान्स व इंग्लंडला... युद्धाचा मोठा धोका न पत्करता हिटलरला जेरीस आणण्याची मोठी संधी मिळाली होती व ही शेवटची होती. यानंतर जसजसा काळ गेला तसतसा जर्मनी लष्करी दृष्ट्या बलदंड होत गेला व आता त्याला जेर करणे म्हणजे युद्धाचे आव्हान घेण्यासारखे आहे, ही भीती दोस्तांच्या मनात दृढमूल होऊ लागली.

फ्रान्सच्या बाबतीत विचार करावयाचा तर त्यांच्या आत्मघाताची ही सुरुवात होती! कारण सरहद्दी भिडलेला देश जर आक्रमकाकडे उदार व उदास बुद्धीने पाहात राहिला, तर हाकेच्या अंतरावरील देश आपण होऊन कशाला वांदल करतील? अखेर जो तो आपल्याच मरणाने मरतो तो असा! केवळ फ्रान्सचा हा आत्मघात ठरला नाही तर रशिया, पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, रुमानिया, युगोस्लाव्हिया हे जे अन्य देश फ्रान्सकडे आपला एक रक्षणकर्ता म्हणून पहात होते, त्यांचा भ्रमनिरास होऊन फ्रान्सवर अवलंबून राहून जर्मनीशी शत्रुत्व करण्याची कल्पना आता त्यांना भयानक वाटू लागली. कोसळणाऱ्या छपराच्या वळचणीला कोण उभे राहील?

मॅजिनॉट तटबंदीला समांतर अशी सिगफ्रिड तटबंदी आता जर्मनी उभी करू लागला. याचा अर्थ मनात येईल तेव्हा फ्रेंच फौजा फ्रान्स किंवा बेल्जममधून जर्मनीवर कोसळण्याची शक्यता आता हळूहळू नाहीशी होऊ लागली. फ्रेंचांची शक्ती पश्चिमेकडे अडवल्यावर, पूर्वेकडील राष्ट्रांना फ्रान्स कसली कपाळाची मदत करणार! हा विचार जर्मनीच्या पूर्व बाजूस सरहद्दी भिडलेल्या छोट्या राष्ट्रांना आता अस्वस्थ करू लागला.

### ऑस्ट्रियाचा गळफास

बरोबर हीच प्रतिक्रिया डॉ. शुशेनिग् याने आपल्या आठवणींमध्ये नमूद केली आहे. डॉ. शुशेनिग हा डोलफसच्या (Dollfus) खुनानंतर ऑस्ट्रियाचा चॅन्सलर झाला होता. जेव्हा ऱ्हाइनलँड जर्मनीने कबजात घेतला त्या वेळी आपली मन:स्थिती वर्णन करताना त्याने लिहिले आहे–

"As I stood at the grave of my predecessor, ( the murdered Dollfus ) I knew that in order to save Austrian Independence I had to embark on a course of appeasement."

[ डोलफसच्या थडग्याजवळ उभा असताना माझ्या मनात हेच येत होते की, यापुढे ऑस्ट्रियाचे स्वातंत्र्य टिकवावयाचे असेल तर मला जर्मनीच्या खुशामतीच्या नव्या मार्गाने गेले पाहिजे.]

# भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री



फरान्सची ही रडकथा तर इटलीची दुसरीच ! इटली हा ऑस्ट्रियाचा दुसरा रक्षक ! ॲबिसिनिया घेणे हे मुसोलिनीला वाटले तितके सोपे गेले नाही. युद्ध रेंगाळू लागले व या प्रकरणात इटलीचे फरान्स व इंग्लंडशी वाकडे आले, आता इटली आपल्या मदतीला येईल ही ऑस्ट्रियाची आशाही मावळली.

डॉ. शूशेनिगने आपल्या खुशामतीच्या धोरणाला सुरुवात केली. डोलफस्च्या खुनानंतर पॅपेन हा जर्मनीचा प्रतिनिधी म्हणून ऑस्ट्रियात आलेला होताच. त्याने ऑस्ट्रियाला गिळण्याच्या दृष्टीने आपले पवित्रे टाकण्यास सुरुवात केली. पॅपन–शूशेनिग या दुकलीने ११ जुलै १९३६ ला ऑस्ट्रो-जर्मन करार घडवून आणला. या कराराच्या मुख्य अटी दोन. (१) जर्मनीने ऑस्ट्रियाचे स्वयंपूर्णत्व मान्य केले; (२) परराष्ट्र व्यवहारात ऑस्ट्रिया यापुढे आपण जर्मनीचाच प्रांत आहोत या नात्याने सर्व व्यवहार करील.

याशिवाय दोन अलिखित अटी डॉ. शूशेनिगने मान्य केल्या. या अटींप्रमाणे ऑस्ट्रियातील नॅशनल पक्षाचे तुरुंगात कोंडलेले विरोधक ( नाझी पक्षाचाच दुसऱ्या नावाखाली ऑस्ट्रियात वावरणारा हा पक्ष होता.) मुक्त करावेत व त्यातील कुणातरी जबाबदार पुढाऱ्याला आपल्या सरकारात घ्यावे. याच अटींनुसार पुढे ऑस्ट्रियाचा सूर्याजी पिसाळ ठरलेला सेयस् इनक्वार्ट (Seyss Inquart) या धंद्याने वकील असलेल्या माणसाचा डॉ. शूशेनिग सरकारात प्रवेश झाला.

या तहान्वये खरे पाहता इटलीच्या नाकाला मिरच्या लागावयास हव्या होत्या. कारण आतापावेतो ऑस्ट्रियावर इटलीचा पगडा होता. तो झुगारून आता ऑस्ट्रिया जर्मनीच्या मांडीवर दत्तक देणारा हा करार होता.



बहुतेक आफ्रिका खंड इतर पाश्चात्य राष्ट्रांनी यापूर्वीच गिळंकृत केलेला होता. ॲबिसिनिया हा आफ्रिकेतील शेवटचा स्वतंत्र देशही शेवटी मुसोलिनीच्या आक्रमणाला बळी पडला. निरपराध ॲबिसिनियन जनतेवर विषारी वायु, बॉबहल्ला यांचा मारा करूनही हा विजय पदरात पाडून घेण्यास मुसोलिनीला सात महिने लागले.

**७ ऑक्टोबर १९३५ या दिवशी इटालियन सेनापती जनलर व्हिला सांता याला ॲबिसिनियन्स शरण जाताना**

असे असूनही पॅपेन जेव्हा या अटी घेऊन हिटलरच्या अनुमतीसाठी बर्लिनला आला (१६ जुलै) तेव्हा हिटलर पॅपेनवर रागावला. त्याच्या म्हणण्याप्रमणे या करारातील पहिली अट स्वीकारून पॅपेनने घात केला होता. परंतु यापुढे ज्या घटना युरोपात घडल्या त्यामुळे हा करार अखेर ऑस्ट्रियाचाच गळफास ठरला.

२ मे १९३६ ला आदिसअबाबा या ॲबिसिनियाच्या राजधानीत इटलीच्या फौजा घुसल्या व ॲबिसिनिया शरण गेला. तावडतोड लीग ऑफ नेशन्सने इटलीविरुद्ध जाहीर केलेले नाकेबंदीचे उपाय काढून घेतले व इटलीच्या कृत्यांवर पांघरूण घातले. या गोष्टीला दोन महिने उलटण्यापूर्वीच १६ जुलैला स्पेनमध्ये जनरल फ्रँकोने क्रांतीचे निशाण फडकवले व स्पेनमध्ये यादवीला तोंड लागले.

२२ जुलै १९३६ ला प्रतिवर्षाप्रमाणे हिटलर बायरूथ येथे वॅगनर संगीतोत्सवात हजर होता. त्या दिवशी रात्री तो कार्यक्रम आटपून आपल्या निवासस्थानी येतो. जनरल फ्रँकोने पाठवलेला दूत त्याची वाट पहात होता.

जनरल फ्रँकोने हिटलरकडे लष्करी विमाने व इतर साहित्य यांची मागणी केली होती. गोअरिंग व जनरल ब्लोमबर्ग हे दोघे बायरुथ् समारंभाला हजर होतेच. या दोघांना हिटलरने विचारविनिमयासाठी बोलावले व स्पेनमधील यादवीत फ्रँकोला लष्करी मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

इटलीने तर जनरल फ्रँकोला ६० ते ७० हजार सैन्य पाठवून मदत केली. याचा विचार करता जर्मनीची मदत स्पेनच्या दृष्टीने फारशी नव्हती, परंतु गोअरिंगने या यादवीचा प्रमुख उपयोग केला तो आपल्या विमानदलातील वैमानिकांना प्रत्यक्ष युद्धाचा अनुभव देण्यासाठी ! त्याने हजारो जर्मन वैमानिक दोनदोन महिने, तीन तीन महिने या यादवी युद्धात भाग घेण्यासाठी पाठविले व आपले वायुदल झपाट्याने अद्यावत् करण्यास सुरुवात केली.

फ्रँकोला उपकारात ठेवून हिटलरने फ्रान्सच्या अगदी लगत आपला एक बगलबच्चा तयार केला ! आता फ्रान्स तिन्ही अंगांनी निर्मित्र झाला ! शिवाय इंग्लंड, फ्रान्सपासून दुरावलेला इटली आपल्या कच्छपी लावण्याची ही आणखी एक संधी हिटलरला मिळाली. इटालियन फौजा व जर्मन वायुसैनिक जनरल फ्रँकोच्या बाजूने, स्पेनमध्ये खांद्याला खांदा लावून लढू लागले !

### इटली कच्छपी लागला

हिटलरचा अंदाज बरोबर ठरला ! २४ ऑक्टोबरला इटलीचा परराष्ट्र मंत्री व मुसोलिनीचा जावई, काऊंट सिआनो हा बर्चेसगार्डन येथे हिटलरला भेटावयास आला. सियानोजवळ हिटलरने मुसोलिनीबद्दल धन्योद्गार काढले–

" Mussolini is the leading statesman in the world to whom none may ever remotely compare himself..."

[ मुसोलिनी हा जगातील धुरंधर मुत्सद्दी असून त्याच्याशी कुणाचीही तुलना करता येणार नाही...] हे आपल्या सासऱ्याचे वर्णन सिआनोने ऐकताच तो प्रफुल्लित झाला. सिआनोला विश्वासात घेऊन हिटलरने सांगितले,

स्पेनमधील यादवी युद्ध



बॉबहल्ल्यानंतरचे एक नगर

फ्रान्सकडे निघालेला स्पॅनिश निर्वासितांचा तांडा




चर्च, सैन्य आणि बडे जमीनदार या त्रिवर्गीच्या हाती सत्ता केंद्रित झाल्यामुळे स्पेन हा विसाव्या शतकाच्या आरंभापासूनच अंतर्गत यादवीच्या ज्वालामुखीवर उभा होता. जनतेचे उठाव मधून मधून होत होते व तितक्याच निर्घृणपणे ते सत्ताधाऱ्यांकडून चिरडले जात होते. १९३६–३९ ही तीन वर्षे स्पेनमध्ये सतत यादवीयुद्ध सुरू होते. फ्रँको गटाला जर्मनी-इटली यांची मदत होती तर समाजवाद्यांना रशियाकडून साहाय्य होत होते. दोन्हीही पक्ष बॉबहल्ले, कत्तली, दहशतवादी कृत्ये या मार्गांचा सरसहा वापर करीत होते.

याच कालखंडात स्व. नेहरूंनी स्पेनला भेट देऊन फ्रँकोविरोधी आंदोलनाला आपली सहानुभूती व्यक्त केली होती.

"Together Italy and Germany could conquer not only Bolshevism but the west...including England! In three years Germany will be ready."

[इटली व जर्मनी एकत्र येतील तर ते बोल्शेव्हिझमवरच केवळ नव्हे तर सर्व पश्चिमेवर इंग्लंड धरून विजय मिळवू शकतील येत्या तीन वर्षांत यासाठी जर्मनी तयार होईल.]

२४ ऑक्टोबर १९३६ ला हिटलरने शिआनोला सांगितले की तीन वर्षांत जर्मनी तयार होईल त्याप्रमाणे खरोखरच १ सप्टेंबर १९३९ ला...बरोबर तीन वर्षांनी दुसरे महायुद्ध भडकले!!

२१ ऑक्टोबरला तत्पूर्वी बर्लिन येथे जर्मनीच्या वतीने न्यूराथ व इटलीच्या वतीने शिआनो यांनी एका गुप्त करारावर सह्या केल्या. या करारानुसार परराष्ट्रीय राजकारणात जर्मनी व इटली यांची संयुक्त आघाडी राहील हे मान्य करण्यात आले. या कराराचा उल्लेख Axis असा करण्यात येऊ लागला. या Axis भोवती इतर युरोपियन राष्ट्रांनी आपले भवितव्य आखावे असे जणू सुचविण्यात आले होते. याचाच उच्चार हिटलर व मुसोलिनी फक्त Axis या एका शब्दाने पुढे करू लागले.

मुसोलिनीला खिशात घालून हिटलरने आपला मोर्चा आता इंग्लंड-कडे वळवला. इंग्लंडशी एकदा अनाक्रमणाचा करार करण्याची त्याची इच्छा होती. यासाठी रिबेन्ट्रॉप याची जर्मनीचा वकील म्हणून त्याने इंग्लंडमध्ये पाठवणी केली. रिबेन्ट्रॉप हा आळशी व या कामाला लायक माणूस नाही असे गोअरिंगचे मत होते व ते त्याने हिटलरपुढे मांडले.

यावर हिटलर म्हणाला, "परंतु रिबेन्ट्रॉपची इंग्लंडमधल्या कितीतरी लॉर्डांशी ओळख आहे. मंत्र्यांशी ओळख आहे."

यावर गोअरिंग म्हणाला,

"हे ठीक आहे. वांधा फक्त इतकाच आहे, की हे लॉर्ड व मंत्रीही रिबेन्ट्रॉपला चांगला ओळखतात."

असे असूनही हिटलरने रिबेन्ट्रॉपचाच आग्रह धरला. त्या वेळी इंग्लंडच्या गादीवर असलेल्या ड्यूक ऑफ विंडसरची प्रेयसी मिसेस सिम्पसन् ही देखील रिबेन्ट्रॉपच्या चांगल्या परिचयाची होती परंतु इंग्लिश माणसाच्या जन्मजात सावधपणामुळे कदाचित् असेल, इंग्लंड-मध्ये रिबेन्ट्रॉपची डाळ शिजेना. फ्यूररची मर्जी उडू नये म्हणून शेवटी रिबेन्ट्रॉपने जपान-जर्मन तह घडवून आणण्यातच पुढाकार घेतला.

२५ नोव्हेंबर १९३६ ला जपान व जर्मनी यांचा कॉमिटर्नविरोधी करार (Anti Comintarn pact) जाहीर झाला. या करारान्वये कम्युनिझमचा प्रचार वाढू नये यासाठी विरोधी भूमिका दोघांनी उघड रीतीने स्वीकारली. या कराराचे मुख्य स्वरूप सोव्हिएटविरोधी होते. मुख्य गुप्त अट हीच होती, की रशियाने जर्मनी किंवा जपानवर हल्ला केला तर त्याच्या प्रतिकारार्थ दोघांनी एकत्र यावे. प्रचारासाठी मांड-वल म्हणून केवळ या कराराचे स्वरूप होते. याचसाठी तो नाझींनी राववला. याच करारावर इटलीनेही वर्षभराने सही केली.

१९३६ साल संपले. १९३७च्या ३० जानेवारीला हिटलरने राईशस्टॅगपुढे आपल्या चार वर्षांच्या अमदानीचा आढावा घेणारे भाषण केले. या भाषणात त्याने नेहमीप्रमाणे अखेरचा टोला दिलाच. त्याने जाहीर केले, की व्हर्सायच्या तहावर जर्मनीने दिलेली सही



जनलर फ्रँको



हिटलर - मुसोलिनी

आम्ही परत घेत आहोत. आम्ही हा तह्च आता मानीत नाही. आधीच तो तह उंबरठ्यातल्या खिळ्यासारखा पायदळी गेला होता. आता सही असली काय न नसली काय ? परंतु जर्मन स्वाभिमान व राष्ट्राभिमान हा सतत गोंजारला जाईल असे काहीतरी करण्याची जबाबदारी नेता म्हणून हिटलर मानीत असे, व या दृष्टीने त्याने या भाषणात ही लाथ--इंग्लंड-फ्रान्स आदि दोस्तांना हाणली होती !

या वर्षी विशेष काही घडणार नाही अशी सूचना आपल्या भाषणात पुढे हिटलरने दिली. " The time of so called surprises has been ended." जे मिळवले होते ते आता पचवणे भाग होते. त्यासाठी पुन: काही काळ शांतिपाठ उच्चारीत बसणे आवश्यकच होते.

## मुसोलिनीची जर्मनीभेट

या वर्षातली महत्त्वाची घटना म्हणजे मुसोलिनीची जर्मनीला भेट! २५ सप्टेंबर १९३७ ला मुद्दाम नवीन तयार केलेल्या लष्करी गणवेषात मुसोलिनीने आल्प्स् पर्वत ओलांडून जर्मन राईशमध्ये सन्मानाने प्रवेश केला. त्याच्या स्वागताला हिटलरचे लष्करी दूत हजर होते. यानंतर अशा अनेक वाऱ्या मुसोलिनीला कराव्या लागणार होत्या, याची मात्र त्याला कल्पना नव्हती.

या वेळी हिटलरने मुसोलिनीला भेटीचे निमंत्रण दिले होते ते काही कसल्या वाटाघाटींसाठी नाही ! त्याच्या जावयाने...सिआनोने त्याला सांगितलेल्या जर्मनीच्या लष्करी तयारीची प्रत्यक्ष पहाणी करण्याची संधी मुसोलिनीला द्यावी हा हिटलरचा उद्देश होता. एकादा का जर्मनीच्या अफाट लष्करी सामर्थ्याने मुसोलिनीचे डोळे दिपले की त्याला इटलीचे भवितव्य जर्मनीशी निगडित केल्यावाचून अन्य मार्गच उरणार नाही या हिशोबाने हिटलरने ही भेट आखली होती.

मुसोलिनीला जर्मनीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत फिरवण्यात आले. प्रचंड पक्ष-मेळाव्यांना आणि सैनिक-संचलनांना तो उपस्थित राहील अशी व्यवस्था ठेवण्यात आली. दूर प्रांतातली प्रचंड यंत्रांची फिरणारी चाके त्याने प्रत्यक्ष पाहिली. तीन दिवसांच्या या भेटीत मुसोलिनीला जर्मनीच्या सामर्थ्याचा प्रत्यय आला.

२८ सप्टेंबरला बर्लिनमध्ये एक निरोपाचा व सत्काराचा अजस्र कार्यक्रम करण्यात आला. या सभेत दहा लाख लोकांनी भाग घेतला. मेफिल्ड (Maifeld) मैदानावर दोन्ही हुकूमशहांना पाहाण्यासाठी, ऐकण्यासाठी ही गर्दी उसळली होती.

शिरर स्वत: या सभेला हजर होता. या सोहळ्याचे चक्षुर्वै वर्णन त्याने दिलेले आहे. प्रथम हिटलरने मुसोलिनीचे स्वागत करताना म्हटले--

" The Duce is one of those lonely men of the ages on whom history is not tested, but who themselves are the makers of history. "

[ ड्यूस हे शतकातून निर्माण होणाऱ्यांपैकी अशी एक व्यक्ति आहे की जिच्या कर्तृत्वाला इतिहासाचे बंधन नसते. अशा व्यक्ति स्वत:च इतिहास घडवतात. ]

या हिटलरच्या उद्गारांनी व सत्काराने मुसोलिनी अगदी भारावून गेला व तो जेव्हा बोलावयास उठला तेव्हा सुरू झालेल्या टाळ्यांचा कडकडाट कितीतरी वेळ थांबेचना ! मुसोलिनीचे भाषण मात्र पूर्ण होऊ शकले नाही. तेवढ्यात आकाशात प्रचंड ढगांनी गर्दी केली व सोसाट्याचा पाऊस व वादळ सुरू झाले. सभेवर पाणी पडले. व S. S. स्वयंसेवकांना सभेवर नियंत्रण ठेवणेच अशक्य झाले.

मुसोलिनी परत गेला तो आपले नशीब हिटलरच्या नशिबाशी मनोमन एकत्रित बांधून गेला.

एक महिना उलटताच रिबेन्ट्रॉप रोमला मुसोलिनीला भेटावयास गेला व त्याने ऑस्ट्रियाबाबत बोलणे काढले. मुसोलिनीचा हिटलरबाबतचा सर्व आपपर भाव आता संपलेला असल्यामुळे तो म्हणाला–



जर्मनीच्या लष्करी सामर्थ्याचे मुसोलिनीसमोर हिटलरने केलेले दैदीप्यमान प्रदर्शन !

" Let events in Austria take their natural course " '–ऑस्ट्रियातील घटनांना नैसर्गिकरीत्या जे वळण लागेल ते लागो' असे म्हणून मुसोलिनीने हिटलरला ऑस्ट्रियाबाबत जणू अप्रत्यक्षरीतीने कोरा चेकच दिला. इतकेच करून मुसोलिनी थांबला नाही, तर त्याने जर्मन-जपानमध्ये झालेल्या कोमिंटर्नविरोधी करारावर भागिदार म्हणून सहीही दिली.

आणखी एक देश हिटलरच्या कच्छपी लागला. लोकार्नो करार पायदळी तुडवून जर्मन फौजा ऱ्हाईनलॅंडमधून पुढे येताच बेल्जमची सरहद्द जर्मन सरहद्दीला भिडली. ही घडामोड पाहाताच जर्मनीला खूष राखण्यासाठी बेल्जमचे राजे लिओपोल्ड यांनी लोकार्नो करारातून आपले अंग काढून घेतले व तसे इंग्लंड, फ्रान्सला कळवले. आता बेल्जम हा शुद्ध तटस्थ भूमिका स्वीकारील असे लिओपोल्डनी जाहीर केले.

## चेंबर्लेनचे आगमन

मे १९३७ मध्ये स्टॅन्ले बाल्डविन हा ब्रिटनच्या पंतप्रधानकीच्या पदावरून निवृत्त झाला. त्याची जागा नेव्हिल चेंबर्लेन यांनी घेतली. चेंबर्लेन यांनी पंतप्रधान होताच घोषणा केली की " आपण स्वत: यापुढे परराष्ट्रराजकारणात जास्त लक्ष घालणार असून नाझी जर्मनीशी समझौता घडवून युरोपात कायमची शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणार आहोत. " कायमची शांतता ! !

१९ नोव्हेंबर १९३७ ला लॉर्ड हॅलिफॅक्स हे चेंबर्लेनसाहेबांचा आशीर्वाद घेऊन हिटलरला भेटण्यासाठी बर्चेसगार्डनला आले. या वेळी दोघांचे काय बोलणे झाले तो वृत्तान्त गुप्तच राहिला. फक्त त्यांच्या बोलण्यातून जे मुद्दे स्पष्ट झाले त्याचे टिपण कागदपत्रात सापडले. त्यावरून लॉर्ड हॅलिफॅक्स यांनी खालील मुद्दे स्पष्ट केले असे दिसते–

१. जर्मनीशी तडजोड व्हावी यासाठी पंतप्रधान चेंबर्लेन अतिशय उत्सुक आहेत. यासाठी कॅबिनेट पातळीवर बोलणी व्हावीत असे त्यांना वाटते.

२. जर सर्वसाधारणपणे युरोपात शांतता नांदणारी योजना जर्मनी स्वीकारील तर तावडतोब पूर्व युरोपात काही सवलती ब्रिटन जर्मनीला देईल.

परंतु इंग्लिशांशी समझौता करण्यासाठी हिटलर कुठे फारसा उत्सुक होता ? आता त्याला युरोपातील काही राष्ट्रांचा इतिहास प्रथम बदलायचा होता ! त्यासाठी इटलीला त्याने खिशात घातलेच. जिब्रॉल्टरवर जनरल फ्रँकोला सोडले होते. इंग्लंडला फ्रान्सपासून फोडून...फ्रान्सला जेर करून ठेवले होते.

लॉर्ड हॅलिफॅक्ससाहेबांना कल्पना तरी असेल का, की ते हिटलरला भेटण्यापूर्वी फक्त १४ दिवस आधी, म्हणजे ५ नोव्हेंबर १९३७ ला हिटलरने आपले परराष्ट्रमंत्री व सेनादल प्रमुख यांची गुप्त बैठक घेतली होती आणि या बैठकीत युरोपला धक्के देणारे निर्णय घेतले गेले होते !

## हिटलरचे मृत्युपत्र

या बैठकीला फील्ड मार्शल ब्लोमबर्ग, सेनाधिपती व युद्धमंत्री जनरल फ्रिट्च्, नौदलप्रमुख अॅड. रीडर, वायुदल प्रमुख हर्मन गोअरिंग व परराष्ट्रमंत्री न्यूराथ आदि वेचक मंडळी हजर होती. या सभेला हिटलरचा लष्करी संरक्षक हॉसबाच (Hossbach) हा हजर होता. याने ही बैठक आटोपताच पाच दिवसांनी, हिटलर जे जे बोलला ते आपल्या दैनंदिनीत लिहून काढले. ही दैनंदिनी न्यूरेंबर्ग खटल्यात पुढे आली म्हणूनच केवळ या गुप्त बैठकीचा वृत्तान्त आता उपलब्ध झाला आहे.

" सायंकाळी ४-१५ ला सुरू झालेली ही बैठक रात्री ८-३० ला

संपली. बहुतेक वेळ हिटलरच बोलत होता. हिटलरने सुरुवातीलाच सांगितले, की आता तो जे बोलणार आहे ते इतके महत्त्वाचे आहे, की जर त्याला मृत्यू आला तर तेच त्याचे मृत्युपत्र समजावे. यानंतर हिटलरने उद्‌गार काढले :

"The aim of German policy was to make, secure and preserve the racial community and to enlarge it. It was therefore a question of space. The Germans have the right to a greater living space than other peoples."

[ जर्मन धोरणाचा मुख्य रोख, आपल्या वंशाची जमात रक्षिली जावी व सुरक्षितता लाभून ती वाढावी हा आहे. म्हणूनच हा अधिक जागा मिळवण्याचा प्रश्न आहे ! जर्मनांना इतर जमातींपेक्षा अधिक भूमी व्यापण्याचा अधिकार आहे. ]

हिटलरने आपल्या धोरणाबाबत संदिग्धता कधीच पाळली नाही. शेजारच्या राष्ट्रांवर हल्ले करून अधिक मुलूख बळकावणे किंवा देशातील अल्पसंख्याकावर अत्याचार करून त्यांना देशाबाहेर पिटाळणे या दोन मार्गांनी सर्वच आक्रमक देश हा जागेचा प्रश्न सोडवण्याच्या उद्योगात असतात. ज्या ठिकाणी झाडे वाढतात वा वाढत नाहीत, ज्या ठिकाणी शेती शक्य आहे वा अशक्य आहे अशी सर्व भूमी आपल्या देशाकरता अधिकाधिक मिळवणे हे हिटलरचे ध्येय होते.

होसबॉच् याने पुढे लिहिले आहे—

"The Fuehrer did not believe that the British Empire was unshakable. In fact he saw many weaknesses in it, for example, the troubles with Ireland and India, the rivalry with Japan in Far East and with Italy in the Mediterranean. France's position was more favourable than that of Britain. But France was going to be confronted with internal political difficulties. None the less, Britain, France and Russia must be considered as power factors in our political calculations."

[ ब्रिटिश साम्राज्याला हादरा देता येणार नाही या गोष्टीवर फ्यूररचा विश्वास नव्हता. उलट या साम्राज्यात असंख्य धोकादायक गोष्टी दडलेल्या आहेत असे त्याचे मत होते. हा मुद्दा स्पष्ट करताना हिटलरने उदाहरणे दिली. आयर्लंड व भारत या देशामधील अस्वस्थता, अतिपूर्वेकडील जपानने व भूमध्यसमुद्रात इटालीने इंग्लंडला उत्पन्न केलेला धोका. या साऱ्या गोष्टी विचारात घ्या ! यापेक्षा फ्रान्सची स्थिती अधिक समाधानकारक आहे. परंतु अंतर्गत राजकारणातल्या बुजबुजाटाने फ्रान्स डोके वर काढू शकणार नाही. ते काहीही असले तरी ब्रिटन, फ्रान्स व रशिया या तीन विरोधी शक्ती गृहीत धरून आपण आपले राजकीय गणित बांधायला हवे. ]

हिटलरचे हे सर्व अंदाज तंतोतंत खरे ठरले हे पुढील इतिहासावरून लक्षात येईल. युद्धाची तयारी करताना आपण कुठे आहोत याच्याइतकाच आपल्या शत्रूची नेमकी अवस्था काय आहे, याचा विचारही महत्त्वाचा असतो. युद्धाची तयारी अशी सर्वांगीण लागते. शत्रू कोण व त्यांची शक्ती किती याचा संपूर्ण अंदाज हिटलरने व्यवस्थित केला होता.

आपल्या भाषणाच्या शेवटी, बैठकीच्या प्रमुख हेतूबद्दल हिटलर म्हणाला—

"Germany's problem could only be solved by means of force, and that is not possible without attendant risk. If one accepts this then the questions to be answered are 'when ?' and 'where ?'"

[ जर्मनीपुढील प्रश्न हे म्हणूनच फक्त बळाच्या जोरावरच सुटू शकतील. बळाचा वापर म्हटला की धोका आलाच. ही गोष्ट एकदा स्पष्ट झाली, की फक्त प्रश्न उरतो: बळ कधी व कुठे वापरावयाचे ? ]

यानंतर हिटलरने जर्मनीची संरक्षणफळी मजबूत करण्याच्या दृष्टीने, ऑस्ट्रिया व झेकोस्लोव्हाकिया या दोन देशांवर आक्रमण करणे कसे आवश्यक आहे हे विस्ताराने सांगितले. शेवटी त्याने हा हल्ला कसा असावा हे स्पष्ट केले—

"The descent upon the Czechs would have to be carried out with lightning speed."

[ झेकांवरचा हा हल्ला विजेच्या चमचमाटासारखा निमिषार्धांत उरकावा लागेल. ]

५ नोव्हेंबर १९३७ ला सायकाळ दाटत गेली व रात्र पडली. ८॥ वाजता ही बैठक आटोपली. त्याच क्षणी हिटलरने आपला फासा फेकला म्हणण्यास हरकत नाही. त्याने सेनाधिकाऱ्याना १९३८ पूर्वी ऑस्ट्रिया व झेकोस्लोव्हाकियाविरुद्ध कारवाई उरकावयाची आहे अशी सूचनाही दिली.

इतक्या लवकर जर्मनीला युद्धाच्या दारात ढकलण्याचा हिटलरचा निर्णय सर्व सेनाधिकाऱ्याना कितपत आवडला हे समजायला मार्ग नाही. परंतु ब्लोमबर्ग, फ्रिट्श् व न्यूराथ हे तिघे याबर एक अक्षरही बोलले नाहीत. अर्थात् हिटलरला त्याची जरुरीही नव्हतीच. त्याने जे ठरवले ते पार पाडण्याची हिंमत त्याच्याजवळ होती.

आणि या घटनेनंतर १४ दिवसानी लॉर्ड हॅलिफॅक्स हिटलरला भेटले ! जर्मनीहून परतल्यावर भेटीचा वृत्तान्त त्यानी चेंबरलेनसाहेबाना दिला. पतप्रधान चेंबरलेन यानी आपल्या दैनंदिनीत लिहिले—

"The German visit of Lord Halifax, was from my point of view a great success; because it achieved its object—that of creating an atmosphere in which it is possible to discuss with Germany—"

[ लॉर्ड हॅलिफॅक्स यांची जर्मनीची भेट माझ्या दृष्टीने फारच यशस्वी झाली. कारण ज्याकरता ही भेट होती ती गोष्ट साध्य झाली आहे. जर्मनीशी चर्चा करण्यापूर्वी जे सलोख्याचे वातावरण हवे होते ते या भेटीने निर्माण झाले आहे— ]

जर्मनीबरोबर भाई भाईंच्या सलोख्यासाठी इकडे पतप्रधान चेंबरलेनसाहेब झुरत असताना...प्रत्यक्षात हिटलर इंग्लड व फ्रान्सचा...राम बोलो...उरकण्याच्या उद्योगाला लागलेलाही होता. चेंबरलेनसाहेबाना याची कल्पना तरी असेल का ?

राजकारणाची ही वारांगना भल्याभल्यांना हे असेच अविस्मरणीय धडे देते...!!

## : २ :

ऑस्ट्रिया व झेकोस्लोव्हाकिया याचेविरुद्ध बलाचा वापर करण्याचा हिटलरचा निर्णय ऐकून जर्मन परराष्ट्रमंत्री न्यूराथ हा दचकलाच.

कारण या धाडसाचा परिणाम इंग्लंड व फ्रान्सबरोबर युद्ध भडकण्यात होईल अशी त्याची खात्री होती. म्हणूनच ५ नोव्हेंबरपासून आधीच हृदयविकाराने हतबल झालेल्या न्यूराथला नीटशी झोपही लागेना.

जर्मनीच्या पराभवानतर न्यूरेंबर्ग येथील खटल्यात न्यूराथने सागितले, हिटलरच्या निर्णयाने मी अस्वस्थ झालो. कारण आमच्या सर्व परराष्ट्र धोरणाचे बूडच हिटलरने उखडले होते. "

७ नोव्हेंबरला न्यूराथने जनरल फिट्श् (Fritsch) व चीफ ऑफ जनरल स्टाफ जनरल बेक याची भेट घेतली. तिघानी मसलत करून ठरवले, की शक्य तितक्या लवकर तिघानी हिटलरला ताळ्यावर आणण्याच्या दृष्टीने चालू असलेल्या धाडसी उद्योगाविरुद्ध आपले ठाम मत प्रदर्शित करावे. यापैकी न्यूराथ व फिट्श् याची अवस्था जरा कठीणच होती. परंतु जनरल बेक हा उच्चाधिकारावर असल्यामुळे त्याने लगोलग हिटलरच्या धोरणावर आत्मघातकीपणाचा आरोप करणारा गुप्त मसुदा तयार केला. हा मसुदा त्याने कुणालाच दाखवला नाही. अखेरच्या क्षणी हिटलरला अधिकारावरून दूर सारण्याच्या प्रयत्नात कामास आलेल्या या जनरलची, हिटलरशी फाटायला या मसुद्यापासूनच सुरुवात झाली.

९ नोव्हेंबरला जनरल फिट्श् याने फ्यूररची भेट घेतली. फ्यूररने त्याचे म्हणणे ऐकून घेतले व त्याला रजा दिली. याच भेटीत फिट्श्ने न्यूराथ हा देखील आपल्याच मताचा आहे असे सागितले असावे. कारण न्यूराथला हिटलरने भेटच दिली नाही व तो बर्चेसगार्डनला विश्रातीसाठी निघून गेला. डिसेंबर महिना हिटलर विश्रांती घेत होता. न्यूराथला हिटलरची गाठ घेता आली ती जानेवारी १९३८ ला. पधरा जानेवारीच्या सुमारास ही भेट त्याला मिळू शकली.

सहकारी आपल्या धाडसावर रुष्ट झाले तर काय करतील याचा हिटलरला अदाज होता. राजीनामा ! लोकशाहीतील एकमेव, आणि नाझी हुकुमशाहीतीलही एकमेव निषेधाचा मार्ग ! नेत्याला सहकाऱ्याच्या कुवतीचा आणि प्रसगी विरोध करण्याच्या शक्तीचा योग्य अंदाज असावा लागतो. यामुळे न्यूराथच चाट झाला ! न्यूराथने हिटलरला काय सागितले,

"I tried to show him that his policy will lead to a world war, and that I would have no part in it when despite all may arguments he still held to his opinions, I told him that he would have to find another Foreign Minister."

[ मी त्याला हे दाखवून दिले, की त्याचे धोरण जगात युद्ध पेटवील आणि म्हणून मला या धोरणात सहभागी व्हावयाचे नाही. इतके सर्व सागूनही जेव्हा तो आपले मत बदलण्यास तयार होईना तेव्हा मी सागितले, की मग आता दुसरा परराष्ट्रमंत्री शोध. ]

हिटलर मनात म्हणाला, मी तेच करायला सांगणार होतो. कारण ५ नोव्हेंबरला हिटलर आपले धोरण गुप्त बैठकीपुढे विशद करीत असताना न्यूराथ, फिट्श् व ब्लोमबर्ग आदी मंडळी घुम्यासारखी बसून राहिली हे हिटलरच्या लक्षात आले होते. अशाची असून अडचण आणि नसूनही खोळंबा नाही ! तेव्हा या मंडळीना नारळ देण्याचा निर्णय त्याने मनाशी घेतला होता. जनरल फिट्श् जेव्हा त्याला भेटला तेव्हा आपला निर्णय त्याने मनात पुरता पक्का केला होता.

## हिटलरची कामराज-योजना

ब्लोमबर्ग, न्यूराथ, फिट्श् ही माणसे काही नाझी तत्त्वज्ञानाने भरलेली नव्हती. हिटलरच्या कर्तृत्वाने आकर्षित होऊन त्यानी हिटलरच्या हाती सर्वाधिकार सोपवले व सर्व प्रकारची मदत केली इतकेच. यांना दूर सारण्याचा निर्णय हिटलरने लगेच घेतला होता. यामुळे न्यूराथची अवस्था नवऱ्यावर रुसलेल्या परंतु माहेर नसलेल्या बायकोसारखी झाली.

या तिघाचौघाना दूर करण्यापूर्वी डॉ. शाक्त यालाही हिटलरने जबाबदारीतून मुक्त केले. चार वर्षांची आर्थिक योजना गोअरिंगने तयार केली होती व त्याची जबाबदारी गोअरिंगवरच टाकण्यात आल्यामुळे, डॉ. शाक्त व गोअरिंग याच्यात मतभेद होऊ लागले, अखेर डॉ. शाक्त याना अर्थखात्यावरून उठावे लागले. डॉ. शाक्त यानी कुणाच्या तरी एकाच्या तंत्राने अर्थकारण चालावे असा आग्रह धरल्यामुळे हिटलरने सप्टेंबर १९३७ मध्येच डॉ. शाक्त यांना बिनखात्याचे मंत्री ( Minister without portfolio) करून योजनेचा अर्थव्यवहार सर्वस्वी हर्मन गोअरिंग याचेकडे सोपवला. मात्र राईश बँकेचे अध्यक्षपद डॉ. शाक्तकडेच हिटलरने ठेवले. याचे कारण अर्थात् उघड होते. एकतर डॉ. शाक्तचा पाठिंबा आपल्याला यापुढे नाही ही गोष्ट जनतेला कळवणे त्याला अवघड वाटत होते. आणि दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे राईशबँकेने युद्धप्रयत्नासाठी कसा पैसा उभा केला याचा सर्व व्यवहार डॉ. शाक्तलाच माहीत होता.

अशा रीतीने अर्थखाते व परराष्ट्र खाते आता संपूर्णपणे हिटलरच्या पजाखाली आले.

संरक्षणमंत्री जनरल ब्लोमबर्ग यांची शोकातिका आणि नुकतीच ब्रिटनमध्ये माजलेली प्रोफ्युमोची भानगड यात साम्य आहे. दोन्ही मंत्री देशाच्या संरक्षणाशीच बांधलेले होते व दोघाच्या आयुष्यात एका सामान्य वेश्येने ' रण ' माजवले.

## ब्लोमबर्गचा प्रोफ्युमो झाला

फराउलिन ग्रून ( Fraulin Gruhn ) ही जनरल ब्लोमबर्गची खासगी चिटणीस होती. सर्व खासगी चिटणीस जशा असाव्या लागतात त्याप्रमाणे ही मुलगी तरुण व दिसायला आकर्षक होती. ' मदननेत्रात, कामक्षेत्रात, निपुण ती फार ' असे ख्रिस्तिन किलरचे वर्णन हिला कितपत लागू पडत असेल कुणास ठाऊक; पण जनरल ब्लोमबर्गला तिने घायाळ केले ही गोष्ट खरी. ब्लोमबर्गची प्रथम पत्नी ही एका लष्करी अधिकाऱ्याची मुलगी होती. १९०४ पासून २८ वर्षे ससार करून ती निधन पावली होती. १९३२ साली विधुर झालेल्या जनरलसाहेबाना पाच मुले होती. यातील सर्वांत धाकट्या मुलीने जनरल कायटलच्या थोरल्या मुलाशी लग्न केले होते. १९३७ साली ही मुलगी घरातून गेल्यानंतर ब्लोमबर्गना विधुरावस्थेचा कंटाळा येऊ लागला. त्याने फ्राउलिन ग्रूनला लग्नासंबंधी विचारले. ग्रून लग्नाला तयार झाली खरी; परंतु येवढ्या मोठ्या अधिकारावरील मंत्र्याने एकाद्या सामान्य जातकुळीच्या मुलीशी केलेला विवाह, सेनादलाला कितपत रुचेल, अशी रास्त शंका जनरल ब्लोमबर्ग याना आली. त्याने गोअरिंगला विश्वासात घेऊन त्याला सल्ला विचारला. गोअरिंगने सागितले की, ' मी नाही का पहिल्या बायकोशी घटस्फोट घेऊन एका नटीशी लग्न केले ? ( Go ahead ) काही काळजी करू नको.

फ्यूररच्या कानावर मी ही गोष्ट घालून त्याची संमती मिळवतो.' गोअरिंग एवढेच करून थावला नाही तर ब्लोमबर्गच्या प्रेमात जो आणखी एक प्रतिस्पर्धी अधिकारी होता त्याची बदली करून गोअरिंगने ब्लोमबर्गला आशीर्वादच दिला.

२२ डिसेंबरला जनरल लुडेन्डॉर्फ मृत्यू पावला. म्युनिक येथे दफनभूमीवर ब्लोमबर्ग याने लुडेन्डॉर्फचा गौरव करणारे भाषण दिले. या प्रसंगी हिटलर हजर होता. परंतु भाषण करण्याचे त्याने नाकारले. बिअर हॉल उठावणीनंतर लुडेन्डॉर्फचा आपल्याला पाठिंबा नसताना, *उगाच मानभावीपणे भाषण करणे हिटलरला प्रशस्त वाटले नाही.* दफनभूमीवरून परतताना ब्लोमबर्गने हिटलरला आपल्या विवाहाची वार्ता सांगितली. फ्यूररने विवाहाला संमती दिली.

१२ जानेवारी १९३८ ला ब्लोमबर्ग पुन: चतुर्भुज झाला. हिटलर व गोअरिंग दोघेही विवाहाला हजर होते. विवाहसमारंभ संपताच जनरल ब्लोमबर्ग व फ्राउ ब्लोमबर्ग ही मधुचंद्रासाठी इटालीला गेली.

तिकडे इटालीत ब्लोमबर्ग मधुचंद्रात गर्क असताना इकडे निराळाच गोंधळ उडाला. सेनाधिकाऱ्यांना निनावी युवतीचे फोन येऊ लागले. एकाद्या नाईट क्लबातून किंवा हॉटेलातून आपण बोलत आहोत असे सांगितले जाई व सेनाधिकाऱ्यांचे अभिनंदन ती युवती करी ! कशाबद्दल अभिनंदन ? तर जनरल ब्लोमबर्ग यांनी एका वेश्येशी लग्न करून अशा प्रकारच्या स्त्रीशी लग्न करण्याचे धाडस दाखवल्याबद्दल !!

या दूरध्वनीची बातमी पोलिसांकडे देण्यात आली व पोलिसांनी फ्राउलिन ग्रून हिच्याविषयी तलास सुरू केला. तिची हकीकत असलेली एक खास फाईलच पोलिसांना खात्यांतच उपलब्ध झाली. या फाइलीत, फ्राउलिन ग्रून ही वेश्याव्यवसाय करण्याच्या कायद्याचा वारंवार भंग करणारी स्त्री म्हणून तिची संपूर्ण माहिती दिलेली होती. याशिवाय मासिकांना नग्न व अश्लील छायाचित्रे काढून देण्याचा तिचा जोडधंदा होता असेही नमूद केलेले होते. म्हणजे संरक्षणमंत्र्याला घायाळ करणारी ख्रिस्तीन किलर ही काही पहिली 'किलर' नव्हे ! या ग्रूनची आई 'मसाज' या राजरोस पाटीनिशी वेश्याव्यवसाय भर वस्तीत करीत असे व ग्रून तिच्याजवळ वाढली होती.

पोलिसांना ही सर्व माहिती मिळताच त्यांना सौ. ब्लोमबर्ग याचेबद्दलची सर्व कागदपत्रे पोलिसदलप्रमुख हेनरिच हिमलर याचेकडे धाडावयास हवी होती. परतु हिमलरचा धसका सर्वांनीच घेतला होता. व न जाणो, हिमलर या कागदपत्रांचा उपयोग ब्लोमबर्गला खड्डयात लोटण्यासाठी करील या भीतीने दुय्यम पोलिस अधिकाऱ्याने हे सर्व कागद, 'हा सैन्याच्या अखत्यारातील प्रश्न आहे' असा शेरा मारून जनरल कायटेलकडे दिले. कायटेलच्या मुलाचीच ही ग्रून सावत्रसासू होती. त्यामुळे कायटेल हा प्रश्न हाताळताना थोडीशी माणुसकी ठेवील असा पोलिस अधिकाऱ्याचा अंदाज होता. परंतु कायटेलने या मानगडीत न पडण्याचे ठरवून सर्व कागद हर्मन गोअरिंगकडे धाडा अशी आज्ञा दिली.

गोअरिंगच्या हातात अशा रीतीने हा 'बॉम्ब' अचानक आला. ब्लोमबर्गचा वरचष्मा गोअरिंगला नाहीसा करावयाचाच होता व त्यासाठी अनायासे सुसंधी त्याला या मानगडीमुळे मिळाली.

२० जानेवारीला ब्लोमबर्गची आई वारल्यामुळे मधुचंद्र अर्धवट सोडून जनरल ब्लोमबर्ग सपत्नीक बर्लिनला परतला. २४ जानेवारीला तो कामावर हजर होण्यासाठी युद्धकचेरीत आला.

२५ जानेवारीला हर्मन गोअरिंगने हिटलरच्या कानावर सौ. ब्लोमबर्गचा पूर्वेतिहास घातला. हिटलर खवळला. एका वेश्येच्या लग्नाला आपल्याला हजर राहावयास लागून आपले हसे झाले ही गोष्ट त्याला बोचली. त्याने ब्लोमबर्गला हाकलण्याचे ठरवले.

दुपारी गोअरिंगने ब्लोमबर्गच्या कानावर ही हकीकत सविस्तरपणे घातली. यापूर्वी चीफ ऑफ जनरल स्टाफ जनरल बेक याने कायटेलला *यासंबंधी कळवले होते,*

"One cannot tolerate the highest ranking soldier marrying a whore."

[उच्चाधिकारावरील सैनिकाने एका वेश्येशी लग्न करावे ही गोष्ट कुणालाही सहन होणार नाही.]

दोन दिवसांनी या साठ वर्षे वयाच्या वृद्ध जनरलला हिटलरने सैन्यातून कमी केले, व ब्लोमबर्ग आपल्या नवपरिणीत वधूसह पुन: इटालीला निघून गेला.

अॅडमिरल रीडर याने आपला एक विश्वासू सहकारी इटालीला पाठवून ब्लोमबर्गपुढे रिव्हॉल्व्हर ठेवले. त्याने आत्मघात करण्यात जर्मनीचे हित आहे असा हा निरोप होता. परंतु हा वृद्ध सेनानी यमपाशापेक्षा नववधूच्या करपाशात राहाण्यास आतुर होता. ब्लोमबर्गने रोमच्या मार्गाने जाण्याचे नाकारले.

दैनंदिनीप्रमाणे हिटलरने ब्लोमबर्गला जी अखेरची भेट दिली त्या वेळी आश्वासन दिले की,

"As soon as Germany's hour comes you will be again by my side."

[जेव्हा जर्मनीला गरज लागेल तेव्हा तुला बोलावून घेईन.]

पुढे महायुद्ध भडकले. परंतु ब्लोमबर्गला सेनाधिकाऱ्यांनी पुन: बोलावले नाही. लढाई चालू असतानाच ब्लोमबर्ग आपल्या पत्नीसह बव्हेरियात वायझी या गावी सुखाने कालक्रमण करीत राहिला. आयुष्याच्या अखेरपर्यंत तो आपल्या विवाहित पत्नीशी एकनिष्ठ राहिला. १३ मार्च १९४६ ला न्यूरेंबर्ग तुरुगात तो साक्ष द्यावयास आला व कोर्टाच्या कोठडीत उभे राहण्याची वाट पहात असतानाच मृत्यूने त्याला गाठले. न्यूरेंबर्ग तुरुगातच तो कोसळला व हृदयक्रिया बंद पडून मरण पावला.

### जनरल फ्रिट्शवरील किटाळ

ब्लोमबर्गची हकालपट्टी झाली. परंतु जाताजाता आपल्या जागी हर्मन गोअरिंगला नेमावे अशी सूचना त्याने हिटलरला केली. या जागी हर्मन गोअरिंगला नेमण्यास हिटलरला राजी नव्हता. युद्धमंत्र्याच्या जागी येण्यासाठी दुसरे नाव सर्वांच्या डोळ्यांसमोर होते ते जनरल फ्रिट्श् याचे. परतु फ्रिट्श् हा जुन्यापैकी जनरल होता व हिमलरच्या S. S. संघटनेप्रमाणेच नाझी संघटनेचीही तो टिंगल करीत असे. १ मार्च १९३५ ला स्वत: शिरर त्याच्याजवळ उभा राहून ऱ्हाईनलॅंड प्रांतात निघालेल्या जर्मन फौजा पहात होता. त्या वेळी त्याने S. S. संघटना व नाझी पक्षसदस्य याच्याबद्दल बोलताना आपले मन उघडे केले असे शिररने नमूद केले आहे.

याच सुमारास जनरल फ्रिट्श् हा समलिंगीसंभोग करणारा आहे असा पुरावा हिमलरने फ्यूररपुढे आणला. जनरल फ्रिट्श्ने हा आरोप

साफ अमान्य केला व आपली लष्करी न्यायालयासमोर चौकशी करा अशी मागणी केली. निदान फ्यूररने आपली प्रत्यक्ष गाठ घेऊन खुलासा ऐकावा अशी इच्छा त्याने व्यक्त केली.

जनरल फ्रिट्श्ला हिटलरपुढे नेण्यात आले. या वेळी गोअरिंग व व हिमलर हजर होते. जनरल फ्रिट्श्ने आरोप अमान्य करताच हिमलरने शेजारच्या खोलीतून हॅन्स श्मिद् (Hans Schmidt) नावाच्या एका गुन्हेगार माणसाला पुढे आणले. त्याने जनरल फ्रिट्श् याना आरोप केला गेलेला गुन्हा करताना, पोस्टडॅम रेल्वे स्टेशनवर पाहिल्याचे सांगितले. ही गोष्ट आपण कुणाला सांगू नये म्हणून जनरल फ्रिट्श् आपल्याला पैसे देत असे, असे त्याने पुढे सांगितले.

हा सगळा बनाव पाहून जनरल फ्रिट्श्ची तर वाचाच बसली. तोंडातून एक अक्षर बाहेर येईना. वस्तुतः हिमलरच्या कारस्थानाने तो सर्द झाला होता. हिटलरने हीच गुन्ह्याची कबुली समजून हा फार्स संपवला.

परंतु चीफ ऑफ जनरल स्टाफ जनरल बेक यांनी खात्यामार्फत चौकशी केली व हॅन्स श्मिदने पाहिलेला माणूस हा फ्रिट्श् (Fritsch) नसून फ्रिश्क (Frisch) होता ही गोष्ट स्पष्ट केली. नामसादृश्यामुळे पोलिसांनी हा आरोप जनरलवर केला हे त्याने सिद्ध केले. जनरल बेक व जनरल फ्रिट्श् याचे पारडे पुन्हा जड झाले.

या वेळी या दोघानी नेट धरून सैन्याच्या मदतीने उठाव केला असता तर तिसऱ्या राईशला उडवण्यास दोघाना वेळ लागला नसता. सैन्यात वरील चौकशीने मोठेच समाधान पसरले होते. उलट हिमलर व गोअरिंग यांच्याविरुद्ध वातावरण तापलेले होते.

हिटलरच्या सर्व चरित्रात ही गोष्ट ध्यानात येते की ज्या वेळी त्याची सर्व बाजूनी कोंडी होण्याचा प्रसंग आला त्या प्रत्येक वेळी त्याने धाडसी निर्णय घेऊन स्वतःची बाजू निर्वेध करून घेतली. जानेवारी १९३८ या सबंध महिनाभर विलक्षण वावड्या उडत होत्या. कुणी म्हणत, दोन्ही जनरल्सना हिटलरने कैदेत टाकले आहे तर कुणी सांगत सैन्याच्या असंतोषावर केव्हा ठिणगी पडेल याचा नेम नाही.

## हिटलर सुप्रीम कमांडर

३० जानेवारी १९३८ला नेहमीप्रमाणे हिटलर राज्यावर आल्याचा वाढदिवस आला व गेला. फ्यूररने भाषण दिले नाही. काहीतरी मोठ्या प्रमाणावर गोष्टी घडणार आहेत याचा अंदाज सर्वांना आला.

४ फेब्रु. १९३८ ला हिटलरने मंत्रिमंडळाच्या बैठकीत व नंतर रेडिओवर घोषणा केली,

" From now on, I take over the command of the whole armed forces. "

[यापुढे मी स्वतः सर्व सैन्यदलाचे आधिपत्य सर्वस्वी माझ्याकडे घेत आहे.]

युद्धमंत्री हे पद त्याने रद्द केले. "हाय कमांड ऑफ दि आर्म्ड् फोर्सेस" (O. K. W.) ही यंत्रणा आता त्याने उभी केली. हिटलर स्वतः सुप्रीम कमांडर व त्याच्या हाताखाली चीफ हायकमांड या नव्या नावाने अधिकारी ठरवण्यात आला. चीफ ऑफ स्टाफऐवजी या पदालाच त्याने चीफ ऑफ दि हाय कमांड ऑफ दि आर्म्ड् फोर्सेस" अशी संज्ञा दिली. या जागेवर हिटलरने आपला विश्वासू जनरल जो, जनरल कायटेल त्याची नेमणूक केली.

चीफ ऑफ जनरल स्टाफ बेक, व जनरल फ्रिट्श् यांना निवृत्त करण्यात आले व शिवाय जुन्या १५ अधिकाऱ्याना पेन्शनीत ढकलण्यात आले.

न्यूराथच्या जागी रिबेन्ट्रॉप आला ! आघात फक्त सेनाधिकाऱ्यांवर झाला असे वाटू नये म्हणून शाक्तच्या रिकाम्या जागी फंक (Funk) याची नेमणूक जाहीर झाली.

४ फेब्रु. १९३८ ला अशा रीतीने जर्मनीचे पूर्णतया नाझीकरण सिद्ध झाले. ब्लोमबर्ग, फ्रिट्श् व न्यूराथ ही माणसे हिंडेनबुर्गने नेमलेली होती. ही माणसे दूर होताच हिटलरला दूर करण्याची अखेरची शक्ती हतबल झाली. निष्प्रभ झाली. ३० जाने. १९३४ ते ४ फेब्रु. १९३८ या काळात सैन्याने मनात आणले असते तर हिटलर अधिकारावरून ओढला जाऊ शकला असता. परंतु ५ फेब्रु. १९३८ ला या तिघाची उचलबांगडी होताच हिटलरला सैन्याची भीती उरली नाही. शिरर सांगतो,

" Feb. 4, 1938 is a major turning point in the history of the third Reich, a milestone on its road to war; on that day the Nazi revolution was completed. Blomberg, Fritsch and Nurath had been put into office by Hindenburg to act as brake upon Nazi excesses. But in the struggle for control over foreign and economic policies and the military power they proved to be no match for Hitler. They had neither the moral strength nor the political shrewdness to stand up to him, let alone to triumph over him. "

[चार फेब्रु. १९३८ हा दिवस तिसऱ्या राइशच्या इतिहासाला महत्त्वाचे वळण देणारा दिवस समजला पाहिजे. युद्धाच्या मार्गावरील तो एक मैलाचा दगड मानण्यास हरकत नाही. या दिवशी नाझी क्रांती पूर्ण झाली. ब्लोमबर्ग, फ्रिट्श् व न्यूराथ ही माणसे हिंडेनबुर्गने नेमलेली होती. नाझीच्या आततायीपणाला अडसर म्हणून त्याची योजना केली होती. परंतु परराष्ट्रीय व आर्थिक धोरणावर कबजा करण्याच्या स्पर्धेत, तसेच सैनिकी सत्तेच्या अधिकाराच्या स्पर्धेत हिटलरपुढे या तिघांची डाळ शिजली नाही. त्यांच्याजवळ त्यासाठी लागणारे नीतिधैर्य किंवा राजकीय डावपेच खेळण्याची शक्ती नव्हती. यामुळे ते हिटलरपुढे उभेही राहू शकले नाहीत. मग त्याच्यावर प्रभाव पाडण्याची गोष्टच कशाला ? ]

फ्रिट्श् याने १८ डिसेंबर १९३८ ला हॅसेल (Hassell) या रोममधील पदच्युत परराष्ट्र वकिलाजवळ जे उद्गार काढले ते त्याने आपल्या दैनंदिनीत नमूद केले आहेत. फ्रिट्श् म्हणाला.

" This man, Hitler, is Germany's destiny for good and for evil. If he now goes over the abyss, which he will, he will drag us all down with him. There is nothing we can do. "

[हा माणूस, हिटलर, हाच आता जर्मनीचे भाग्य अभाग्य ठरवणार आहे. जर आता त्याने गर्तेत उडी ठोकलीच, आणि ती ठोकल्याशिवाय तो राहणार नाही, तर तो आपल्याबरोबर आपणा सर्वांना ओढल्याशिवाय रहात नाही. आपण या बाबतीत काहीही करू शकणार नाही.] [अपूर्ण]

: १ :

## पिचवरील पाऊस

नुकत्याच संपलेल्या इंग्लंड-ऑस्ट्रेलिया कसोटी मालिकेने, क्रिकेट-शौकिनांची बरीच निराशा केली. इंग्लंडच्या संघात डेक्स्टर-काऊड्री– बॅरिंग्टन–शार्प– ट्रुमन– पार्कस्– टिटमस– फ्लॅचेल आदि अनुभवी कसोटी खेळाडू असूनही, ऑस्ट्रेलियाच्या व्हीवर्स– हॉक– कोलिंग आदि नव्यानच कसोटी सामन्यात प्रवेश करणाऱ्या गोलंदाजांनी इंग्लंडवर नुसता कबजा केला नाही तर जो एकच सामना निर्णायक झाला तो जिंकून रबरही आपल्याकडे कायम राखले. या कसोटी सामन्यांतील चार सामने अनिर्णीत राहिले व यांतील तीन सामने केवळ पावसामुळे निर्णायक होऊ शकले नाहीत.

इंग्लंडमध्ये पावसाचा संभव सतत राहत असल्यामुळे, क्रिकेटचे पिच् पावसापाण्यात भिजू द्यावे की झाकावे हा प्रश्न प्रत्येक कसोटी मालिकेच्या सुरुवातीला चर्चिला जातो. पिच्वर आच्छादन टाकण्यावावत तीन पर्याय संभवतात.

(१) जेव्हा खेळ चालू नसेल तो सर्व वेळ, पिच्वर आच्छादनाची सोय करून ऊन-पावसातून त्याचा बचाव करणे. ऑस्ट्रेलियात ही पद्धत स्वीकारण्यात आली आहे.

(२) पिचवर कोणत्याही वेळी आच्छादन न टाकता ती उघडीच ठेवणे.

(३) या दोन टोकांच्या मध्ये एक मत असे आहे की पिच् हे सायंकाळी खेळ संपताक्षणीच झाकण्यात यावे व सकाळी आच्छादन काढण्यात यावे. परंतु मधल्या काळात म्हणजे खेळ सुरू झाल्यानंतर पाऊस पडो वा न पडो, पिच्वर आच्छादन टाकावयाचे नाही. जर दिवसाचा खेळ सोडून द्यायचे ठरले तर मात्र पिच्वर आच्छादन टाकावयाचे.

हा तिसरा पर्याय अनेकांना स्वागतार्ह वाटतो. कारण खेळ सुरू झाल्यावर पाऊस सुरू झाला व त्या दिवसाचा खेळ सोडून देण्याचा निर्णय लगेच घेतला की पिच् झाकून ठेवता येते.

नॉटिंगहॅमशायरमधील 'ट्रेंट ब्रिज' मैदानावर जो पहिला कसोटी सामना झाला त्या सामन्याचे वेळी या तिसऱ्या मतातील तथ्य ध्यानात आले. गुरुवारी सायंकाळी जी मुसळधार सुरू झाली, ती जर पिच्वर पडू दिली असती,तर शुक्रवारीही खेळाचा विचका उडाला असता. परंतु गुरुवारी खेळ सोडून देताच पिच् झाकण्यात आले. शुक्रवारी चेंडू वळणे घेऊ लागल्यामुळे खेळात अधिकच रंग भरला. रविवारी सुटी असल्यामुळे खेळ झाला नाही व पिच् वाळले.

समजा, खेळ चालू नसेल त्या प्रत्येक वेळी पिच् झाकण्याचे ठरवले असते, म्हणजे पहिला पर्याय स्वीकारला असता तरी झाला एवढाच खेळ होऊ शकला असता. कारण पाणी केवळ पिचवर पडले नाही म्हणून काही खेळ सुरू करता येत नाही. गोलंदाजाची धावण्याची पट्टी पाण्याने भरलेली असेल तर खेळ सुरु कसा करणार ?

तेव्हा या तिन्ही पर्यायांत तिसरा पर्याय हा अधिक सोयीस्कर आहे. यामुळे क्रिकेटच्या खेळातील अनिश्चितता किंचित वाढते ही गोष्ट खरी. कारण मामुली शिंतोडे वा पाऊस पडला व खेळ पुन: सुरू केला, तर या वेळात आच्छादन घालावयाचे नसल्यामुळे, खेळात अचानक रंगच भरतो. जर पाऊस फारच पडला तर खेळ सोडून देऊन तावडतोब आच्छादन टाकता येते.

इंग्लंडमधील क्रिकेट-टीकाकारांनी तूर्त तरी हा तिसराच पर्याय स्वागतार्ह ठरवला आहे.

: २ :

## याला निवडू नका !

आर्. हॉब्स (Hobbs) हा एसेक्स संघाचा गोलंदाज यंदा कसोटी सामन्यात शिरकाव करणार असा सर्वांचा कयास होता. डेक्स्टरच्या या गोलंदाजावद्दल मोठ्या अपेक्षा होत्या. त्याला कसोटी-संघात स्थान मिळाले, तर ऑस्ट्रेलियाचे फलंदाज आटोक्यात ठेवण्यास मदत होईल असे मत त्याने व्यक्त केले होते.


परंतु इतक्यात 'एसेक्स' परगण्याच्या क्रिकेट समितीने हॉब्सला यंदा निवडू नका, असे पत्र एम्. सी. सी. च्या निवडसमितीला धाडले. आता याला जे कारण होते ते हॉब्सच्या हिताचेच दाखवण्यात आले होते. अजून पुरेसा



हॉब्स्

अनुभव नसताना या बावीस वर्षांच्या गोलंदाजाला, निवड करून, फुकट घालवू नका, असा सल्ला एसेक्स समितीने दिला होता. हॉब्सच्या कुवतीची संपूर्ण माहिती असलेली समिती जर असे मत देते, तर धोका पत्करून त्याला निवड-समितीने निवडले नाही हे योग्यच झाले; परंतु चूक झाली ती हॉब्सविषयी आपण काय कळवले आहे, याचा वृत्तांत निवड समितीला कळण्यापूर्वीच वृत्तपत्रांत आला या गोष्टीत !

दुसरा प्रश्न असा पुढे आला की २२ वर्षे हे वय एसेक्स समितीला वाटते एवढे कोवळे आहे का? एसेक्स समितीचा प्रमुख सभासद हा इंग्लंडचा पूर्वीचा क्रिकेट फलंदाज ट्रॅव्हॉर बेली हा आहे. त्याला टेस्ट सामन्यांचा अनुभव आहे. डग्लस राईट हा खेळाडू २३ व्या वर्षी व फरेडी ब्राऊन हा २० व्या वर्षी स्पिनर म्हणून कसोटी सामन्यांत खेळले नाहीत काय ? असे असताना हॉब्स हा केवळ २२ वर्षांचा आहे, म्हणून त्याला कसोटी सामन्यांसाठी विचारात घेऊ नका, असे कळवून ट्रॅव्हॉर बेलीने जे साधले तेच त्याला कमीत कमी गोलंदाजी देऊन सामन्यात खेळवून करता आले असते. फक्त डेक्स्टरला तशा सूचना दिल्या की झाले. परंतु सूचना तरी कशाला ? सर्वसाधारणपणे नव्या फिरकी



टिटमस्-हॉक यांची टक्कर

गोलंदाजाला संभाळून घ्यावे लागते ही गोष्ट प्रत्येक कप्तान करीतच असतो.

: ३ :

## नियमांपेक्षा तारतम्य महत्त्वाचे

या पहिल्या कसोटी सामन्यात आणखी एक महत्त्वाचा प्रसंग घडला. टिटमस्–बॉयकॉट या जोडीने पहिल्या दिवशी ११.५५ मिनिटांनी इंग्लंडच्या डावाला सुरुवात केली. टिटमसला एड्रिच आजारी पडल्यामुळे आघाडी उघडावी लागली. अर्थात नेहमीचा सराव नसल्यामुळे टिटमस हा काहीसा अस्थिर मनाने खेळत होता.

हॉकने चेंडू टाकला व बॉयकॉटने तो फटकारला व एक धाव घेण्यासाठी टिटमस धावू लागला. धावताना चेंडू टाकून परतणाऱ्या हॉकशी त्याची टक्कर झाली. हॉक हा चांगला दणकट गडी असल्यामुळे टिटमसने जमिनीवर लोटांगणच घेतले ! बॉयकॉट गोलंदाजाचे बाजूस क्रिज्‌मध्ये शिरला, तरी टिटमस उठलेला नव्हता. अर्थातच क्षेत्ररक्षकाने चेंडू विकेटकीपर ग्राउटचे हाती फेकला.

नियमाप्रमाणे ग्राउटने विटा उडवल्या असत्या तर टिटमसला धावचीत व्हावे लागले असते. परंतु ग्राउटने चेंडू हातात असूनही टिटमसला बाद करण्याचे नाकारले.

टिटमस उठला व आश्चर्याने सावकाश क्रिज्‌कडे आला. ग्राउटने जे केले ते योग्यच केले. कारण फलंदाज टक्कर होऊन पडल्यानंतर, त्याला बाद करणे योग्य नव्हते. आश्चर्य वाटते ते याचे की येवढा विचार करायला ग्राउटला या खेळाच्या गडबडीत कसे सुचले ? इंग्लंडची पहिली विकेट पडण्याच्या क्षणी अन्य कुणी यष्टिरक्षकाने उत्साहाच्या भरात विटा उडवल्या असत्या व नंतर कदाचित् त्याला आपण केले ते चुकले असे वाटले असते. ग्राउटला हे तत्क्षणी सुचावे ही गोष्ट अत्यंत कौतुकास्पद आहे.

आता कुणी म्हणेल की हा नियमच चूक आहे. परंतु तसे नाही. एखादा क्षेत्ररक्षक मुद्दाम धाव घेणाऱ्या फलंदाजाच्या मार्गात उभा राहील, ही शक्यता आहे. परंतु सामान्यतः असे कुणी करणार नाही हे गृहीत धरून याबाबत नियम केलेला नाही. चार वर्षांपूर्वी इंग्लंड व साउथ आफ्रिका यांचेतील कसोटी सामन्यात याच ट्रेंट ब्रिज मैदानावर मॅग्ल्यू या साउथ आफ्रिकन खेळाडूची धाव घेताना क्षेत्ररक्षकाशी टक्कर झाली. त्याला धावचीत करून पंचांकडे निर्णय मागण्यात आला. पंचाने मॅग्ल्यूला बाद ठरवले. असे असूनही इंग्लिश संघाचा नेता कोलीन् काउड्रे याने पंचांकडे चुकीने केलेले अपील मागे घेण्याची परवानगी मागितली. पंचांनी ती दिली. अर्थात् पंचांनी ती नाकारलीही असती, व मॅग्ल्यूला बाद व्हावे लागले असते, असा प्रसंगच मुळी ग्राउटने येऊ दिला नाही. कारण यावेळी टक्कर झालेला खेळाडू इंग्लिश होता. पंच इंग्लिश होता व बहुधा स्टंपवरील विटा उडविल्यावर पंचाने टिटमसला खेळू दिले नसते. ● ● ●

रंगभूमी

### श्री. रत्नाकर मतकरीनिर्मित

# अस्ताई

### प्रेक्षकांना का अंतरली !

काहीतरी नवे करावे या विचाराने झपाटलेल्या नाटककारांत श्री. रत्नाकर मतकरी यांचेही नाव प्रामुख्याने घेतले जाते. या नव्याच्या हव्यासातूनच ' अस्ताई ' या कलाकृतीचा जन्म झाला आहे. वास्तविक 'अस्ताई' हे नाटक नाही, नाटिका नाही, आणि एकांकिकाही नाही. म्हणून नाट्याच्या कोणत्या रकान्यात ती जमा वा खर्ची टाकावी हा प्रश्न मनापुढे उभा राहतो. आणि इथेच प्रथम हे काही तरी नवीन आहे याची जाणीव होते. प्रयोगाच्या वेळी हे एक स्वप्ननाट्य आहे अशी त्याची प्रथमच ओळख करून दिली जाते.

सुमारे एक तासाच्या आसपास चालणाऱ्या या प्रयोगात एका मध्यमवर्गीय स्त्रीचे दुःख मांडण्याचा मतकरी यांनी प्रयत्न केला आहे. मुक्ता वर्तक या नावाची एक सर्वसामान्य स्त्री मृत्युशय्येवर पडली आहे. गरीब कुटुंबात जन्मलेल्या या स्त्रीला संपूर्ण आयुष्यभर आपल्या साऱ्या इच्छा, आकांक्षा, भावना, विकार यांचा बळी द्यावा लागलेला आहे. आपली सारी सुखस्वप्ने चुरगाळून कुटुंबाचे पालनपोषण करावे लागले आहे. बालपणी प्रतिकूल परिस्थितीमुळे उपेक्षा नशिबी आली तर तरुणपणी कुटुंबीयांच्या हितासाठी कर्तव्याच्या काळजीने सारे नवनवोन्मेश कोळपावे लागले आहेत. शिक्षण सोडून नोकरी करावी लागली आहे. श्रीमंत प्रियकरालाही सोडावे लागले आहे. साऱ्या भावना-विकारांना कर्तव्याच्या बंदिखान्यात डांबून जीवन जगावे लागले आहे. अशा तऱ्हेने अंतरी पोखरलेली ही मुक्ता वर्तक अखेर एका दुर्धर रोगाने मृत्युशय्येवर पडली आहे. वास्तवाची सारी बंधने ढिली झाली आहेत आणि कर्तव्याच्या बंदीखान्यात डांबलेली तिची सारी अधुरी सुखस्वप्ने आता तिच्या डोळ्यांपुढे तरळू लागली आहेत. तिला हवेहवेसे वाटणारे जीवन आणि तिने भोगलेले जीवन याच्या उभ्या-आडव्या धाग्यांनी श्री. रत्नाकर मतकरी यांनी हे स्वप्न-नाट्य विणले आहे.

हे स्वप्न-नाटच आहे असे प्रथमच सांगितले जाते आणि सारीच स्वप्ने सुबोध आणि सुसंबद्ध असतात असे नाही असा अनुभव प्रत्येकाला असतोच. काही स्वप्ने तर स्वप्नातून जागे झाल्यावर विचार करता नेमके काय होते हेही सांगता येत नाही. तसेच मतकरी यांचे हे 'स्वप्न-नाटच सर्वसामान्य प्रेक्षकांच्या डोक्यावरून जाते. याचा पुरावा म्हणून 'अस्ताई'च्या प्रयोगाच्या वेळी प्रेक्षागृहाकडे बोट दाखविता येईल. आम्ही हा प्रयोग पाहिला तेव्हा प्रेक्षागृहात प्रेक्षक मोजकेच होते. आणि नेमके काय पाहिले हे झटकन् कुणाला सांगता येत नव्हते. मतकरी यांची 'अस्ताई' प्रेक्षकांना अंतरली होती. कथा उलटी मांडली की त्याचे (नव) किंवा (न) नाटच होते असे हा प्रयोग पाहून आम्हांला वाटले. कथा समजावून सांगण्यापेक्षा कथा समजावून घ्यावी असा प्रेक्षकांनी हेतुपुरस्सर खटाटोप या 'अस्ताई'त केला आहे हे प्रयोग पाहताना वेळोवेळी जाणवते. एकाच सीनवर घडणारे सारे प्रसंग हा त्याचा एक पुरावा. स्वप्नातही मनुष्य राजवाडचात म्हणजे राजवाडचात जातो. शाळेत म्हणजे शाळेत जातो किंवा ऑफिसात म्हणजे ऑफिसातच जातो. प्रत्यक्ष त्या त्या वातावरणात वावरत असतो. अतिवास्तवाचे हव्यास धरणारे नव नाटच मात्र हा प्रयोग पाहून वास्तवापासून खूपच दूर गेल्यासारखे वाटते. (कारण जे सहज शक्य आहे ते केले तर काही नवीन केल्याचे सुख कसे मिळणार ? )

नाटकाचा विषय हृदयस्पर्शी असूनही तो अशा अनेक कारणांमुळे प्रेक्षकांपर्यंत पोचत नाही. परिणामकारक होत नाही. श्री. मतकरी यांनी लिहिलेले संवादही वरील तंत्राप्रमाणेच अत्यंत जुजबी वाटतात. बालमुक्तेच्या मनातील प्रौढ विचार आणि मोठचा मुक्तेच्या मनातील बालसुलभ इच्छा मात्र लहान आणि मोठी मुक्ता एकाच वेळी एकत्र नांदवून परिणामकारक आणि सुलभ रीतीने दाखविण्यात मतकरी यांनी यश मिळविले आहे.

असे असूनही स्वप्न-नाटच जे काही थोडे फार समजते ते स्नेहप्रभा प्रधान यांचेमुळे. त्यांचा अभिनय इतका अप्रतिम आहे की फक्त त्याकरता तरी प्रत्येक मराठी माणसाने हे स्वप्न-नाटच एकदा तरी पहावेच. स्नेहप्रभाबाईंनी मुक्ता वर्तकच्या भूमिकेतील भावनांचे बारकावे कमालीच्या समर्थ अभिनयातून आणि हालचालीतून व्यक्त केले आहेत. त्यांनी केलेली मुक्ता वर्तकची अत्यंत रेखीव अशी भूमिका हाच 'अस्ताई'च्या यशातील मोठा वाटा. त्याचप्रमाणे उल्लेख करायला हवा तो बालमुक्तेचे काम करणारी अलका मुळे आणि आईची भूमिका करणारी सौ. फडके यांचा; या तिघींशिवाय बाकीच्यांच्या भूमिका ही आहेत एवढीच भलावण पुरे !



स्नेहप्रभा प्रधान

* * *

## पुरुषोत्तम-करंडक स्पर्धा
## एक 'जनावर' खानदानी, बाकी टांग्याची घोडी !!

आंतरमहाविद्यालयीन नाटचस्पर्धा पाहणे अतिशय मौजेचे आणि उत्साहाचे असते. नव्या तरुण कलावंतांचा अभिनय आणि कल्पकता यांचेही दर्शन घडते आणि म्हणूनच कॉलेज प्रेक्षकांनाच नव्हे तर प्रौढ प्रेक्षकांनाही ती पाहायला जायला सदैव आवडते. असे असले तरी यंदाच्या 'पुरुषोत्तम-करंडक' नाटचस्पर्धा पाहताना मात्र मन अतिशय खिन्न झाले. या स्पर्धांमधून उत्साहाचा तर अभाव होताच पण त्याचबरोबर अभिनयगुण, सांघिक भावना, दिग्दर्शनकौशल्य या गोष्टीही अतिशय सामान्य असल्याचे आढळून आले. आणि भावी काळातील कलाकारांबद्दल मनात निराशेने घर केले.

पुण्यातील महाविद्यालयीन क्षेत्रात आजवर सुव्यवस्थित तऱ्हेने आयोजित केलेल्या नाटचस्पर्धा नव्हत्या. त्या सुरू करून 'महाराष्ट्रीय कलोपासका'ने एक अभिनंदनीय उपक्रम सुरू केला यात संदेह नाही. पण विद्यार्थीवर्गाने त्याचा उपयोग किती प्रमाणात केला हे पाहिले तर मन खिन्न होते. स्पर्धेला नाटक द्यायचे, पण त्यामधून दर्जेदार नाटक सादर करण्याऐवजी मौजमजा करण्याची वृत्ती दिसून येते. स्पर्धेसाठी आवश्यक ते कष्ट, अभिनय, आणि स्पर्धेची वृत्ती या गोष्टी फारच अल्पांशाने आढळतात आणि म्हणूनच याच गोष्टी घडणार तर मग स्पर्धाच कशाला? स्नेहसंमेलने नाहीत काय ? असाही विचार मनात आल्याखेरीज राहत नाही.

पुण्यातील एकूण नऊ कॉलेजांतून अकरा नाटके सादर केली गेली. त्यांच्या नावांकडे नुसती नजर टाकली तर मात्र कौतुक वाटते. एकापेक्षा एक सरस, रंगदार आणि वैशिष्टचपूर्ण नाटिका सादर झाल्या होत्या. नाटिका निवडणाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदनच केले पाहिजे. पण प्रत्यक्ष प्रयोग पाहताना लेखन जितके वैशिष्टचपूर्ण, चांगले तितकेच प्रयोग सामान्य आणि रटाळ वाटले. त्याला मुख्य कारण दिग्दर्शकांप्रमाणेच, कलाकारांचा तोकडा अभिनयही आहे. यामुळेच प्रारंभी वाटणारा आनंद कुठल्याकुठे लोप पावला. अकरा नाटिकांत रत्नाकर मतकरी यांच्या तीन, प्रा. गंगाधर गाडगीळ यांच्या दोन, मो. ग. रांगणेकर, शं. ना. नवरे यांच्या प्रत्येकी एक अशा आणि अन्य काही नवोदितांच्या नाटिका दिसत असल्या तरी आजचे लोकप्रिय, आणि श्रेष्ठ नाटककार पु. ल. देशपांडे यांची एकही नाटिका नसावी याचेही नवल वाटले ! असो. काहीही असले तरी झालेल्या बहुतेक सर्वच नाटिकांचे विषय उत्तम, लेखन वैशिष्टचपूर्ण आणि सहज थोडचा कष्टाने रंगणारे होते. पण महाविद्यालयीन तरुण कलाकार प्रयोगाचे बाबतीत दुबळे ठरले.

पहिल्या दिवशीच फर्ग्युसनने 'मावशी'-सारखी अतिशय गंभीर पण परिणामकारक एकांकिका सादर करून स्पर्धेला सुरवात केली. रवीन्द्रनाथ टागोर यांच्या 'मौसी' या हळुवार नाटिकेचा अनुवाद सरोजिनी कुलकर्णी

यांनी तितक्याच हळुवारपणे केला आहे. माधव वझे यांनी ती सादर करताना त्यातील कोमल भाग, नाजुकता कायम ठेवण्याचा बराच प्रयत्न केला हे स्पष्ट केलेच पाहिजे. पण समर्थ कलाकारांअभावी नाटिकेला यश प्राप्त झाले नाही. नीला कुलकर्णी यांचे मावशीचे काम सोडले तर ज्योतिन आणि मणी ही प्रमुख कामे फारच सामान्य वाटली. नाटकातील शेवटचा प्रवेश अतिशय परिणामकारक आहे. पण तोच भरपूर वेळ असूनही गाळला गेला. हे असे का व्हावे ?

स्पर्धेत ज्या काही अगदी रटाळ, तिसऱ्या दर्जाच्या नाटिका सादर केल्या त्यांतील लॉ कॉलेजच्या शशिकांत कुलकर्णी यांची 'चक्र' ही एक रहस्यमय असावी असा संभ्रम निर्माण करणाऱ्या एकांकिकेचे लिखाण जितके ठिसूळ तितकेच कलावंत सामान्य ! यामुळे प्रेक्षकांची जी केविलवाणी अवस्था झाली त्याचे वर्णन करणेच नको ! !

जयंत पानसे जब्बार पटेल



## स. प. चा धोरणीपणा

स. प. कॉलेजने सादर केलेल्या तीन एकांकिकांत कै. शशिकांत पुनर्वसु यांची 'शुभांगी' ही एकमेव गंभीर एकांकिका ! पण तीसुद्धा परिणामशून्य ठरली. एकांकिकेत इनमीन पात्रे तीन आणि या तिघांचे रस्ते तीन बाजूंनी चालले होते. याचे दिग्दर्शन किंवा अभिनय अति सामान्य. शरयु गोगटे यांनी शुभांगीचे काम करण्याचा मनापासून प्रयत्न केला, पण तो दुबळा ठरला. शुभांगीची ही दुर्दशा लक्षात घेता त्या पार्श्वभूमीवर स. प. कॉलेजची 'बंडू वशिला लावतो' ही गंगाधर गाडगीळ यांची एकांकिका फारच सरस वाटली. नाटक विनोदी असल्याने प्रेक्षकांची मनेही काबीज करणे त्यांना फारसे अवघड गेले नाही. या नाटिकेत बंडू (धनंजय गोळे) आणि स्नेहल (हेमलता खिरे) यांची कामे सहजपूर्ण झाली. प्रेक्षक विशेषतः खूष झाले ते बंडूच्या कामावर ! त्यांचे मुद्राभिनय, बोलण्याची पद्धती छान होती. बाकीची पात्रे जरी ठाकठीक होती तरी नानूसारख्या महत्त्वाच्या पात्राची निवड अधिक कसून झाली असती तर एकांकिकेचे यश अधिक वाढले असते. काहीही असो, श्रीराम खरे यांनी ती बरीच परिश्रमपूर्वक बसविली होती. स. प. कॉलेजने सादर केलेली तिसरी एकांकिका 'रहस्य आणि तरुणी !' पण तिच्यात विशेष असे काहीच आढळले नाही. प्रेक्षक हसले ते प्रा. गंगाधर गाडगीळांच्या विनोदाला, अभिनयाचे ते यश नव्हे ! ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे त्याबद्दल विशेष सांगायला नको ! एकंदरीत स. प. कॉलेजने तीन एकांकिका सादर करून जो एक धोरणीपणा दाखविला त्याचे फळ त्यांना खास मिळाले. निदान एखादी तरी नाटिका यशस्वी होईल हा अंदाज खरा ठरून 'बंडू वशिला लावतो'-ला उपविजेतेपद मिळाले.

कॉमर्स कॉलेजने 'बिचारा डायरेक्टर' सादर केला. ती रंगली होती खूप. परंतु त्यातील डायरेक्टरचे काम करणारे प्रफुल्ल जोशी स्टेजवर इतक्या वेड्यावाकड्या उड्या मारीत होते, की प्रेक्षकांना एखादा नृत्यप्रयोग पहात आहोत असे वाटू लागले. सर्वांत मालकंसचे काम करणारे सुभाष देशपांडे यांचे यश डोळ्यात भरले. अन्य पात्रेही ठीक होती. तरीही नाटिकेचा एकसंघ परिणाम पाहता ती 'ओव्हर' वाटली. सहाजिकच नाटिकेला नंबर मिळू शकला नाही.

स्पर्धेतील अतिशय निकृष्ट दर्जाच्या एकांकिकेत 'तुझं माझं जमेना' या टिळक शिक्षण महाविद्यालयाच्या एकांकिकेचा उल्लेख करावा लागेल. त्यातील कलावंत सामान्य तर होतेच पण गाण्यासाठी आवाज नसतानाही, आणि गाणे म्हणण्याची जरुरी नसूनही नाटिकेतील सर्व गाणी म्हणून प्रेक्षकांच्या सहनशीलतेचा अंत पाहिला. हीच गोष्ट वाडिया कॉलेजच्या 'काळवेळ' या रत्नाकर मतकरीकृत एकांकिकेत दिसून आली. लेखन जितके कसदार तितकाच प्रयोग भिकार ! अभिनय म्हणजे काय याचा एकालाही गंध नव्हता. सर्व इतके पोरकट होते की श्रीधर राजगुरूंनी ती सादर तरी का केली असा प्रश्न पडला. असा प्रश्न एम. ई. एस्. च्या 'स्वगत' या नाटिकेच्या वेळीही पडत होता. ही सुद्धा मतकरी यांचीच एकांकिका ! दिग्दर्शक प्रा. केळकर यांचे श्रम अनाठायी ठरले.

पुणे विद्यापीठाने मतकरी यांचीच 'मंत्र' ही एकांकिका त्या मानाने पुष्कळ बरी केली. पण 'उडदामाजी काळेगोरे' या न्यायाने ती बघविली इतकेच ! रमेश कसबेकर (श्रीराम) आणि अलका जोशी (प्रियंवदा) यांची कामे सोडली तर अन्य कलावंत सामान्य होते. अरविंद जोशी यांचे कर्नलचे काम पाहून कीव आली. सैन्याधिकारी कसे रुबाबदार असतात, बोलतात हे त्यांनी कधी पाहिले आहे किंवा काय असा प्रश्न पडत होता.

## जब्बार पटेलांचे नंबरी 'जनावर'

अशा या दहा सामान्य एकांकिकांमध्ये मेडिकल कॉलेजची 'जनावर' सरस, प्रशंस-

नीय आणि प्रथम क्रमांकाच्या पारितोषिकास पात्र ठरली असल्यास नवल नाही. कारण त्यामध्ये अभिनय होता. दिग्दर्शनकौशल्य होते, स्पर्धा जिंकलीच पाहिजे अशी जिद्द होती आणि मुख्य म्हणजे जव्वार पटेल होते ! गत-वर्षी या कलाकाराने याच स्पर्धेत जे भव्य यश मिळविले, पी. डी. ए. च्या ' खून पाहावा करून ' मध्ये प्रेक्षकांना आपलेसे केले, त्यामुळे त्यांच्याबद्दल फार मोठ्या अपेक्षा होत्या. आजवर पुण्यात न झालेली ' जनावर ' सारखी वेगळी, वैशिष्टयपूर्ण आणि चटका लावणारी एकांकिका निवडली यातच त्यांनी निम्मे यश मिळविले. शिवाय त्यात पात्रे अवघी दोन ! त्यातील एक अगदी अबोल तर दुसरे विलक्षण बडबडे; रंगभूमीवर सारखी हालचाल करणारे, प्रेक्षकांचे लक्ष प्रामुख्याने वेधून घेणारे ! पटेल यांनी या बडबड्या गृहस्थाचे काम करून यश नक्की केले. शिवाय या एकांकिकेत दिसून येणारा सर्वांत महत्त्वाचा गुण म्हणजे पटेल यांना यशासाठी इतरांवर अवलंबून राहावे लागले नव्हते. सर्वस्वी एकपात्रीच कार्यक्रम होता आणि त्यामुळेच त्यात तडजोड नव्हती. अर्थात् धोकाही होताच, कारण अपयश आले असते तर पटेल यांचे आजवरील यश व्यर्थ ठरले असते. पण सच्चा कलावंत कितीही अवघड काम असले तरी यशस्वी करणारच या नियमा-प्रमाणे पटेल यांनी ते काम यशस्वी केले. सुमारे पाऊण तास प्रेक्षक खुर्चीला नुसते खिळून बसले होते. त्यांच्यात हालच.ल नव्हती की साधा सुस्कारा नव्हता.

एकांकिकेचे यश त्यातील प्रयोग दर्जा-प्रमाणेच लिखाणावरही अवलंबून असते. एडवर्ड अल्बीच्या ' झू ' या पाश्चात्य एकां-किकेवरून शं. ना. नवरे यांनी केलेले हे रूपां-तर फार परिणामकारक वठले आहे. सार्व-जनिक बागेत बसलेल्या एका साध्या, सत्प्रवृत्त सभ्य माणसाजवळ एक भणंग बेछूट गृहस्थ येऊन आपली कहाणी सांगू लागतो. या भणंग गृहस्थाला समाजाकडून मानहानी, दुःख यांचीच सदैव सोबत झालेली आहे. आणि त्यामुळेच तो जगाकडे जणू काही पशुवृत्तीने पाहात आहे. आयुष्यभर दुःख, मानहानी, आणि गळचेपी सोसलेला हा गृहस्थ त्या सभ्य गृहस्थाला नाना तऱ्हेच्या गोष्टी सांगून चिडवू पहात आहे. त्या गृहस्थाने चिडून जाऊन चेतवून आपल्याप्रमाणेच पशुवृत्ती प्रकट करावी ही त्या भणंगाची इच्छा आहे. कारण त्याला सभ्य समाजाविषयी तिटकारा आहे, घृणा आहे. अखेरीअखेरीस त्या भणंगाच्या प्रय-त्नांना यश येऊन तो सभ्य गृहस्थ चिडतो, तिथे मारामारी सुरू होते, आणि भणंगाचा चाकू त्याच्या हातात येऊन त्याच्या चुकून होणाऱ्या वारामुळे तो भणंग मृत्युमुखी पडतो. त्या भणंगाला मरणकाळी मात्र आनंद आहे, तो त्या सभ्य गृहस्थाची पशुवृत्ती जागी केल्याचा ! आयुष्यभर दुःख सोसलेल्या मानवाच्या अंगी पशुवृत्ती येईल यात काहीच विशेष नाही. पण थोडा काळ जरी त्रास सहन करावा लागला तरी सभ्य समाजातील पशु-वृत्ती वर उफाळून येते, असे काहीतरी या एकांकिकेद्वारे लेखकाला सांगायचे आहे.

जब्बार पटेल यांचे त्या भणंग बेछूट गृहस्थाचे काम सफाईदार तर होतेच, पण अभिनयकलेचा तो एक जिवंत आणि उत्कृष्ट नमुना होता असे म्हणावे लागेल. त्यांच्या हालत्या–बोलत्या चेहऱ्यावरील भाव क्षणो-क्षणी असे काही बदलत असत की प्रेक्षक भारावून जात. पटेल यांना भूमिकेची समजही फार आहे आणि म्हणूनच एखाद्या सराईत, मुरब्बी कलाकाराप्रमाणे ते रंगभूमीवर वावर-तात. त्यांचे दुसरे सहकारी जयंत पानसे यांनीही त्यांना प्रयत्नपूर्वक साथ दिली. विशेष म्हणजे एकांकिका पाडली नाही. संपूर्ण ४०।४५ मिनिटांत त्यांच्या वाट्याला जी काही थोडी वाक्ये आली ती त्यांनी समजून म्हटली. आणि इतर वेळ केवळ चेहरा बोलका ठेव-ण्याचे कामही व्यवस्थित तऱ्हेने सादर केले. पण पानसे जर पटेल यांच्या तोडीस तोड असते तर काय बहार आली असती, असाही प्रश्न उभा राहिला. पटेल यांनी नाटिका बसविली होती छान ! दिग्दर्शनकौशल्य नजरेत भरले ते प्रथम याच एकांकिकेत !!

• • •

५ वर्षे व अधिक
मुदतीच्या ठेवीवर आतां
$5\frac{1}{8}$
टक्के व्याज मिळवा...
घरच्यापेक्षां महाराष्ट्र बँकेंत पैसे सुरक्षित राहून व्याजहि भरपूर मिळतें. सेव्हिंग्ज खात्या-वरहि ३% व्याज. चेकनें पैसे काढण्याची सोय. मुदतीच्या ठेवींवर ४१/८% ते ५१/८% व्याज मिळतें. विविध बचत योजनांचे माहितीपत्रक मागवा.
दि बँक
ऑफ महाराष्ट्र लि.
११७७, बुधवार पेठ, पुणे-२
644

चेहरा इतक्या वाईट रीतीने कुणी आजवर चित्रित केलेला नसेल. पूरणचे काम दिग्दर्शक चेतन आनंद यांनी स्वतः केले आहे. प्रेयसीवर उदात्त प्रेम करणारी व अखेर तिच्या सुखाकरिता बलिदान करणारी एखादी अविस्मरणीय भूमिका आपण करीत आहोत अशा जिद्दीने त्याने चेहरामोहरा उभा केलेला आढळतो. परंतु अविस्मरणीय भूमिका करायला एखादी अविस्मरणीय कथा तरी हवी का नको? वर सांगितली आहे ही काय कथा आहे? त्यामुळे चेतन आनंद चित्रपटभर अचेतन चेहऱ्याने प्रेतागारखा फिरतो, गाणी, म्हणतो! स्मशानात देखिल गाणे म्हणतो. पण सगळे " मोले घातले रडाया "

चित्रपटाचा सिनेरिओ स्वतः चेतन आनंद यांनीच लिहिला आहे. एक दृश्य पुरते नाही. नीलू-कमल नदीवर येतात. पाण्यात पाय सोडून बसतात...कट्! नीलू झोपाळ्यावर बसते. पूरण तिला झोके देतो, झोका उंच जातो......कट्! हा काय सिनेरिओ आहे?

आता एवढे सगळे असून चित्रपट संपेपर्यंत प्रेक्षक बसतो कसा? याला कारण जयदेव यांचे संगीत. न्यायशर्मा हे स्वतःच कवी आहेत. त्यांची गाणी अर्थपूर्ण आहेत. त्यांना संगीताचा उत्तम साज जयदेव यांनी चढवला आहे. चाली उत्तम आहेत. नृत्याची बाजू सुखदायक आहे. छायाचित्रण उत्तम आहे. गाण्यांचे ध्वनिमुद्रण सोडले तर संवादाचे ध्वनिमुद्रण मात्र इतके भिकार आहे की चेतन आनंद हे स्वतः जी उदात्त भूमिका करतात त्या पात्राचे नाव पूरण आहे की वरण आहे? नीलू ही नीलू आहे की लिलू आहे हे देखिल अखेरपर्यंत कळत नाही.

चेतन आनंद ह्यांचे दिग्दर्शन, देव आनंद मीनाकुमारी यांच्या भूमिका, जयदेव यांचे संगीत आणि न्यायशर्मा यांची फक्त गीते घेऊन या मंडळींनी एखादी चांगली कथा निवडली असती, किमानपक्षी एखादी पाश्चात्य कथा चोरली असती तर--! प्रेक्षकांची ' नाही आसू नाही माया ' ही अवस्था झाली नसती.

— महेश




## 'माणूस'चे



# दसरा आणि दिवाळी अंक

पाक्षिकाला साजेसे
नवे विषय
नवे लेखक
नवी मांडणी
घेऊन
ऐन मुहूर्तावर
वाचकांच्या भेटीस
येत आहेत.

MANOOS FORTNIGHTLY : 15 SEPTEMBER 1964 : FIFTY TWO PAISA R. N. B 9304


# किंमत नेहमीचीच
# अंक मात्र दोन

इतर दिवाळी अंकांप्रमाणेच
'माणूस' दिवाळी अंकाची किंमत
आजवर रुपये अडीच असे.
आता 'माणूस' महिन्यातून
दोन वेळा प्रकाशित होत असल्यामुळे
दिवाळीनिमित्त दोन अंक
वाचकांना सादर करण्यात येत आहेत

## १ : दसरा अंक

किंमत एक रुपया पंचवीस पैसे
प्रसिद्धी : दिनांक १५ ऑक्टोबर १९६४

## २ : दिवाळी अंक

किंमत एक रुपया पंचवीस पैसे
प्रसिद्धी : दिनांक १ नोव्हेंबर १९६४

**विक्रेत्यांनी २५ टक्के वजा करून पैसे पाठवावेत व दोन्ही अंकांसाठी त्वरित मागणी नोंदवावी. किरकोळ अंकासाठी अंकाची किंमत अधिक रजि. बुक-पोस्टचा खर्च मिळून होणारी रक्कम म. ऑ. ने पाठवावी.**

## 'माणूस', ४१९ नारायण, पुणे २


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे मासिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रायव्हेट लि., ३८३ नारायण पेठ, पुणे, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **संपादक : श्री. ग. माजगावकर**